
अंकुश शिंगाडे
घटस्फोट

**या मित्रांनो! सुंदर पुस्तकांचा मनमुराद आनंद लुटा!!**

# घटस्फोट

## हे पुस्तक फ़ुकट नाही

**यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.**

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो.

मजा येते.

पण

तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हालाही आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना हे पुस्तक मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

**दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.**

# घटस्फोट

(कादंबरी)

## अंकुश शिंगाडे

ई साहित्य प्रतिष्ठान

# घटस्फोट

लेखक : अंकुश शिंगाडे

फ़ोन – ९३७३३५९४५०

पत्ता : अंकुश शिंगाडे- १२२बी, गजानन नगर, भरतवाडा, कळमना मार्केट रोड, नागपूर. महाराष्ट्र

ईमेल - geetshingade454@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक: ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन: २७ डिसेंबर २०२०

©esahity Pratishthan®2020

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची- परवानगी घेणे आवश्यकआहे.

# घटस्फोट

(कादंबरी)

अंकुश शिंगाडे

ही कादंबरी काल्पनिक असून या कादंबरीतील स्थळे, व्यक्ती व घटना काल्पनिक आहेत. त्यात कोणाच्याही भावना दुखाविणे हा हेतू नाही. कोणाही स्थळ, व्यक्ती वा घटनेशी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष संबंध नाही. तसा तो आढळून आल्यास तो निव्वळ योगायोग समजावा.

ते एक गाव होतं. गावात नीट रस्ते नव्हते. नळ नव्हता. वीज नव्हती. मोठी शाळाही नव्हती. शाळा ही पाटलानं दिलेल्या मोडक्या तोडक्या खोलीत भरत असे. गावात गेल्यावर गाव आलं याचा भाष दुर्गंधीवरुनच येत होता.

गावात कोंबड्या बकऱ्या तसेच पशूधन मोठ्या प्रमाणावर होतं. त्यामुळं साहजिकच लोकं अहिंसा पाळत नसत. दरवर्षी देईमायच्या मंदिरात कोंबड्या बकऱ्या कापण्याचा घाट होता. नव्हे तर त्या कोंबड्या बकऱ्यांचा बळी चढविण्याला ते पुण्य समजत. एखाद्या वर्षी पाऊस पडलाच नाही किंवा कोणती नैसर्गिक आपत्ती आली तर आपण देईमायला बरोबर भोग चढविला नसेल किंवा कोणी गावातल्या माणसानं देईमायची इच्छा पुर्ण केली नसेल असं गाव मानायचं.

गावात एक शंकरजीचं मंदिर होतं. त्या शंकरजीच्या पींडीवर पाऊस न आल्यास गावातील लोकं पाणी टाकायचे. त्यांना असं वाटायचं की असं पाणी टाकल्यानं शंकरजी पावन होवून पाऊस पाडतो.

शेती भरपूर पीकत होती. याचं कारण गावातील पशूधनापासून मिळणारे शेणखत. शेणखतानं जमीन भुसभूशीत होवून पीक जास्त व्हायचं. त्यामुळं गाव तसं स्वावलंबी. पुढे काही काळानं याच गावात सोयी झाल्या.

गावात रस्ते पडले. वीज आली व नळलाईनही. तसंच गावानं शेणखताचा वापर करणं बंद केलं व रासायनिक खताचा वापर सुरु केला. रासायनिक खत सुरुवातीला शेणखतापेक्षा जास्त उत्पादन देत होतं. पण याच खतानं शेतकऱ्याचे पुढील काळात बारा वाजणार हे काही गावाला माहित नव्हतं. तसेच गावातील लोकं शहराशी जुळले गेले. त्यामुळं सोयरीकाही होऊ लागल्या. शहरातील मुली विवाहानंतर गावात येवू लागल्या. पाहूणे येवू लागले. त्यांना ती गावची दुर्गंधी पसंत नसल्यानं ते आपल्या आपल्या नातेवाईकांना त्याबद्दल हिनवू लागले. साहजिकच यातून लोकांनी शौचालयं बांधलीत. अशाच या गावात एक जागो नावाचाही माणूस राहात होता. जागो व्यवसायानं शेतकरीच होता. त्याला जय नावाचा एकुलता एक मुलगा. मुलींचे विवाह झाले होते. त्या आपआपल्यी घरी सुखी होत्या.

गावातील शेती शेणखतानं जरी सुपीक असली तरी इतर शेतकऱ्याचं अनुकरण करुन जागोनं आपल्याही शेतात

रासायनिक खताचा वापर करणं सुरु केलं. इतर शेतकऱ्यांसारखच जागोच्या शेतीतही या रासायनिक खतानं जोरदार उत्पन्न दिलं. जागोही इतर शेतकऱ्यांसारखा भयंकर खुश होता.

सुरुवातीला जागोला बरं वाटलं. त्या रासायनिक खतानं पीक जोमात येवू लागलं होतं. पण त्या शेतात इतरही तण फोफावत होतं. त्यामुळं इतर तण काढण्यासाठी वर्षभर निंदण करावं लागायचं. त्यात मजूर सांगणे, त्यांची रोजी देणे जागोला कटकटीचे वाटत होते. कारण मजुरी जास्त होती. शेवटी यावर त्यानं एक तोडगा काढला. तो तणनाशक फवारु लागला. तणनाशकाच्या माऱ्यानं तणकट जळून जावू लागलं. त्यातच मजूरीही थोड़ी फार वाचू लागली होती.

गावात नळयोजना आली होती. दुरच्या गावात नदीला बांध बांधून पाणी अडवलं होतं व ते पाणी गावोगावी नळानं पोहोचवून पिण्याच्या व शेतीतील सिंचनाची सोय सरकारनं केली होती. ते पाणी एवढं मुबलक होतं की आता बाकी गावासह याही गावाला चोवीस तास पाणी मिळत होतं. त्यामुळं साहजिकच कोणीतरी या गावात कारखाना टाकायच ठरवलं. गावात एक कारखाना उभा झाला होता. त्यामुळं साहजिकच लोकांनी या कारखान्याला जो कच्चा माल लागत होता. तो कच्चा माल

आपल्या शेतात पेरणे सुरु केले होते. हा कच्चा माल कारखाना मालक विकत घ्यायचा व त्यापासून पक्का माल काढून तो माल शहरात जास्त भावात विकायचे काम कारखाना मालक करीत होता. त्यातच गावातील बरीचशी मंडळी या कारखान्यात कामाला लागली होती. आता मात्र शेतीसाठी कामाला मजूर मिळायचे नाहीत. त्यामुळं काही लोकांनी जमीनी विकून टाकल्या होत्या. पण ज्यांच्याकडे शेती होती, त्यांनी आपली शेती यांत्रिक पद्धतीनं करणं सुरु केलं होतं. निंदण करतांना मजूर लावण्याऐवजी तणनाशक वापरणं सुरु झालं होतं. तसेच पीक कापणी करण्याऐवजी थेट मशीनीद्वारे पीक कापून ते काढण्याचाही पद्धती शेतकरी मशीनीद्वारेच करीत होते. एवढेच नाही तर ट्रॅक्टर आल्यानं शेतीही त्याच आधुनिक साधनानं करणं सुरु केलं होतं. साहजिक आता पशुधन पालवणं गावकऱ्यांना कष्टाचं वाटू लागलं व गावातील बऱ्याच लोकांनी पशुधन विकलं.

आता गावात कोणीही पशुपालन करीत नव्हता. शेणखत पूर्णतः बंद झालं होतं. गावात कोणी सडा सारवणाला शेण वापरत नव्हतं. सारवायला शेण मिळत नाही म्हणून घरी शहाबादी फरशा लावल्या होत्या. दुधदूभते तर अजिबात मिळत नव्हते. त्याचा परीणाम हा झाला की गावात आजार बळायला लागले

होते. अंग सांधे दुखायला लागले होते. कारण जे गाईच्या दुधातून जीवनसत्व, प्रोटीन मिळायचे, कॅल्शियम मिळायचे. ते आता मिळत नव्हते. हाडे ठिसूळ बनत चालली होती.

पुर्वी भाजीपालाही जास्त वेळ टिकायचा. पण आता सल्फेटने भाजीपालाही टिकत नव्हता. शेती पीकत नव्हती. शेतकऱ्यांना आता काही सुचत नव्हते. कोणीही मागे वळून पाहात नव्हतं. मात्र शेती पिकायला हवी म्हणून जागेची उलटफेर करणे सुरु होते. पण जमीनीतच काही पोषक तत्वे नव्हती. तर ती तरी किती पीक देणार. कितीही खत वापरलं तरी शेती काही केल्या पीकत नव्हती. शेतकरी चिंताग्रस्त वाटत होते. नव्हे तर त्यांची चिंता वाढली होती.

जय लहानाचा मोठा होत होता. त्याला रानात लहान मुलांसोबत खेळणं फार आवडायचं. लहान मुलांसोबत सब्बल खुपसणे, विटीदांडू, गोट्या, चक्करबिल्ले, टायर चालविणे खेळता खेळता वेळ कसा जायचा ते कळायचं नाही. पावसाळ्यात पाऊस आला की सुगीचा सण आल्यागत वाटायचं. आई ओरडायचीही की पावसात खेळू नको. तरीही त्याला काही वाटायचं नाही व तो पावसाला न जुमानता खेळायला जायचा पावसात. कधी कधी सकाळपासूनच मुलांसोबत चक्करबिल्ला खेळतांना भूकही हरवून

जायची. आई मात्र त्याला शोधत गावभर फिरत असे. पण जयचा पत्ता लागत नव्हता. जय मात्र आई ओरडते म्हणून गावाच्या बाहेर दूर रानात जायचा. कधी रामेश्वरात पोहायला त्याला आवडायचे. पण भीती वाटायची. त्याचे मित्र मात्र रामेश्वरात न घाबरता पोहायचे. जयलाही बोलवायचे. पण जय जायचा नाही. त्यामुळं तो पोहणं शिकला नव्हता.

जयच्या घरीही पशुधन होतं. बाप शेतीत बैलानं औत हाकत असला की जय आपलं पशुधन घेवून रानात चारत असे. तेव्हा ते चारतांना मजा वाटायची. कधी कधी कावळे किंवा बगळे त्याच्या गाईसोबत हिंडायचे. त्या गुरांच्या चरण्याने जे नाकतोडे किंवा लहान लहान किडे गवतातून उडत. ते किडे खावून पोट भरायचे. ते पाहतांना मजा वाटायची. पण त्यांचा कधीकधी रागही यायचा. जेव्हा हिच पाखरे गवतातील किडे टिपता टिपता गुरांच्या पाठीवरील गोचीड टिपायचे. तेव्हा त्या गुरांना रक्त लागायचं.

पावसाळ्यात चिखलानं जनावरांना चिखल्या होत. त्यात जनावरांचे पाय शुजत. तेव्हा आपल्या बापासोबत जयही त्या गुरांची काळजी घ्यायचा. ती जखम गरम पाण्याने शेकून द्यायचा. त्यावर हळद आणि तेल लावायचा. जनावरालाही बरं वाटायचं. त्याचबरोबर मग जयलाही. जयने केलेली मदत गुरं विसरायची

नाहीत. मग जय त्यांच्या पाठीवर बसला तरी.. .. .. .. जय गुरांच्या पाठीवर बसायचा. त्याचबरोबर गुराच्या पायाखालून जायचा. पण गुरं त्याला काही करीत नव्हती. तीही त्याचेवर प्रेम करीत होती. निर्भीडपणे आपल्या नाक्यातला कोणी आहे असा समजून. त्याचे पाठीवर बसणे गुरांनाही आवडायचे.

गुरं सकाळपासूनच चरत असत. पण रात्री अंधार पडला तरी ते चरतच असत. ते पाहून जयला वाटायचं की यांची भूक अशी कशी भागत नसावी. हो एवढे चरतात तरीही.. .. .. ..

उन्हाळ्याचे आणि पावसाळ्याचे दिवस जनावरांसाठी वाईट असायचे. हिवाळा सुगीचा असायचा. पाऊस आला की जनावरांच्या तोंडाला गवताचे पाते रुतायचे. तेव्हा त्या रुतण्याने जनावरांच्या तोंडाला छाले यायचे. त्याला तोंडखुरी म्हणत. तोही एक रोगच होता.

पावसाळ्यात सगळीकडं हिरवे गवत उगविलेले असायचे. हा चारा खावून जनावरं आपले पोट तर भरत. पण पावसाचे टपोरे थेंब अंगावर झोंबताच ते झाडाच्या आडोशाला लपत. कधी कधी दिवसभर संततधार पाऊस असायचा. तेव्हा भूक अतीव लागूनही जनावरं तासनतास झाडात थांबत. शेवटी नाईलाजानं का होईना. सांजच्याला चरायला लागत. तेव्हा रात्र

झालेली असायची. उन्हाळ्यात मात्र जनावरांना ऊन लागत असे. तेव्हाही जनावरं झाडांच्या आडोशाला उभी राहात. रानातही गवत नसेच. त्याहीवेळी जनावरं उपाशी राहात. त्यांना असे उन्हाळे पावसाळे विना अन्नाशिवाय काढावे लागायचे. त्यातच उन्हाळ्यात बैलाच्या मागं कामं असायची. शेत नांगरणं वखरणं. पावसाळ्यातही डवरण असायचंच. मात्र हिवाळा येताच कोणत्याही स्वरुपाची कामं नसल्यानं बैलांना आराम असायचा. तेव्हा फक्त दिवसभर रानात चरायला मिळायचं. म्हणून की काय, याच काळात जनावरं अंगकाठी पकडायचे व धष्टपुष्ट दिसायचे. बाकी उन्हाळा हिवाळा त्यांना परवडायचं नाही.

उन्हाळ्यात सकाळपासूनच राबत असतांना दुपारची ऊन चढत यायची. बैलांना ऊन वाटायची. दमही लागायचा. उन्हाळ्याच्या गरम झळा जाणवायला लागायच्या. तेव्हा मालक त्यांना सोडायचा व त्यांना वाळलेला कडबा, कुटार टाकून सावलीत बांधायचा. पुन्हा ऊन ओसरताच पुन्हा वखराला जुंपायचा. तेव्हा त्या बैलाच्याही नाकीनव यायचं व वाटायचं की बेकार या बैलाच्या रुपात जन्म घेतला. मानव झालो असतो तर बरं झालं असतं. असं ते बैलांचं जीवन. जय त्यांचा लाड करताच त्यांना अगदी बरं वाटायचं.

जय आणि त्याच्या घरच्या पशुंची चांगली घट्ट मैत्री होती. जयच्या गावाला रामेश्वर नावाचा नाला होता. शेतातून घरी यायचं असेल तर रामेश्वर लागायचा. पावसाळ्यात या रामेश्वराला पूर राहायचा. तेव्हा हा नाला पार करतांना जय बैलाच्या पाठीवर बसायचा व नाला पार करुन तो अलिकडे यायचा किंवा पलिकडे जायचा. असं जयचं गावात सुंदर जीवन जात होतं.

जय थोडा मोठा झाला होता. बहिणींचे लहानपणी लग्न झाले होते. जयला मायबापानं शाळेत टाकलं होतं. त्याचं शिक्षण व्हावं म्हणून. जय नित्य नेमानं शाळेत जात होता. कधीकधी त्याला लवकर सुटी व्हायची. तो लवकर घरी यायचा. त्यामुळं त्याला आता घरी एकटे राहण्याशिवाय पर्याय नसायचा.

जयचं घर मातीचं बांधलेलं असून छान होतं. जनावरांची पावसाळ्यात आबाळ होवू नये म्हणून जयच्या बापानं घराच्या बाजूलाच जनावरांसाठी एक लहानसं झोपडं बांधलं होतं. त्याला कोठा म्हणत होता त्याचा बाप. याच गोठ्याच्या एका भागात कडबा कुटार भरलेला होता. या गोठ्यात कधीकधी सापही निघायचे. ते जनावरांच्या वासानं येत असत. त्यामुळं कधीकधी गोठ्यात एकटं जायला भीती ही वाटायची. बापही कधीकधी जायला घाबरायचा. पण काय करणार. उपाय नसायचा.

पोळा हा शेतकऱ्याचा सण असायचा. लय आनंद वाटायचा बैल रंगवतांना. जयही बापासोबत बैलं रंगवू लागायचा व बापासोबत तोही पोळयात जायचा. ते पोळयातले बैल हाकतांना फार मजा वाटायची. त्यातच ते बैल दारोदारी फिरवून पाच पैसे दहा पैसे मागतांना जयला फार बरं वाटायचं. कोणी चार आणे दिले की या सणाला सुगी वाटायची. कोणी कंजूस असायचे. ते पाचपैसे देत. त्यांचा फार राग यायचा. मात्र एकदाचा तो प्रसंग जयच्या जीवनाला बदलवून गेला.

जयच्या बापाची शेती चांगली पीकत होती. तो फार मेहनती होता. शेतात काम करतांना त्याला कोणत्याही स्वरुपाचा थकवा यायचा नाही. तेव्हा त्या उत्साहानं त्याला पीक चांगलं यायचं. हे पाहून गावातील काही शेजारची मंडळी त्याचा द्वेष करीत असायचे. तशीच गत शेतातही होती. जयचा बाप शेतावर नसला की आजुबाजूचे शेतकरी त्याच्या शेतीत बैलं सोडायचे. तेव्हा ते बैलं शेत खावून टाकायचे. त्यातच नुकसान व्हायचं. ते नुकसान कधी भरुन निघणारं नव्हतं.

एकदाचा तो प्रसंग. घरीही कोणी नसलं तर गोठ्यातील कडब्याच्या पेंढ्या चोरुन न्यायचे. हा नित्यनेम असायचा. त्यातच एक दिवस शेजारचा एक व्यक्ती शाळेतून

लवकर आलेल्या जयला चोरुन कडब्याच्या पेंढ्या नेतांना दिसला. जयने त्या व्यक्तीला चोरुन नेत असल्याबद्दल शिव्या दिल्या व बापाला सांगण्याबद्दलही सांगीतलं. तेव्हा आपली चोरी पकडली जाईल म्हणून सर्व लोकांसमक्ष जयला त्या माणसानं मारलं होतं. हे सर्व बघणाऱ्या बघ्यांनी पाहिलं.

सायंकाळी जागो जेव्हा घरी आला. तेव्हा मारण्याच्या भीतीच्या धाकानं जयने काही बापाला शेजारच्या माणसानं मारल्याबद्दल सांगीतलं नाही. परंतु लोकांना कसे काय चूप करणार?तेव्हा लोकांनी दोनचार दिवसानंतर ती घटना जागोला सांगीतली. जागोनं त्यानंतर शेजारच्या माणसाला जाब विचारला. परंतु माफी मागत तो म्हणाला कि मी जयला मारलं नाही. फक्त थोडंसं दरडावलं. तेव्हा जागोला वाटलं कि आपण एकतर घरी राहात नाही. कोण्या एखाद्या दिवशी हे लोकं आपल्या मुलाचा जीवच घेवून टाकतील. असा विचार करताच त्यानं आपल्या एकुलत्या एका लेकरास शहरात शिकायला टाकण्याचा निर्धार केला.

जय शहरात शिकत होता. पण त्याला गावच्या आठवणी येत होत्या. तो गावचा रानवारा आठवत होता. त्या रानवाऱ्याची गंमत आठवत होती. तसाच तो एकदाचा पाऊस

आठवत होता. तो एक दिवस.. .. .. . जयच्या शाळेत दररोज मध्यांन्ह सुटी होत होती. मध्यांन्ह सुटीत जेवन करण्यासाठी मुले धावत धावत शाळेतून घरी येत. जेवन करीत व ग्लास घेवून शाळेत जात. सांजेला चार वाजता अजून एक सुटी व्हायची. या सुटीत दूध मिळायचं. मग ही मंडळी दूध प्यायची.

ते दिवस पावसाळ्याचे असल्यानं ढगं यायचे. कधी कधी काळाकुट्ट अंधारही पडायचा. पाऊस कोसळायचा. त्यातच काही वेळानं ढग जाताच पुर्ववत स्थिती व्हायची. असाच तो दिवस उजळला. याही दिवशी नेहमीप्रमाणे जय मध्यांन्ह सुटीत घरी आला. ते लहानगं वय. त्याला ह्या ढगाचा लपंडाव समजत नव्हता. तसा तो जेवायला बसला. तेव्हा बाहेर काळाकुट्ट अंधार पडला. बहिण म्हणाली,

"आता रात्र झाली. जयला आता बाई कोंडून ठेवणार. "

"का बरं?"

"रात्र झाली ना. रात्री कशा काय सोडतील शिक्षीका तुझ्या?"

जयला भीती वाटत होती. तो मध्यान्हनंतर शाळेत जायला घाबरत होता. कारण त्याला दिवस मावळल्याचं गणित

समजलं नव्हतं. पण जसजसा तो मोठा झाला. तसतसं त्याला समजलं की ढग सुर्याच्या समोर आले की अंधूक वातावरण होतो. अमावस्या, पौर्णीमा, दिवस, रात्र, ग्रहणाचे प्रकार, सुर्यग्रहण, चंद्रग्रहण सारं काही तो शिकला होता.

त्याला त्या मध्यांन्ह सुटीबरोबर आणखी बरंच आठवत होतं. तो कुत्राही आठवत होता. जो मध्यांन्ह सुटीपुर्वी त्याचा रोजच जेवणाचा डबा खात होता व बिचाऱ्याला अर्धपोटी उपाशी राहावं लागत होतं. तो असा होता.

जयच्या बहिणीचे लग्न झाले होते. माय बाप दररोज शेतावर जात होते. सगळीच मुलं मात्र जेवन करायला घरी जायची. त्याचप्रमाणे जयही यायचा. पण घरी येताच एक वस्तीतील कुत्रा त्याची भाकर खावून टाकायचा. सायंकाळी घरी येताच जय हे सगळं आईला सांगायचा. आई चिंतीत व्हायची. काय करावे सुचायचे नाही. शेवटी आईन भाकर टोपल्याखाली झाकून ठेवली. टोपलीवर वजन ठेवून पाहिलं. कधी शिक्यावरही भाकर ठेवून पाहिली. पण कुत्रंही काही कमजोर नव्हता. तो शोध लावून व निरनिराळ्या युक्त्या करुन भाकर लंपास करायचा. अशाप्रकारे जयला भाकर मिळायची नाही. शेवटी ही गोष्ट त्याचे शिक्षीकेला माहित झाली. शुक्षीकेनं युक्ती सांगीतली की डबा शाळेतच

पाठवायचा. जय शाळेत जेवेल. पण जयला लाज वाटत होती. कारण कोणताच विद्यार्थी घरुन जेवन आणत नव्हता. त्याचं कारणही तसंच होतं.

समद्या शाळेत गरीबांची मुलं होती. ती मुलं, ज्यांच्या घरी चविष्ट अन्न बनत नव्हतं. त्यामुळं जयला वाटायचं की अशा जेवनाचा डबा जर शाळेत नेला. तर आपली शिक्षीका काय समजेल आपल्याला. या लाजेपायी जय शाळेत डबा न्यायचा नाही व कुत्रं भाकर खाताच तो चक्क उपाशी राहायचा.

जयला जागोनं शहरात टाकलं होतं. त्याला वाटत होतं की कोणी एखादा शेजारचा व्यक्ती आपल्या लाडक्या मुलाला मारुन टाकेल किंवा एखाद्या वेळी कुत्राच आपल्या मुलाला दुखापत पोहोचवेल.

मात्र आता जागोला पोराची खुप आठवण यायची. त्याच्या डोळ्यात पाणी यायचं. त्याची पत्नीही अश्रू गाळायची. पण आपल्याच मुलाचं भविष्य उज्जवल होईल या अपेक्षेनं ते डोळ्यातले अश्रू डोळ्यातच सुकवायचे. ते बाहेर दिसू द्यायचे नाहीत.

तिकडे जयलाही आपल्या मायबापाची फार आठवण येत असे. पण त्यालाही त्याची होणारी आबाळ आठवायची व तोही आपल्या उज्ज्वल भविष्याच्या रुपानं शांत बसत असे. शेवटी शांत बसण्याशिवाय उपाय नव्हता.

जयचं अशाप्रकारे बालपण संपत चाललं होतं. मृगाच्या सरीनुसार ते बालपण. कधी मृगाच्या सरी त्याच्या डोळयात तरळायच्या. तर कधी श्रावणातल्या. पण त्या सरीची त्याने कधी चिंता केली नाही.

जसजसा मुलगा मोठा होत होता. तसतसं जागोही म्हातारा होत चालला होता. आता त्याच्यानं मेहनत होत नव्हती. रासायनिक खतानं भुमी बंजर करुन टाकली होती. बैलाची जोडीही म्हातारी झाली होती. ती दोन्ही बैलं त्यांच्या घरच्या गाईची होती.

जयला शहरात शिक्षणासाठी पाठवताच जागोनं घरचं पशुधन विकून टाकलं. कारण चारायला कोणी नव्हतं. तो जेव्हा पेरणी करायचा. तेव्हा ते पशुधन अन्नपाण्यावाचून ओरडायचं. शेवटी काय करणार. त्या पशुधनाची होत असलेली आबाळ जागोला पाहावीशी वाटली नाही. शेवटी पशुधन विकलं. पण शेतीसाठी त्यान घरच्या गाईची दोन वासरं ठेवली. तिही आज म्हातारी झाली होती.

दोन बैल. दोघंही भाऊच. दोघांनीही जागोला भरपूर मदत केली. कशाची उणीव दाखवली नाही. पण आज त्याच्यापैकी जो मोठा होता. त्या बैलानं कामच जमेना. तरीही बैलाचे मुल्य जास्त असल्यानं जागोनं दुसरा बैल काही घेतला नाही. जेवढं काम निघेल तेवढं ते करवून घेण्याकडे जागो कटाक्ष ठेवायचा. एरवी जागोही म्हातारा झाल्यानं तोही जास्त मेहनत करीत नव्हता. बैलांनाही जास्त त्रास देत नव्हता.

मोठ्या बैलाची प्रकृती बिघडली होती. तो बरेच दिवस जेवला नाही. जागोला चिंता पडली होती. दवाखाना करुन झाला. पण काही इलाज उरला नाही. बैल काही इलाजाला प्रतिसाद देईना. अशातच शनिवार उजळला व मोठ्या बैलानं जागोकडं एक कटाक्ष टाकला. तसेच तडफडत प्राणज्योत मालवली. घरचा बैल म्हणून जागोच्या मुलानं म्हणजे जयनं आपल्याच अंगणात खड्डा खोदून त्याला दफन केला.

लहान बैल एकाकी झाला होता. त्यालाही कदाचित मोठ्या बैलाची आठवण येतच असेल. पण तो कोणाला सांगणार. पण त्याच्या डोळ्यात अश्रू दिसायचे. जागोला वाईट वाटायचं. कधीकधी वाटायचं की यालाही विकून टाकावं व शेती टॅक्टरने करावी. पण विचार यायचा हा घरचा जित्रुब असल्यानं याला

विकावं तरी कसं?त्याच नादात जागोनं त्या बैलाला सोबती म्हणून एक जोड भरायचा ठरवला. तो आपल्या एका नातलगाच्या गावी गेला.

बैलाच्या किमती फार वाढलेल्या होत्या. चांगल्या बैलाच्या किमती आसमानात होत्या असं वाटत होतं की बैल घेणं होणार की नाही ते. त्यातच एका घरी एक बैल दाखवला. तो बैल चांगला होता. पण त्याला आदत होती. आपला पाय जमीनीलगत घुसमाळून चालायची. त्याच आदतीनं त्याच्या खुऱ्यांना दरवर्षी दुखापत व्हायची. कारण पाय जमीनीलगत टाकत असतांना एखाद्या दगडावर ठसलाच तर ती खुरी फुटायची व त्यातून रक्त निघून दुखापत व्हायची. असे बरेच वेळा झाले होते. पण त्या बैलानं काही आपला स्वभाव सुधरवला नव्हता.

बहुतेक तो बैल अपंगच होता. हे नंतर लक्षात आलं. म्हणूनच त्याची किंमत कमी होती. त्याला जास्तकरुन राबत्याला राबवत नसत. तसेही त्या बैलानं जास्त धावणं जमत नव्हतं. जास्त काम करतांना तो थकायचा. पण जागोला असं कोणतं जास्त काम होतं. त्यानं तो बैल विकत घेतला. याच बैलानं जागोला बरीच साथ दिली.

मोठ्या म्हाताऱ्या बैलाप्रमाने जागोही म्हातारा झाला होता. त्याचंही व्यवस्थीत वागवत नव्हतं. तोही आता आजारी राहात होता. त्याला दवाखान्यात न्यायलाही बरोबर पैसा नसायचा. त्याच्या पत्नीचं नाव तुळसा होतं.

तुळसा आपल्याच शेतीत कामं करायची. बैलांनाही चारायला घेवून जायची. तिच्यानं वखरण, नांगरण जमायचं नाही. म्हणून ती बैलं चारायची. सायंकाळी घरी येताच जागोची काळजी घ्यायची. कधी जागो आजारी असूनही शेतीत जायचा. खोपटात बसून बैलाकडं लक्ष ठेवायचा. कधीकधी जय यायचा. तो आपल्या बापाची प्रकृती पाहायचा. त्याला कळायचं की आपला बाप सतत आजारी असतो. तेव्हा नाही काही तर हे शेतीतलं काम शिकायला हवं.

तो शहरातून जेव्हा जेव्हा गावात येवू लागला. तेव्हा तेव्हा शहर विसरुन शेतीतील काम शिकण्यासाठी वखर जुंपू लागला. नांगरण करु लागला. पण एखाद्या वेळी त्याचा बाप सायंकाळी शेतात चक्कर मारताच व त्याला जय वखर हाकलतांना दिसताच तो रागावत असे. त्याला वाटत असे की मी माझ्या मुलाच्या उज्ज्वल भविष्यासाठी याला शहरात शिकवायला पाठवलंय. कदाचित याने वखराचा धंदा शिकला तर उद्या याच

काळ्या मातीत खपेल. ऑफिसर बनणार नाही आणि त्याचं पुर्ण जीवनच नष्ट होईल. काळी माती माय जरी असली तरी त्या मातीत खपतानाच्या वेदना फक्त जागोलाच माहित होत्या. जयला नाही. म्हणूनच तो रागवायचा. कधीकधी मारायचाही. जयला राग यायचा. पण त्या जागोचं गणित त्याला समजायचं नाही. कारण काळ्या मातीतल्या वेदनेतून कोणताच अंकूर शेतकऱ्यांच्या जीवनात फुटत नव्हता.

गावातील लोकांची घरं.. .. .. . त्या घराच्या भिंती ह्या मातीच्या असायच्या. दरवर्षी पावसाळा आला की पावसाळ्यापुर्वी ही मंडळी आपलं घर सवारायची. घराला बाहेरुन भिंतीवर गिलावा द्यायची. कौलं फेरायची व फुटलेली कौलं काढून त्या ठिकाणी चांगलं कौलं भरायची. यातच शंभर सव्वाशे कौलं लागायचे. कुणाला पंचवीस कौलं लागायची.

जागोचं घरही मातीचंच होतं. त्याच्या घराच्या बाजूला चिंचेचं झाड होतं. त्या झाडावर माकडं यायची. ती त्या कौलावर उड्या मारायची. त्यातच त्या कौलांचा अक्षरशः चुराडा व्हायचा. त्यातच काही कौलं उन्हानं तसेच काही कौलं पावसानं फुटायची. त्याला दरवर्षी पंचवीस ते तीस कौलं लागायची. जवळ पैसे नसायचे. तरीही उधारी ठेवून जागो कौलं आणायचा व गडी

माणसाला द्यायला पैसे नसल्यानं स्वतःच तो कौलानं घर शिवायचा. पण एकदा असाच घर शिवताना म्हातारपणाच्या वलयानं तो पडला होता. त्यात त्याचं हाड तुटलं असल्यानं त्याला आता कौलं सवारणं जमत नव्हतं. प्रसंगी त्या तुटक्या घरावर कोणी गडी माणूसही चढायला तयार नसल्यानं आता पावसाळ्याचे दिवस जागोला तसेच ओलाव्यात काढावे लागायचे.

जय शहरात शिकत होता. त्याला गावच्या झळा समजत होत्या. तो मोठा झाला होता. पण तो एवढाही मोठा झाला नव्हता की तो मायबापाला पोषू शकेल. अशातच एकदा पावसाळा आला. भिंत पडली. पण म्हातारपणानं जागोला ती भिंत शिवता आली नाही.

दरवर्षीच माकडं यायची. ती त्या चिंचेच्या झाडावरुन जागोच्या घरावर उड्या मारायची. त्यातच कौलं फुटायची. पण म्हातारपणामुळं व जवळ नसलेल्या पैशामुळं जागोला ते घर शिवता यायचं नाही. दरवर्षीच पावसाळाही येत असे. पाऊस सारखा पडत असे. भिंतीही नजरेसमोर पडत होत्या. त्या भिंतीच्या ढिगाऱ्यात साप विंचू दिसत होते. पण आता ती माती फेकण्याचं किंवा त्या घरात सोयी करण्याचं त्राण ना जागोत होतं. ना तुळसात होतं. ना जयमध्ये.. .. .. .. . जयही जेव्हा जेव्हा गावाला यायचा.

तेव्हा तेव्हा त्याला दुःख व्हायचं व तो स्वप्न बघायचा कि मी जेव्हा कामधंद्याला लागेल. तेव्हा एक चांगलं घर बांधेल. ज्या घरावर बंदरं उड्या मारणार नाहीत.

जागो म्हातारा झाला होता. त्याची प्रकृती ठीक नव्हती. त्यातच एक दिवस त्याची प्रकृती एवढी खराब झाली की तो जातो की काय असे वाटायला लागले होते. तुळसा घाबरुन गेली होती. शेवटी तुळसेनं बैलांना आपल्या नातलगाच्या हवाली करुन त्याला कसेबसे शहरात आणले. शहरात मुलीचं घर होतं. त्या मुलीच्या आसऱ्यानं तिनं आपल्या पतीला सरकारी रुग्नालयात भरती केले.

जागोला सरकारी रुग्नालयात भरती केले होते. बैलं नातलगाच्या स्वाधीन होते. तुळसेला बैलाची चिंता होती. त्याचबरोबर आपल्या नवऱ्याचीही चिंता होती. अशातच रुग्नालयात तुळसेचा नातेवाईक जागोला पाहायला आला. त्यानं जागोला पाहिलं. जागो वाचण्याची कोणतीच चिन्हे दिसत नाहीत हे पडताळलं. त्यातच त्यानं तुळसेला व जयला बैलं विकून टाकण्याचा सल्ला दिला. त्यामुळं अगोदरच वैतागात असलेली तुळसा.. .. .. . नातलगाच्या स्वाधीन केलेली बैलाची जोडी.. .. .. . तिची त्रेधातिरपीट उडाली व तिनं बैल विकून टाकायला लावले.

त्याने ते बैलं कमी पैशात कसायाला विकले व पैसे आणून दिले. हे बैलं विकल्याचे समजताच जागोला त्या मरणासन्न अवस्थेत अत्यंत वाईट वाटले व जागोनं हाय खावून दुसऱ्याच दिवशी आपला प्राण सोडला. असं वाटत होतं की कसायानं ज्या दिवशी बैलाला ठार केलं असेल. त्याच दिवशी जागोनं प्राण सोडला असावा. कारण घरच्या बैलालाही जागो जीव की प्राणच समजत असे.

जागोला भरती केले खरे. पण जागो काही डॉक्टरांच्या उपचाराला प्रतिसाद देत नव्हता. त्यातच सहा दिवसानं जागो मरण पावला. गावी नेण्याची पावत नसल्यानं जागोची मैयत मुलीच्या कडूनच करुन घेवून तुळसा गावी राहायला गेली होती.

जागो मरायला दोन दिवस झाले होते. अश्रू सुकायचेच होते. तिसरा दिवसही पुर्ण व्हायचाच होता. तेवढ्यात वडील बहिण म्हणाली,

"आता काय करणार गावात राहून. विकून टाका शेती अन् घर. आन् या शहरात रावाले. माह्या आडोशाले या. वाटल्यास किराया द्या. "

बहिणीनं आत्मीयतेनं म्हटलं. तिला वाटलं की हे गावात राहतील कसे? गावचं तर घर पडलेलं आहे. परंतू जयला बहिणीचा भयंकर राग आला. त्याला वाटलं की अजूनही बापाच्या मरणाचे अश्रू सुकायचेच आहे आणि बहिणीनं त्यांना घरदार व वावरशेत विकायला लावलं.

जय शहरात राहात होता. पण आता आई एकटी राहात असल्यामुळे त्याला गावलाही राहाणं भाग होतं. त्यातच त्याचं शिक्षण सुरु होतं. पण आता काही शिक्षण शिकून फायदा नव्हता. वडील जेव्हा जीवंत होते. त्यांनी जरी जयला शिक्षणासाठी शहरात टाकलं असलं तरी आता म्हातारपणात जयनं कामाला लागावं असं वाटत होतं. ते त्याला शिक्षण सोड असं म्हणत होते. शालान्त जेव्हा झाली. तेव्हाच वडीलांनी म्हटलं होतं की बापू नौकरी काही लागत नाही. तू कामाला लाग. जय म्हणाला होता की शालान्त कोणी पास होत नाही. मी पास झालोय. मला शिकू द्या.

शालान्त परीक्षा.. .. .. .. मोठी कठीण असायची. कोणी सरासरी पास व्हायचा नाही. पण जय पास झाला होता. पास होण्याची उम्मीद नव्हती. त्यामुळं त्यानं बापाला म्हटल्याप्रमाणे दोन वर्ष महाविद्यालयात शिकायला बापानं परवानगी दिली. खस्ता खात खात बाप जगला.

बारावी देखील जय चांगल्या गुणानं पास झाला. याहीवेळी बाप म्हणाला कि तू कामाला लाग. पण यावेळी जय म्हणाला की बाबा, भल्याभल्याचा फुकटमध्ये मास्तरकीला नंबर लागत नाही. मी दोन वर्ष मास्तरकीचा अभ्यास करतो. मग कामाला लागेल. दोन वर्ष मास्तरकीचे निघून गेले. सरकारी नोकरीची जयने परीक्षाही दिली. त्याला सरकारी नोकरी लागली नाही. कारण सरकारी नोकरीतील तो लेखी परीक्षा पास झाला. पण औपचारीक परिक्षेत नापास झाला. पण त्याला एक शहरात खाजगी नोकरी लागली होती. तिथे तिनशे रुपये महिना मिळत होता. बाप याहीवेळी म्हणाला कि दुसरी चांगल्या दामाची नोकरी पकड. नाहीतर शेती कर. त्या तिनशे रुपयापेक्षा कितीतरी ठिकाणी तुला जास्त वेतन मिळेल. पण जयला वाटायचं की ही आज खाजगी असलेली नोकरी उद्या सरकारी बनू शकते. म्हणून त्यानं नोकरी काही सोडली नाही. त्यातच त्याच वर्षी बापाचा मृत्यू झाला होता.

महागाईचा काळ होता. तिनशे रुपये वेतन पुष्कळ कमी वेतन होतं. तिनशे रुपयानं काही जयचं भागत नव्हतं. त्यातच आईचा प्रश्न. आईही म्हातारी झाली होती. तिच्यानंही काम करणं जमत नव्हतं. जयला विचार यायचा. काय करावं सुचत नव्हतं. त्यातच तो आईला भेटायला गावाला जाणं येणं करायचा.

आई गावाला राहात होती. त्याच त्यी खस्ता झेलीत होती. घरावरील कौलाचा अक्षरशः चुराडा झाला होता. त्यातून पावसाचं पाणी गळत होतं. असा एकही भाग उरला नव्हता की तिथं गळत नसेल. भिंती खचत होत्या. त्यातून डोळ्यासमोर साप विंचू निघायचे. ते परत त्याच ढिगाऱ्यात लुप्त व्हायचे. आईला भीती वाटायची. पण काय करणार. उपाय नव्हता. लेकरु जास्त पैशाच्या पगारावर लागला नव्हता. लेकरु आतापर्यंत शिक्षणातच होता. त्यानं रट्टेगट्टे पाहिले नाही. शोषले नाही. तो कामे कसा करेल? आईच्या डोळ्यासमोर प्रश्न होता. काही उपाय सापडत नव्हता.

अंथरुण चिंब भिजून जायचं. पावसालाही दया येत नव्हती. शेवटी तेच अंथरुण अंगाला लपेटून आई झोपायची. पण कुरकूर करायची नाही आणि कुरकूर तरी कोणाजवळ करणार.

आई आपलं पोट भागवण्यासाठी गावात रोजमजुरीला जायला लागली. गावच्या मंडळीनं सुरुवातीला तिला कामावर येवू दिलं. पण नंतर ती मंडळी ही कसनस करायची. तरुण स्त्रिया तिला टाळून लपून छपून कामाला जावू लागल्या. तरीही तुळसा पाठीमागून जायचीच. तेव्हा मालकही तिला काम व्यवस्थीत करीत नाही म्हणून माळरानात गेल्यावर परत पाठवायचे. कोणी कोणी

दया घ्यायचे. कामावर लावायचे. रोजीही द्यायचे. सायंकाळी सुटी होताच वांगे, मिरचेही द्यायचे. कधीमधी भेदरंही.. .. .. .. .

जय गावावरुन शहरात नोकरी संदर्भानं सायकलं जाणं येणं करायचा. इतक्यात वडील बहिणीच्या पतीची नोकरी गेली होती. तिलाही काय करावं सुचत नव्हतं. त्यांना दुसरं काम करणं जमत नसेल. कारण त्यात कसब नव्हतं. त्यांची उपासमार होत होती. पोरं लहान होती. शिक्षणाचीही होती. वडील भाटव्याला विचार यायचा की लेकरं कशी पोसायची.

लेकरं लहान जरी असली तरी त्यांचं शिक्षण सुरु होतं. त्यांची शिकवणी लावलेली होती. त्या शिकवणीचेही पैसे भरावे लागायचे. त्यामुळं बहिणीचे दोन्ही मुलं सकाळी ब्रेड विकायचे. त्यातून आलेल्या पैशातून आपलं शिक्षण करायचे.

असेच काही दिवस मोठे हलाखीचे काढावे लागले होते बहिणीला. जेवनही चांगलं स्वादिष्ट बनत नव्हतं. तोंडामध्येच घास फिरायचा. शहराची वस्ती होती. महागाई तर होतीच. कधीमधी जय तिथं जेवन करायचा. त्याला तिच्याही परीस्थीतीची कवना यायची. पण तो तरी काय करणार होता. वडील गेल्यानं तोही हतबल झाला होता. त्यामुळं की काय, जय आईला मालकाने दिलेले वांगे, मिरचे कधीकधी भेदरंही आणून तिला द्यायचा. काही

दिवसानं वडील भाटव्यानं प्रेसचा धंदा लावला. त्यानंतर अजून एक धंदा. आता मात्र हळूहळू बहिणीची परीस्थिती सुधारली होती.

जयला विचार यायचा. आपण कामधंदा करावा. आईला रोजमजूरीला जावं लागू नये. बापाच्या राजात कधी आई कामाला गेली नव्हती. पण आता तिला जावं लागते. लोकांचे टोमणे खावे लागते. दरदरच्या ठोकरा देखील. पण त्याला काही सुचत नव्हतं. नोकरी कधी ना कधी परमानंट होईलच असं त्याला वाटत होतं. पण नोकरी हाल्याहाल्या परमानंट होत नव्हती. अन् आईचं दुःख बघवत नव्हतं.

एकदा असाच तो खानावळीत कामाला लागला. आईला पैशाचा आधार होईल म्हणून सहाशे रुपये महिना होता. जयला एवढ्या दुरुन गावावरुन सायकलनं जाणं येणं परवडत नसल्यानं त्यानं खानावळीत काही वेळासाठी जाब पकडला होता. शहरात राहायची व जेवणाची सोय नसल्यानं राहायची व जेवणाची सोय करण्यासाठी.. .. .. . बदल्यात दोनवेळ पोटभर जेवन व एक वेळ नाश्ता आणि सहाशे रुपये महिना होता.

जयचं तरुणपण. तसेच त्याने आजपर्यंत सायकलनं गावाला येण्याजाण्याची केलेली मेहनत, जयचं जेवन चांगल्यापैकी होतं. तो सकाळी नाश्ता तर करायचाच. शिवाय जेवनही भरपूरच

होतं. कधीकधी त्याला जेवतांना मालक पाहायचा. मालकाला तेवढं जेवन खलायचं. कारण मालकाचं तेवढं जेवन नव्हतं. कसं राहणार. एरवी मालक बसल्या बसल्या आदेश द्यायचा. राबायचे हात दुसरेच होते. त्यातच जय त्या खानावळीपासून बऱ्याच लांब अंतरापर्यंत सायकलं मास्तरकीची नोकरी करण्यासाठी जायचा. थकून जायचा. ते श्रमच त्याचे, त्याचं जेवन जास्त नसणार तर काय?

जय या ठिकाणी सकाळी पाच वाजता उठायचा. पाणी मारायचा. झाडू मारायचा. टेबल खुर्ची लावायचा. त्याचा एक सहकारी नाश्ता बनवायचा. यातच त्याचा वेळ निघून जायचा. मग कशीबशी अंघोळ करुन जय सात वाजता शाळेतही पोहोचायचा. दुपारी नोकरीवरुन एक वाजता परत येताच जेवन करायचा व परत कामाला लागायचा. त्यात रात्री साडे दहापर्यंत सतत ब्रेक न घेता काम चालायचं. सुटी मिळायची नाही. त्यामुळं आई कशी असेल याचंही त्याला निरीक्षण करता यायचं नाही. कधीकधी जेव्हा तो गावला जायचा. तेव्हा तेव्हा त्याला मोडलेलं घर भिंती पडक्या असलेलं घर पाहून व ओल्या अंथरुणात असलेली आई पाहून विचार यायचा. वाईटही वाटायचं व कधीकधी त्याला वाटायचं कि

बहिणींना आईला पोस म्हणावं. असाच विचार करीत असतांना एकदा तो बहिणीला म्हणाला.

"ताई, मी माझी पाहून घेईल झोपायची, राहायची सोय. आईला बराच त्रास आहे. तू आईला पोस. मला नोकरी लागेपर्यंत. मला नोकरी लागताच मी आईला घेवून जाईल. "

पण बहिण म्हणाली,

"माझी परीस्थिती वाईट आहे. मी कशी पोषणार. तू हवं तर नोकरी सोड ती. चांगल्या पगाराची नोकरी पकड व आईचं पालनपोषन कर. "

बहिणीची परिस्थिती आताही पाहिजे तेवढी बरी झालेली नव्हती. तीची परिस्थिती पाहता ती आईला पोसू शकत नव्हती. पण मनात विचार केला असता तर ती पोसू शकली असती. पण त्यात एक कारणही असेल. जे कारण न पोसण्याला कारणीभूत ठरलं.

जयला तीन बहिणी होत्या. बहिणींची नजर कदाचित बापाच्या मालमत्तेवर असेल. बाप जेव्हा मरण पावला, तेव्हा घरदार विकून माझ्या शेजारी ये राहायला. असं म्हटल्यावरही जय आणि आई ऐकली नव्हती. कदाचित ते घरदार विकून वावरशेत विकून आलेला पैसा. हा पैसा काही का असेना जवळ राहात असतांना

मागता आला असता असं बहिणीला वाटत असेल. पण आईनं न ऐकल्यानं कसा तिला आधार द्यावा असं बहिणीला वाटलं असावं. आता जे काही भोग आहेत, ते त्यांनाच भोगू द्यावे असंही बहिणीला वाटत असेल म्हणून तिनं पोसण्यासाठी नकार दिला होता. पण तिनं दिलेला नकार पाहून जयला वाईट वाटलं. त्यानं दुसऱ्या बहिणीलाही तसच म्हटलं की आईला पोस. पण ती म्हणाली,

"मायबापांना पोषण्याचा अधिकार मुलाचा असतो, मुलीचा नाही. "

त्यानंतर त्यानं तिसरीला विचारलं. तिसरी बहिणही म्हणाली,

"तुझा भाटवा बरोबर नाही. मी मनात विचार करुनही तुझ्या भाटव्यामुळं पोसू शकत नाही. "

मोठी बहिण खुपच चांगली होती. भाटवाही चांगलाच होता. तिनं प्रसंगी आईला पोसलं नसेल. पण दुखल्या खुपल्याचा आधार होती ती. कधीकधी शहरात राहायचा प्रसंग आलाच तर जय तिच्याच घरी राहायचा. बहिणीला त्रास नको उगाच म्हणून तो गावावरुन भरपूर पोळया बांधून आणायचा. त्याला कधीकधी बुरशीही चढत असे. तेव्हा त्या पोळया खातांना भाटवा म्हणत असे

की ह्या पोळया फेकून दे. परंतू ते अन्न. त्यासाठीच तर त्याचे अहोरात्र कष्ट चालले होते. तो त्या पोळया कशा फेकणार. त्या पोळयात त्यावेळीही वेगळीच चव असायची. तेव्हा भाटवा म्हणायचा.

"तुला अशा पोळया खायच्या असतील तर खा. पण पुढं आम्हाला दोष द्यायचा नाही. "

भाटव्याचं बोलणं जिव्हारी लागायचं. पण भाटवा तरी काय करणार? त्यांचीही परिस्थिती तेवढी हतबल नव्हती.

तुळसा खस्ता खात राहिली. त्याच घरात. ज्या घरातील मातीच्या भिंती पडत होत्या. केव्हा घराचं छत डोक्यावर कोसळेल याचा नेम नव्हता. अशावेळी शेजारची सगळी माणसे जयला सांगत होती की आपल्या आईला सोबत घेऊन जावं शहरात किंवा घर तरी बांधावं. तिच्या खुप गती होत आहेत. पण काय करणार तोही. तो सध्या त्याच्याही खुप गती होत होत्या आणि तो आईला पोसायला सक्षम झाला नव्हता. जवळ पैसाही नव्हता की तो घर बांधू शकेल. त्याला स्वतःच्या दुर्बलतेवर रडू येत होतं.

आईचा जवळचा एक गावातच नातेवाईक होता. त्यालाही लोकं आईबद्दल सांगायचे. तसा तो स्वतःच्या डोळयानं

तुळसेची अवस्था पाहायचा. तिचं ते पडकं घर, त्या पडणाऱ्या भिंती, ते साप, विंचू, ते ओलं अंथरुण, ते घर केव्हा पडेल याचा नेम नव्हता. त्याला तिच्या परिस्थितीची दया आली. त्यानं बैलं तर विकले होते की पुढे ही जनावरं ही मंडळी सांभाळू शकणार नाही याचा विचार करुन. पण त्यानंच जयच्या बापाच्या मृत्यूवेळी चौदावीत धनधान्याची मदत केली होती.

तुळसेची दया येताच एक दिवस तो तिला जबरदस्तीनं आपल्या घरी घेऊन गेला. कारण तुळसा स्वाभिमानी होती. परिस्थितीनं गाजलं म्हणून लाचारी पत्करणारी नव्हती.

नातेवाईकाचंही घर पाहिजे तेवढं चांगलं नव्हतंच. त्यांचीही परिस्थिती पाहिजे तेवढी चांगली नव्हतीच. तेही घर गळायचंच. तिथंही अंथरुण ओलं व्हायचंच. पण काही का होईना आपल्या घरात एकटी राहून सापाविंचूची भीती बाळगण्यापेक्षा तसेच ते घर केव्हा पडेल याची भीती बाळगण्यापेक्षा इथे तिला बरं वाटत होतं. त्यातच एक दिवस त्यांचीही भिंत पडली.

नातेवाईकाची पडलेली भिंत. त्या भिंतीलगत झोपणं, तिथं त्या भिंतीलगत येणारा थंडा वारा. आई कासावीस व्हायची. त्यातच तुळसेच्या घरचा पलंग लोखंडी असल्यानं नातेवाईकानं

त्या पलंगाला पोते लावले व तो पलंग त्या भिंतीलगत आडवा लावला व आपल्या घरात तुळसेला खाली झोपायला मजबूर केलं.

तुळसा बोलू शकत नव्हती. भिंतीलगत गार वारा येणं बंद झालं होतं. पण जमीनीलगत थंडीचं काय?आता ती जमीनीलगतची थंडी अंगाला झोंबत होती. पावसाळ्याचे दिवस यायचे. तेव्हा हीच थंडी जास्त वाटायची. शिवाय लोखंडी पलंगाला पाणी लागून पलंग गंजत चाललेला. पण लाचार परिस्थीतीनं तुळसेला बोलता येत नव्हतं. तिला वाटायचं की यापेक्षा ती आपल्याच घरात सुखी होती. इथे यायला नको होतं. मजबूरीनं तिचा पलंग पडलेल्या भिंतीला लावला. जो गंज पकडून खराब होत चालला आहे. त्यावर बोलूही शकत नाही.

दिवसांमागून दिवस जात होते. तसतशी तुळसा बेचैन होत होती. कधी कधी जयही गावला यायचा. त्याला आईनं सांगताच तोही बेचैन व्हायचा. पण काय करणार. तो हतबलच नाही तर दुर्बलही होता. संधी होती. पण संधीचं सोनं करता येत नव्हतं.

खानावळीत काम करीत असतांना मालक त्याच्या शिक्षणाचे धिंडोळे काढत होता. त्याच्या जेवनाचेही वेटोळे करीत

होता. त्याला लय खाते म्हणत होता. जयला वाटायचं की ज्या जेवनासाठी तो सकाळपासूनच काम करतो. उसंत घेत नाही. त्या जेवनासाठी मालक त्याच्या लाचार जीवनाचे वेटोळे करतो. त्याची मजबूरी समजून न घेता त्याच्या शिक्षणाची ऐसीतैसी करतो. हे काही बरोबर नाही. त्यापेक्षा त्यानं ती खानावळीतील नोकरी सोडण्याचा निश्चय केला.

सहा महिने झाले होते. अजूनही मालकानं पगाराचा पैसा दिला नव्हता. तो एकाचवेळी देणार असं आश्वासन देत होता. आपल्या शिक्षणाची मालकानं दुर्दशा न खपल्यानं जय नोकरी सोडत होता. आपण लाचार असलो म्हणून काय झालं, स्वाभुमान असावा. कोणीही आपला असा अपमान करु नये. मेहनत तर करतो ना. मेहनतीविषयी बोलावं. मेहनत घ्यावी. पण असा अपमान करु नये असं जयला वाटत होतं. जयनं सहा महिने झाल्यावर म्हटलं,

"मालकसाहेब, मी आपली नोकरी सोडून जात आहे. आपण माझ्या सहा महिण्याचा हिशोब करुन मला पगार द्यावा. मला आता आपले बोलणे सहन होत नाही. "

त्यावर मालक म्हणाला,

"कशाचा पगार?अरे तू तर पगारापेक्षाही जास्त खाल्लं. मी देणार असलेला पगार तू तर खाण्यातच वसूल केला. तुला पगार कसा द्यायचा. तू विचार करुन माग. "

मालकाचं ते उत्तर. आधीच परिस्थितीनं गाजलेला जय. मालकाचं उत्तर ऐकून संतप्त झाला. त्याला मालकाचं म्हणणं पटलं नाही. त्याची तळपायाची आग मस्तकात गेली होती. पण काय करणार. लाचार दुर्बल तो अन् त्याची परिस्थिती. त्या परिस्थीतीत कोणी काहीही बोलत होतं. खिल्ली उडवत होतं आणि आता हा मालक पगार दाबायला निघाला होता.

जयनं विचार केला. नियतीच असावी ही. आपले काही पाप असावेत. मागील जन्माचे की जे भोगावे लागत आहेत. जावू दे या पगाराला. मालकाची नियत फिरली, त्याला काय करणार. शेवटी मालकानं पगार नाही देत म्हटल्यावर व जेवनातच पैसे कटले म्हटल्यावर त्यानं तो पगार सोडून दिला व हताश होत खाली मान टाकून मनातल्या मनात चरफडत परिस्थिती आणि मालकाला दोष देत देत तो पावलं चालत होता घाईघाईने. कारण त्याला त्या पाऊलवाटेनं आपलं उद्दीष्ट गाठायचं होतं.

खानावळीतील नोकरी सोडायला तीन महिने झाले होते. त्याला शहरात राहून नोकरी करायची होती. कारण गावाला जाणारा रस्ता बरोबर नव्हता. त्या रस्त्यानं मोठमोठी जड वाहने चालत होती. ती वाहने भरधाव वेगाने चालत होती. त्यामुळं कोणत्या वेळी कोणाचा अपघात होईल हेही काही सांगता येत नव्हतं. याच रस्त्यानं कित्येक अपघात झाले होते. ते जयने आपल्या डोळयानेही पाहिले होते. म्हणून भीती वाटायची. तेव्हा जयला शहरातच राहावसं वाटायचं. कारण नोकरी करायची होती. शाळा संस्थाचालक आश्वासन देत होता कि नोकरी पक्की करणार. फक्त सरकारी अडचण आहे. ती अडचण कोणती असेल हेही जयला माहित नव्हतं. म्हणून तो संस्थाचालकावर विश्वास ठेवून इमानदारीनं नोकरी करीत होता. त्याचबरोबर खानावळीसारखा काही वेळेचे कामदेखील.

अशातच त्याला एका मित्रानं म्हटलं,

"मी जर उद्योग सुरु केला. तर तू काम करशिल का?आपला उद्योग म्हणून सांभाळशील तर तुला पैसेही मिळेल. तुझी त्या उद्योगस्थळी राहण्याची सोयही होईल व जेवणाचीही सोय होईल. "

मित्रावर विश्वास बसला. तसा तो मित्राच्या त्या उद्योगात सहभागी झाला.

तो उद्योग शेतकीसंबंधातील होता. पिकांना लागणारी जैविक खत निर्माण करणारा तो कारखानाच होता. त्या उत्पादनाबाबत त्या व्यक्तीला उत्तम माहिती होती. या उद्योग स्थळी जयपाठोपाठ अजून एक व्यक्ती कामाला ठेवला होता. तो व्यक्ती सकाळी अकराला कामाला यायचा व सायंकाळी पाच वाजता कामावरुन जायचा. म्हणजे तब्बल सहा तास काम करायचा. तर जय सकाळी कारखान्यातून नोकरीवर जायचा व दिड वाजतापासून कामाला लागायचा. त्यामध्ये तो व्यक्ती पाच वाजता कामावरुन गेल्यानंतरही जय तिथंच मुक्कामी राहात असल्यानं रात्री नऊ नऊ वाजेपर्यंत काम करायचा. कधी कधी एवढी मालाची हाक असायची की जयला रात्री झोपायला बारा एक वाजायचा. पण जय डगमगला नाही.

शाळेला उन्हाळयाच्या सुट्ट्या होत्या. जयला आता चोवीसही तास आराम होता. जय कारखान्यात आठ नऊ वाजतापर्यंत काम करायचा. मग रात्री स्वयंपाक बनवायचा. सकाळी तो मजूर येईपर्यंत वेळ असे. तसा तो एकटाच असल्यानं त्यांना पुरेशी झोपही यायची नाही. ते दिवस कंटाळवाणे जायचे.

कारखान्यात रमायचं नाही. कधीकधी तो फिरायलाही जायचा. पण फिरायला तरी किती जाणार!प्रश्न त्याच्यासमोर उभा होता. शेवटी त्याला सुचले. आपण आपले जीवनगाणे लिहिले तर.. .. .. ..

विचार करायचा अवकाश. जयने आपले लेखन सुरु केले. तो चांगले चांगले लेख लिहू लागला. कथा लिहू लागला. कादंबरी ऱ्याही लिहू लागला. हे लिहितांना आता त्याला तो कारखाना कंटाळवाणा वाटत नव्हता. त्याचा वेळही जात होता आणि चांगलं साहित्य निर्माणही होत होतं.

याही ठिकाणी पगार मागताना त्याला पुनरावृत्तीच पाहायला मिळाली.

नोकरी पक्की झाली नव्हती. जय गावावरुन येणं जाणं करीत होता. सकाळी शाळेच्या नोकरीला जावून दुपारी असाच काम करीत होता. कोणी पैसे पचवीत होते. कोणी देत होते. आईही गावाला कामाला जात होती. यामधूनच त्याच्याजवळ काही रक्कम गोळा झाली. त्यानं ठरवलं. शहरात छोटंसं घर बांधाव. गावात बांधून काही उपयोग नाही. तेवढाच खर्च येणार. तसेच आपली नोकरी शहरातच आहे. उद्या पक्की झाल्यावर परत

शहरात जावंच लागेल. शिवाय गावात घर बांधलं तर परत जाण्यायेण्याचा त्रास.

शहरात जयची एक जागा होती. त्याच्या बापानं पोराला होईल म्हणून घेवून ठेवली होती. त्या ठिकाणी बांधकाम करण्याचा निर्णय जयनं घेतला. घर बांधायला त्यावेळी तेवढा पैसा लागत नव्हता. घर बांधायच्या साऱ्या वस्तू स्वस्त होत्या. त्यामुळं जवळपास जेवढा पैसा होता, त्या पैशानं जयनं आपलं घर सुरु केलं. तसा त्यानं एका बांधकाम ठेकेदाराला ठेका दिला. त्यानंही हो हो म्हणत जयची फसगत केली. तेव्हा त्याला हुसकावून लावले. त्यात जयच्या पैशाचा नाश झाला.

जवळचा पैसा संपला होता. काही बांधकामाचं साहित्य उघड्यावर पडलं होतं. ते चोरी जाईल याचीही भीती जयला होती. आईच्यानं आता काम अजिबात जमत नव्हतं. जीव अगदी रडकुंडीला आला होता. कालमं अजून वर गेली नव्हती. तेव्हा रात्रीला जय खुप रडला. मनोमन पश्चात्ताप निघाला त्याच्या तोंडून. तो विचार करु लागला. आता काय करावे. तसा त्याला विचार आला. संस्थाचालकाला मदत मागीतली तर.. .. .. .

शाळेला ग्रँड आली होती. शाळेचं बांधकाम सुरु होतं. तो तसा त्याचवेळी संस्थाचालकाच्या घरी गेला. त्याला

भेटला. विनवणी केली व त्यानुसार संस्थाचालकाने तो परमानंट होताच पैसा घ्यावा हेही ठरलं. तशी त्याची त्या ठेकेदारानं फसगत केली हे लक्षात येताच संस्थाचालकानं त्याला काही बांधकामाचं साहित्य दिलं व तसा एक कमरा तयार झाला. मात्र कमऱ्यात टाकायला भरण. भरणासाठी पैसे कमी पडले होते. संस्थाचालकाला मागून पाहिलं. पण संस्थाचालक आता अजून रक्कम द्यायला नामंजूर होता. काय करावे उपाय नव्हता. परत एकदोन महिने काम केल्याशिवाय गत्यंतर नव्हते.

जय कामाला जात होता. काबाडकष्ट करीत होता. त्याच्या आईनं काम जमत नसल्यानं ती आई बहिणीकडे होती. जयकडे पैसे नसल्यानं तो बहिणीकडे जातच नव्हता. कारण त्याला भीती वाटत होती की बहिण आईला घेवून जा म्हणेल. अन् आईला नेणार कोठे?हा प्रश्न त्याच्यासमोर होता.

ते उन्हाळ्याचे दिवस होते. दुपारी शाळेला सुटी व्हायची. त्या दिवशी जय एका बहिणीकडे गेला. ज्या बहिणीकडे आई मुक्कामाला होती. पाहतो तर काय, ज्या आईनं कामं जमत नव्हती. ती आई माझ्या मुलीच्या घरी झाडं जगायला हवीत म्हणून काठेरी झुडपं तोडून ओढत आणत होती आणि बहिण चक्क झोपलेली होती. जी तरुण होती. जीनं कामं करायला हवेत ती.

जय जेव्हा गेला. तेव्हा त्याला फार वाईट वाटलं. तो आईजवळ गेला. आई रडत होती. तर लोकं सल्ला सांगत होते की इथे तुझ्या आईला फार त्रास आहे. आपल्या घरी घेऊन जा. तिला शेणही गोळा करावं लागते आणि गोवऱ्याही थापाव्या लागतात. स्वतः शांत झोप काढते आणि आई दिवसभर होत नाही तरी कामच करीत असते.

जयनं आईला विचारलं. आईही तशीच सांगत होती. तेव्हा जय म्हणाला,

"तू कामं कशाला करतेय?"

त्यावर आई म्हणाली,

"खायला कोण देईल बेटा. "

आईचं बरोबर होतं. खाण्याचाच प्रश्न होता. उदरातून जन्म घेतांना, लहानाचे मोठं करतांना, त्यांना शिकविताना नव्हे तर औषध पाणी करतांना जी आई आपल्या लेकराने कामं नाही केली तरी तसूभरही ओरडत नाहीत. त्याच आईवर जेव्हा म्हातारपणात परिस्थिती येते. तेव्हाही तिला सुख नसतं. जयला फार वाईट वाटलं व त्यानं ठरवलं की आता काही का असेना आईला इथून आपल्याजवळ न्यायचं. पालनपोषण करायचं. नव्हे तर सुख द्यायचं.

त्याच्याजवळ काही रुपये गोळा झाले होते. त्यानं मलमा बोलावला व दोन दिवसात मलमा टाकून त्या मलम्याला सवान केलं व शेणाचे सारवण देवून आपल्या आईला लगेच आपल्या घरी घेऊन आला.

जय आपल्या घरी आला खरा. पण आता त्याच्या सत्वपरीक्षेला सुरुवात झाली होती. मासिक तिनशे रुपये वरुन त्याला आता चारशे रुपये मिळत होते. त्या इवल्याशा पैशानं भागत नव्हतं. आता शहरात राहून खर्च भागवणे म्हटलं तर तारेवरची कसरतच होती.

जय आपल्या घरी आला खरा. ज्या घरी विजेची सोय नव्हती. म्हणून लवकरच जेवन केलं व ते मायलेकं झोपी गेले. निःशंक मनाने. रात्रभर छान झोप लागली होती.

दुसरा दिवस उजाडला. जयनं अंथरुण उचललं तर पाहतो काय अंथरुणाला उधळी पकडली होती. कशीबशी ती उधळी जयनं झटकून टाकली. पण तसा त्याला विचार आला. काय करावे?उधळीवर मात कशी करावी?जिथे प्रारब्धच फाटलेलं आहे. तिथं जगावं कस?प्रारब्ध काही केल्या आपल्याला सोडत नाही असं त्याला वाटत होतं. कसे जगावे?हा प्रश्न त्याचेसमोर होता. भावना मरत चालल्या होत्या. तसं त्या उधळीवर मात करण्यासाठी

त्यानं एक उपाय शोधला. त्यानं परीसरातून विटांचे तुकडे गोळा केले. आज सायंकाळी ते जमीनीवर पसरवले. त्यावर अ◌ाज अंथरुण टाकलं आणि सुटकेचा श्वास सोडला. त्याला वाटत होतं की आता उधळी लागणार नाही. पण परत जेव्हा सकाळ झाली, तेव्हा मात्र ती उधळी त्या विटाच्या तुकड्याच्या वर चढून अंथरुणावर आली होती.

जयला परत विचार आला. करावं कसं? या उधळीवर कोणता उपाय करावा?जवळ तर पैसे नाहीत. शेवटी त्याच्या मनात विचार आला की वडील बहिणीला पलंग मागावा.

जयनं घर बांधण्यापुर्वी दोन पलंग बनवले होते. एक बहिणीकडे होता. तर दुसरा गावाला होता. गावाला असलेला पलंग नातेवाईकाकडे भिंतीला लावला होता. जवळ पैसा नसल्यानं पलंग आणायला किती रुपये लागते हे माहित नसल्यानं जय बहिणीकडे गेला. पण बहिणीनं तो पलंग देत नाही असं म्हटलं होतं. गावचा पलंग आण असं स्पष्ट सुनावलं होतं.

जयला बरंच वाईट वाटलं. बहिणीचा रागही आला. कारण जे पलंग आणायचे काम फुकटात होणार होते. ते काम गावावरुन पलंग आणतांना पैसे मोजावे लागणार होते. पण परिस्थिती पुढं कोणाचं चालतं. परिस्थिती जेव्हा वाईट असते. तेव्हा

लहानशी मुंगीही हत्तीला नेस्तनाबूत करीत असते. तेच घडत होतं जयच्या जीवनात.

जय पलंग आणायला गावाला गेला. गावच्या नातेवाईकाला आपली कहाणी सांगीतली. त्यानं ती कहाणी ऐकताच पलंग काढून दिला. त्यानंच टेम्पोही पाहून दिला व अत्यंत कमी पैशात टेम्पोवाल्यानं पलंग बहिणीच्या घराजवळ आणून दिला. आता घरी पलंग न्यायचा कसा? जयला वाटलं हा पलंग दोन तीन दिवस बहिणीकडे ठेवू. मग व्यवस्था होताच तो पलंग घरी नेवू. तोपर्यंत लढू उधळीशी विटा गोटे ठेवून. पण बहिण म्हणाली की आपला पलंग आपल्या घरी घेऊन जा.

पुन्हा जयला विचार आला. पलंगाबद्दलचा. शेवटी त्यानं तो जड पलंग सायकलने आपल्या घरी आणला व आता त्याला थोडं बरं वाटलं.

पलंग घरी आणला होता. त्यावर अंथरुण करुन झोपणे सुरु झाले होते. आता घरात उधळी नव्हती. पण गोमा व साप नित्याचे सोबती होते. साप निघायचे पण पाहिजे तेवढी भीती वाटत नव्हती. आईला त्याची सवय पडली होती. अशातच पैसा कमी असल्यानं जयला शहरात कसं जगावं याचा विचार येत होता.

जिथं चारशे रुपये रोजही खर्चाला कमी पडायचा. तिथे चारशे रुपये महिण्यात घर चालवणं मोठं मुश्किल होतं. हे आईला समजत होतं. तेव्हा आई त्या नवीन पडलेल्या सोसायटीतील पालापाचोळा गोळा करायची व त्यावरच त्यांच्या घरची चूल पेटायची. खूप धूर व्हायचा घरात. पण काय करणार? कधी कधी टायरवरही स्वयंपाक केला गेला.

भाजी बनत होती. पोळया आणि भातही बनत होता. पण त्या भाजीत तेल दिसत नव्हतं. पोळया कच्च्या राहात होत्या. भातच अशी वस्तू होती की जी बरोबर शिजत होती. पण निव्वळ भातानं पोट भरत नव्हतं. त्याच्या जोडीला पोळयाही बनवाव्या लागत.

परिस्थिती खुप नाजूक होती. बहिणी घरी येत नव्हत्या. ना कोणता नातेवाईक फटकून पाहात होता. अशातच आईच्या डोळयाला घरात होणाऱ्या धुळीनं कमी दिसायला लागलं. मोतियाबिंदू झाला होता. जयला चिंता पडली होती की जर मोतियाबिंदूनं आई आंधळी झाली तर.. .. .. .. त्यानं आईच्या डोळयाचं ऑपरेशन करायचं ठरवलं.

जयला चिंता पडली होती की आईजवळ राहणार कोण? कारण ऑपरेशन नंतर आईच्या डोळयाला दिसणार नाही.

तेव्हा आईजवळ कोणीतरी राहायला हवा. तेव्हा तो एका बहिणीला म्हणाला,

"आईच्या डोळयाला दिसत नाही. मी तिच्या डोळयाचं ऑपरेशन करायचं ठरवलं. तुला राहावं लागेल. "

पण त्यावर मुलगी म्हणाली,

"कशाला करतेय ऑपरेशन. आता काय म्हातारपणी दिसणार आहे का आईच्या डोळयाला. फुकट ऑपरेशन करुन आईच्या डोळयाला दुखापत करु नकोस. समजा ऑपरेशन साधलं नाही तर.. .. .. . "

बहिण का बरं तसं बोलली, ते काही जयला समजलं नाही. पण त्याला बहिणीच्या त्या बोलण्यावर राग आला. त्याने आईच्या डोळयाचं ऑपरेशन केलं. पण कोणतीच बहिण अॅापरेशनच्या वेळी रुग्नालयात फिरकली नाही.

ऑपरेशन साधलं होतं. आईच्या डोळयाला स्पष्ट दिसत होतं. तशी जयची चिंता मिटली होती. जी आई त्याला आपला संसार उभा करतांना साथ देत आली होती. त्या आईच्या डोळयाला दिसू लागताच जयला फार आनंद झाला होता.

जयची नोकरी पक्की झाली होती. पण पाहिजे तेवढा पगार मिळत नव्हता. तरीही तो खावून पिवून सुखीच होता. त्याच्या आईलाही सुखी दिवस आले होते. पण नियतीला हे मंजूर नव्हतं. तसा आईला अर्धांगवायू मारला होता.

सकाळी जय शाळेत गेला होता. तसा घराकडील एक व्यक्ती शाळेत आला. सांगीतलं की आईला अर्धांगवायू मारलेला आहे. तसं जयला रडू आलं. पण ते अश्रू त्यानं काळजात दडवून ठेवले. ज्या आईनं बाप मेल्यानंतर काबाडकष्ट केले होते. ती आई आज अर्धांगवायूची शिकार झाली होती. जयनं आईला अर्धांगवायू मारल्याचे ऐकताच तो घरी आला. त्यानं आईची स्थिती पाहिली. तसं आईला ताबडतोब सरकारी रुग्नालयात नेलं.

सरकारी रुग्नालय.. .. .. तरीही चांगले उपचार सुरु होते. पण आज दोन दिवस झाले असले तरी आईच्या अर्धांगवायूत काहीच सुधारणा झाली नाही. किती दिवस ठेवावे लागेल याची त्याला चिंता वाटत होती. अशातच एक परिचारीका म्हणाली,

"दादा, अर्धांगवायूवर आपण इथे उपचार करु नका. इथं काहीही उपयोग होणार नाही. आपण ह्यांना गावठी औषध करा. " तसं तिनं त्या गावठी औषध मिळणाऱ्या गावाचे नाव सांगीतले होते.

ते गाव जयलाही माहित होते. पण उद्विग्नतेनं त्याला काही सुचू दिलं नाही व त्यानंतर त्यानं आईला रुग्नालयात आणलं. पण आता वाटलं की आईची इथून सुटी करावी व त्या गावठी औषधी मिळत असलेल्या गावाला न्यावं.

जयनं आईची सरकारी रुग्नालयातून सुटी घेतली व तिला गावठी औषधी देण्यासाठी तिला त्या गावी घेवून गेला. त्या गावठी माणसानं दिलेल्या औषधाने आई पंधरा दिवसातच चालायला लागली होती. जयला थोडसं हायसं वाटलं. तीन महिण्यात अर्धांगवायू पुर्णच बरा झाला होता. पण आता आईला पाहिजे तेवढं सुचत नव्हतं.

आईची पहिल्यासारखी बुद्धी राहिली नव्हती. बुद्धी थोडी कमी झाली होती. ती आता जास्त बोलत होती. ती बडबडतांना त्रास होत होता. पण काय करणार. तिला जास्त बोलता येत नव्हतं. जास्त त्रास देता येत नव्हता आणि ते जपणं जयसाठी गरजेचं होतं.

जयला आपल्या हातानं स्वयंपाक बनवावा लागायचा. कधी पोळया कच्च्या राहायच्या, तर कधी कधी भाजी बिघडायची. तेव्हा जयनं लग्न करायचं ठरवलं.

त्याने अनन्वीत वेदना सहन केल्या होत्या. म्हणून त्याला वाटलं आपलेही दिवस निघावेत. सुख अपार यावं. त्यासोबत पैसा ही. त्यानं आपल्या बहिणींना व लोकांना आपली गोष्ट बोलून दाखवली की मला नोकरी करणारी मुलगी पाहून द्या. परंतू बहिण व भाटव्याचं म्हणणं होतं की अशी मुलगी पाहू नकोस. ती तुला घेवून चालणार नाही. टिकणारही नाही. तू विना नोकरी करणारी मुलगी माग. आम्ही म्हणू ती.

जयनं काही नोकरी करणाऱ्या पोरी पाहिल्या. पण या मुलींनी त्याला नकारच दिला. याचं कारण गबाळेपण. आधीपासूनच पाचवीला पुजलेलं दारिद्र्य आणि त्यातच न सांभाळणारं दुःख आज नोकरी लागली म्हणून जय विसरु शकत नव्हता. आज नोकरी कायमस्वरुपी झाली तरी त्याच्या साध्या राहण्यात फरक पडला नव्हता. तो स्वभावानं चांगला होता. परंतू नव्या युगातील मुलींना चांगल्या स्वभावाची मुले आवडत नव्हती. तर त्यांना फॅशनेबल मुलं आवडत होती. त्यातच या नोकरी करणाऱ्या मुलींनी त्याला नकार दर्शवला. शिवाय त्याचं घरंही तेवढं फॅशनेबल नव्हतं. परिस्थीतीत ती. तो एवढ्या लवकर काही घर बांधू शकत नव्हता. शेवटी त्यानं नोकरी न करणाऱ्या मुलीबाबत नाही म्हणता म्हणता होकार दिला व भाटव्याच्या

मतानुसार एक मुलगी पाहिली. मुलगी सावळी होती. पुष्कळ श्रीमंताची होती. तिला नोकरी नव्हती.

मुलगी नाकनक्षाला व्यवस्थीत होती. तिला नोकरी नसल्यानं जयला तशीही ती आवडली नसली तरी आता होकार देणं भाग होतं. कारण त्याला वाटत होतं की वडील भाटवे त्याला पुढे कोणतीच मुलगी दाखवणार नाहीत. एरवी ती मुलगी त्यांच्या रिश्तेदाराची होती.

जयनं होकार दिला. त्यांनं ती मुलगी पाहिली. तसेच दुसरी बैठकही ठरली. या बैठकीत लग्न पक्क करायचं होतं.

एके दिवशी वडील भाटव्याचा चुलतभाऊ आला. लग्नाचा विचार निघाला व सहजच जयनं म्हटलं की मला नोकरी करणारी मुलगी हवी होती. पण काय करणार नोकरी करणाऱ्या मुली मला नापसंत करतात. म्हणून नाईलाजानं हो म्हणावं लागलं. आता मुलगी पाहिली आणि परत दुसरी बैठकही लागलेली आहे. जायची इच्छा होत नाही. पण जावंच लागेल.

त्यावर भाटव्याचा भाऊ म्हणाला की आम्ही तुला दोरानं बांधून नेवू. तो दोर शब्द व बांधून नेवू शब्द सारखा वापरत होता. तो गंमत करीत होता. पण त्याचं गंमत करणं सहन न झाल्यानं मनात दुसऱ्या बैठकीत जायची इच्छा असूनही जय गेला नाही.

कारण त्याला अपघात झाला होता. फार खरचटलं होतं. त्यामुळं तो जावू शकत नव्हता. जवळ जास्त पैसा नसल्यानं तो रुग्णालयातही गेला नाही. तसेच फोन नसल्यानं तो खरं कारण सांगूही शकला नाही.

नात्यातली सर्व माणसे. काही मित्रमंडळी बैठकीत हजर होते. जय चूक करीत आहे. फार मोठी चूक करीत आहे. हे त्यांना वाटत होते. खरं कारण त्यांना समजलं नाही. ते जयचं दुसऱ्या बैठकीत उपस्थीत न होणं ते त्यांना नाटकच वाटलं. आपण केलेली गंमत आपल्याला भोवत आहे हे भाटव्याच्या चुलत भावाला वाटलं. ती गंमत भोवत चालली होती. वेळ निघून जाऊ लागला. जिथे प्रारब्धच खराब तिथं मती चालत नव्हती. मतीची संपुर्णतः माती झाली होती.

पाहूणे मंडळी वाट पाहात होते जय येण्याची. पण जय काही फिरकला नाही. तसा पाहूण्यांना फार राग आला. त्याचबरोबर मुलीलाही.. .. .. .. मग मुलीचा पारा वाढला व तिनं बोलून दाखवलं पुर्ण पाहूण्यांसमोर की मी एखाद्या भिकाऱ्याशी विवाह करील. पण त्याच्याशी विवाह करणार नाही. कारण हा माणूस खोटारडा आहे. ती तसे बोलली होती. कारण सत्य तिला

माहित नव्हतं. तिचा पुढं अशाच माणसाशी विवाह झाला. जो नोकरीवर नव्हता आणि दारुचं चांगलं व्यसन होतं.

जय सुधारल्यावर भाटव्याकडे गेला. खरं कारण सांगीतलं. पण भाटव्याचा काही त्याचेवर विश्वास बसला नाही. पुन्हा बैठक लावायची विनवणी केली. पण मुलीकडच्यांनीही काही ऐकलं नाही. बहुतेक मुलीचं लग्न जुळलं होतं. अशारितीने जय त्या मुलीशी विवाह होण्यापासून उपेक्षीत राहिला.

जय मुली पाहात होता. पण वडीलभाटवे त्याच्या बैठकीत बसत नव्हते. स्वतःही मुली दाखवत नव्हते. तसा जय परेशान होवून गेला. शेवटी जयनं म्हटलं की आता एकदा तुम्ही बैठकीत बसा. मी त्यानंतर तुम्हाला कधी विनंती करणार नाही. शेवटी वडील भाटव्यानं होकार दिला व जयला आलेल्या निरोपातील एक मुलगी जय पाहायला तयार झाला.

ती मुलगी सालस होती. पण चेहऱ्यावरुनच तिच्या चेहऱ्यावर बारा वाजल्यासारखे भाव दिसत होते. जणू तिची काही लग्न करायची इच्छा नसेल असं वाटत होतं. तसेच तिचं कोणावर तरी प्रेम असेल असंही स्पष्ट जाणवत होतं. पण मायबापाच्या म्हणण्यानुसार ती विवाहाला तयार झाली होती.

त्या तीन बहिणी होत्या. मोठी शिक्षीका होती. ती जयला आधीपासूनच माहित होती. तिच्यासमोर जयनं विवाहाचा आधीच प्रस्ताव पाठवला होता. पण तिनं चक्क नकार देत म्हटलं होतं की मला सरकारी नोकरीतील मुलगा हवा. मी खाजगी नोकरी करणाऱ्या मुलाशी विवाह करीत नाही. तिनं आपला प्रश्न मिटवला होता. तेव्हा याच जयनं आपल्या सरकारी सेवेतील मुलाला तिचा पत्ता दिला. त्यानंतर त्यानं तिच्याशी विवाह केला होता. तो खुश होता. कारण तो तिच्या मनामनानं वागत होता. ही मुलगी त्याची मेव्हणी होती.

मुलगी पाहिली. सर्वजण घरी आले. जयला विचार लागले की मुलगी पसंत आहे का?मग मुलगी पसंत जरी नव्हती तरी जयनं होकार दिला. त्याला माहित होतं की नकार दिल्यास वडील भाटवा पुन्हा मुलगी पाहतांना येणार नाही.

भाटव्यानं निरोप दिला. परंतू त्यांचा निरोप यायचा होता. आठ दहा दिवस निघून गेले. मग दहाव्या दिवशी निरोप आला की आमची ती मुलगी लग्न करायला तयार नाही. तेव्हा दुसरी मागत असाल तर आम्ही तयार आहोत.

ती मुलगी प्राध्यापिका होती. ती एका शाळेत जय सारखीच शिकवीत होती. जसा जय आधी तिनशे रुपयानं नोकरी

करीत होता. तिचं दुसऱ्या एका मुलावर प्रेम होतं. पण ते नंतर कळलं.

जयनं निरोपाबाबत वडील भाटव्याला सांगीतलं. भाटव्यानं म्हटलं की त्यांना निरोप दे की जी मुलगी आम्ही बघितली, ती देत असाल तर लग्न करतो. नाहीतर मी तुमच्या लहान मुलीशी लग्न करायला तयार नाही.

वडील भाटव्याचं बरोबर होतं. त्यानं कित्येक विवाह जुळवले होते. त्यांना अनुभव होता. पण जयला तेवढा अनुभव नव्हता. मग जयची अवस्था कावरली गाय काटे खाय सारखी झाली. त्यानं ही गोष्ट मित्रांना सांगीतली. मित्र म्हणाला की तू हो म्हण. ही मुलगी शिकलेलीही आहे. उद्या तिला नोकरी लागू शकते. भाटवा आज आहे. उद्या नाही. भाटव्याचं काय ऐकायचं. तसंही तुझ्या संकटाचे वेळी भाटव्याचं योगदान काय?

संकटांचा निर्णय होता तो. संकटाला सगळं माहित होतं. ज्या वडील भाटव्यामुळं तो आज उभा राहिला होता. नोकरी करता करता नोकरी परमानंट नव्हती तेव्हा त्यानं कित्येक रात्री आपल्या भाटव्याच्या घरी काढलेल्या होत्या. पण त्या मित्राच्या विष कालवण्यातून तो भाटवा क्षणापुरता वैरी ठरला व मित्राच्या म्हणण्यानुसार त्यानं विवाहाला होकार दिला.

लग्न समारंभ थाटात पार पडला. पण या विवाहाला कोणताच भाटवा वा रिश्तेदार हजर नव्हता. कारण त्यांना हा विवाह मान्य नव्हता. कारण या विवाहात डाव साधला जाणार आहे हे माहित होतं.

सविता नाव होतं तिचं. जिच्या चेहऱ्यावर सुर्याच्या किरणाचं तेज होतं. जी सुर्याच्या तेजाप्रमाणे इतरांना प्रकाशीत करीत होती. अचानक जयला तिच्याविषयी आकर्षण निर्माण झालं. पहिल्याच पाहण्यात. तिनं परिचारीकेचा अभ्यासक्रम पुर्ण केला होता.

ते पावसाळ्याचे दिवस सुरु होते. कोरोनाची साथ सुरु होती. या साथीत जयला मांडीचा आजार झाला होता. त्याची मांडी खुपच फुगली होती. त्या मांडीच्या आजाराचं ऑपरेशन केलं नाही तर अखखा पायच कापून टाकावा लागेल असं कुणीतरी म्हणालं. त्यानुसार जयनं मांडीचं ऑपरेशन सरकारी रुग्णालयात उरकवून घेतलं.

जयच्या मनात परिचारीकेबद्दल संभ्रम होता. परिचारीका जीव घेतात माणसाचा असं वाटत होतं. कारण वडील याच रुग्णालयातून संपले होते. रुग्णालयात कोणी मारत नव्हता.

चांगले उपचार होत होते. पण वडीलांच्या मृत्यूनंतर जयमध्ये जो धाक संचारला होता. त्याला तोडगा नव्हता.

जय जेव्हा भरती झाला. सरकारी रुग्णालयात. तेव्हा तिथं एक वंदना नावाची परिचारीका होती. त्या वंदनानं विचारलं,

"तुमची कास्ट कोणती?"

जात विचारताच जयच्या मनाचा तडफडाट झाला. पण सुंदर मुलीनं जात विचारताच तो प्रश्न विष पचविण्यासारखा वाटला व तो म्हणाला,

"मी चांभार. का बरं?"

"नाही सहज विचारलं. "

"एक विचारु तुम्ही जात विचारली तर.. .. . "

"विचारा. "

"इथं एखादी आमच्या जातीची मुलगी आहे का?"

"तुम्ही माझ्या मनातील संभ्रम हेरला. "

"म्हणजे?"

"अहो, मला तुमच्या संवादातून कळलं की तुम्ही नोकरीवर आहात. तेव्हा मी तुम्ही जर माझ्या जातीचे निघाले

असता तर मी तुमच्याशी विवाह केला असता. तोच प्रश्न तुमच्याही मनात असेल. "

"होय. होताच की. " जय म्हणाला. तसा तो पुन्हा म्हणाला,

"तुम्ही किती अंतर्यामी आहात. तुम्ही माझ्या मनात चाललेले विचार ओळखून घेतलेत. "

"नाही नाही. मी अंदाज बांधला. निशाणा बरोबर लागला. त्याला मी काय करु?माझं काय चुकलं त्यात?"

"बरं ते जावू द्या. एखादी आमच्या जातीची मुलगी आहे का सांगा. "

"हो, हो. नवीनच आली. "

"कोणती?दाखवशील का?"

"कशासाठी?"

"पाहायला कशी आहे. बोलायला कशी आहे?हे पाहायचंय मला. कदाचित विवाहालाही. "

"ठीक आहे. मी तुम्हाला दाखवेल. पण लग्न केल्यास कसे पोसाल?"

"तुच सांगीतलं ना आधी की तुला कळलं आमच्या संवादातून नोकरीबद्दल. "

"हो हो, लक्षातच राहिलं नाही. "

"मी लहान मुलांना शिकवतो. "

"म्हणजे मास्तर नाही का?"

"मास्तरच. "

"किती पगार मिळतो?"

"अगं पोटापुरता मिळतोच. "

"घरी कोण कोण आहेत?"

"आई आणि मी, दोघचं. "

"अंदाजे किती पगार मिळतो?"

"आठ हजार. पण हाती दोनच हजार. "

"बाकीचा पैसा?"

"संस्थाचालकाला देतो. "

"का बरं?"

"आजच्या काळात देणगी दिल्याशिवाय नोकरी लागत नाही. म्हणून देतो. आधी पैसे दिले नाहीत ना देणगी म्हणून. "

"बरं. आम्हाला एवढा वेळ कुणाशी बोलता येत नाही. मी येते उद्याला याच वेळेवर तिला घेवून. "

ती म्हणाली व निघून गेली.

रात्रीचे आठ वाजले होते. ती निघून गेली होती. जयच्या मनात प्रेमाचं अंकूर फुलवून. तिनं आपल्यासाठी नाही तर त्या मुलीसाठी. जी मुलगी त्यानं अद्यापही पाहिली नव्हती.

दुसरा दिवस उजाडला. सकाळचे आठ वाजले होते. आठ वाजता शिप बदलत होत्या. आज मंगळवार होता. वंदना आली होती. त्याचबरोबर ती निरागस चेहऱ्याची सविता. वंदनानं ओळख करुन दिली.

ती सविता प्रिती जिंटा नाईकेची प्रतिकृती. पहिल्याच पाहण्यातून त्यानं तिच्याशी विवाह व्हावा अशी प्रार्थना केली. नाव तर आधीच माहित झालं होतं. ते वंदनानं सांगितलंच होतं. तरीही औपचारीकता म्हणून त्यानं नाव विचारलं. तशी ती म्हणाली,

"सविता बेले. "

सविता जवळ आली. ज्या पलंगावर जय होता. तिच्यासोबत आणखी एक मुलगी होती. ती म्हणाली,

"अहो मिस्टर उठा की. बेड करायचाय. "

तसा तो उठला. अन् पलंगावरुन बाजूला झाला. त्याच्या पायात उभं राहण्याचं त्राण नव्हतं तरीही.. .. .. त्यांनी पलंगपोस केला. तशी ती निघून गेली. असेच आठ दिवस गेले. आठही दिवस ती सकाळी यायची. पलंग सवारुन निघून जायची. पलंग सवारता सवारता जय तिच्याशी बोलायचा. एवढीच तोंडओळख झाली होती.

एक अशीही म्हण आहे की विधीलिखीत कधीच चुकत नाही. जय विधीलिखीत गोष्टी मानत नव्हता. पण योगायोग मानायचा. योगायोग असा आला की जेवढ्या ही मुली त्यानं पाहिल्या होत्या. त्या मुलींनी त्याला ठुकरावलं होतं आणि ज्या मुलीची सरकारी रुग्नालयात मुलाकात झाली होती. ती मुलगी आता त्याला मिळाली होती. त्यानं तिला ओळखलं होतं. जरी तिनं त्याला ओळखलं नसेल. तिला तो आठवत नव्हता. पण त्याला ती पटकन आठवली होती.

नुकतंच साक्षगंध झालं होतं. तसे ते दोघंही एकमेकांना भेटत होते. कोर्टातील फाम भरला होता. आईवडीलांच्या म्हणण्यानुसार तिनं विवाहाला होकार दिला होता.

नावाप्रमाणेच अर्थाचे अनेक अर्थ काढण्यात जय पटाईत होता. तसा तो लेखक बनला होता. त्याचे लेख वर्तमानपत्रात येणे सुरु झाले होते. तसा तो एक दिवस तिला म्हणाला,

"सविता, आपण आता संसारात पडणार. पण संसार म्हणजे काय?"

ती लाजली. सुशिक्षीत कुटुंबातील बारावी शिकून पुढं परिचारीकेचं प्रशिक्षण केलेली मुलगी ती. तिचं वय तेवीस वर्षाचं होतं. ती म्हणाली,

"असं काहीही भलतंच विचारु नका. "

आपलंच काहीतरी चुकलं असेल याचा विचार करुन तो चूप बसला. तसा तो म्हणाला,

"सविता, माझं काही चुकलं का? अगं माझी आई म्हातारी आहे. अर्धांगवायू मारला होता. पण अजूनही व्यवस्थीत झाली नाही. तिची सेवा व माझ्या, तुझ्या येणाऱ्या नातेवाईकांची

सेवा,  त्यांच्या चेहऱ्यावरचं हास्य म्हणजे खरा संसार. मग सांग तू मला की तु त्यांची सेवा करशील?"

तो प्रश्न.. .. . आपल्याला भलताच प्रश्न विचारला गेला असं तिला वाटलं. तरीही ती म्हणाली,

"हे बघा, तुमची आई. तिचं तुमच्याशिवाय कोण आहे. उरले नातेवाईक. ते काय रोज रोज येणार आहेत का. "

जयला समाधान वाटलं. आपल्या होणाऱ्या भावी पत्नीनं आपल्यापुढील अडचण दूर केली. याचं समाधान त्याला झालं. हा प्रश्न तिच्या दृष्टीने महत्वाचा नसेल कदाचित. पण त्याला फार महत्वाचा वाटत होता. म्हणून त्याने तो आधीच विचारला होता.

काळ फँशनेबल होता. या काळात लोकांना पती पत्नी व आपली मुलं एवढंच आवडत होतं. कोण बहिण, कोण भाटवा, कोण नातेवाईक. ते सर्व दूरचे वाटत होते. जयला वाटायचं की भाटव्यामुळं तो पुढे आला. म्हणून त्याला भाटव्याची व बहिणीची सेवा महत्वाची वाटत होती. जरी ते काही कालावधीसाठी व्यवस्थीत वागले नसतील तरीही ते आवडत होते. पण आजच्या काळात सासू कुठली कोण? असं मानणारा काळ होता.

या वातावरणात विवाह होताच बहुतेक मुले आपल्या मायबापाची सेवा करीत नव्हती. जरी मायबापानं त्या मुलाला उन्हातून सावलीत नेले, आपल्या घासातला घास दिला, तरीही पुरुषांना पत्नीच लग्नानंतर आपलं जीवन बदलविणारी वाटत होती. एखाद्या वेळी मुलाला थोडंसं जरी खरचटलं तरी आईला वेदना होतात हे काळ विसरला होता. आई लहान तर पत्नी महान असाच तो काळ होता. त्यामुळं जयला तो प्रश्न लग्नाआधीच सोडवावासा वाटला. तसा तिच्या उत्तरानं तो प्रफुल्लीत झाला होता. कारण हा निर्णय बैठकीत कोणीही सोडवला नव्हता.

जयला माहित होतं की या प्रकारच्या गोष्टी बैठकीत सुटत नाही. त्या दोघांनी मिळून चर्चा करुन सोडवाव्या लागतात. त्यामुळं पुढं समस्या येवू नये म्हणून त्यानं आधीच तो प्रश्न सोडवला होता. कारण त्याला माहित होतं की त्याच्या आईनं किती भोग भोगलेय.

तो शनिवार होता. जयच्या मनात एक नवीन विचार चमकून गेला. सकाळची वेळ होती. सुर्याच्या किरणाचं तेज त्याच्या डोळयात शिरलं अन् पत्रिकेप्रमाणे त्याला सविताची आठवण झाली. विवाह होवून पाच सहा दिवस झाले होते. अजूनपर्यंत पत्नी धर्माचं पालन सवितानं केलं नव्हतं. तिच्या

मायबापानं त्याची अडचण न समजता तिला जयपासून विभक्त केलं. तिचीही त्यात संमती होती. जीवनात पुढे आनंद देणारा पती या पाचच दिवसात तिला परका वाटला की काय?असं त्याला वाटत होतं. त्याला तडपवीत ती ठामपणे निघून गेली होती.

जयनं रेडीओ लावला होता. तो आवाज परीसरात फिरत होता. थोडा मनाला सांत्वना देत होता. तरीही तिची आठवण मनातून जात नव्हती. त्याच्या मनाला कसलाही दिलासा देत नव्हती. त्याच्या मनात वेगवेगळे विचार होते. एक विचार असाच होता कि तिला आणायलाच जायचं नाही. कारण राक्षसासारखे घेवून जाणारे ते मायबाप त्याला पापी वाटत होते. त्यानं रितसर लग्न करुनही. कारण त्याला लग्नानंतरचं आणणं नेणणं समजलं नव्हतं.

लग्नानंतर एक क्षणही पत्नीपासून दूर राहण्याची इच्छा कोणत्याच पतीही होत नाही. काही घटस्फोटाला यातूनच अंकूर फुटतात. हेच कारण पुढे जयच्या घटस्फोटाला कारणीभूत ठरले. कारण समाजबंधनातून मोकळी झालेली सविता नामक स्त्री. दोन दिवसासाठी का होईना. तिला मायबापानं दूर नेलं. तो तळपत होता एका तहानलेल्या हरिणीसारखा. दिवस मोठ्या मुश्किलीने निघत होते. आजचा दिवस कसा कटेल याचा त्याला विचार येत होता.

कदाचित आताच सासुरवाडीला जावून तिला आणावे असं त्याला वाटत होतं.

शनिवारच तो. शनिवारी कोणताच बाप मुलीला पाठवित नाही असा घाट होता. म्हणून त्याला स्तब्ध बसावे लागले होते.

जशी स्थिती जयच्या मनात होती. तशीच स्थिती काहीशी सविताच्याही मनाची होती. पण मायबापासमोर तिच्याही समोर उपाय नव्हता. पण ती जयला दोषी मानत नव्हती.

जयला वाईट वाटत होतं. तसं साक्षगंधापासून तर आजपर्यंत त्यानं तिच्या मनामनानं सर्व गोष्टी केल्या होत्या. स्वतःच्या जीवनाचा आनंद त्यानं बघितला नव्हता. त्याने घरी दोन कमरे बांधलेले असतांनाही तिच्या सुखासाठी त्यानं आपलं स्वतःच्या हक्काचं घर सोडलं होतं व तो किरायानं राहायला गेला होता. त्याला शाळेत भेटणारं अल्प वेतन, त्या वेतनात भागणार नसलं तरी तो किरायानं राहात होता.

ती शनिवारची सायंकाळ त्याच्या जीवनात अतोनात दुःख घेवून आली. साडेसहा वाजले होते. त्याला करमत नसल्यानं तो मित्राच्या घरी गेला. तेव्हा वहिणीनं म्हटलं,

"तुमचं लग्न झालंय ना. आता इथं कोणतं काम आहे?तुम्ही उद्यापासून इथं यायचं नाही. नाहीतर मी तुमच्या पत्नीला सांगेन. "

मित्राची पत्नी आपल्याला अशी का बोलते हे जयला समजेना. त्यानं विचारलं की वहिणी आपण असे का बोलता?त्यावर वहिणी म्हणाली कि आजपासून इथं यायचं नाही.

वहिणी असं का बोलत असावी?जयला प्रश्न पडला. तो तिथून निघून गेला. त्याला फार वाईट वाटलं. तसा तो विचार करु लागला. पण कारण समजलं नाही.

दुसऱ्या दिवशी सकाळीच मित्र घरी आला. तो म्हणाला,

"मित्रा, राग मानू नकोस. काल आमचं भांडण झालं होतं. "

"कशासाठी?" जयनं विचारलं.

"अरे, मी माझ्या मेव्हण्यासाठी मुलगी पाहायला नाही गेलो ना म्हणून. ती म्हणत होती की त्या जयचं लग्न करण्यासाठी धावता आलं आणि आता माझ्या भावासाठी मुलगी पाहायला नाही जाता येत का? त्यावरुन आमचं भांडण झालं. "

जयला समजल होत की वहिणी का बरं तसं बोलली असेल. पण आता वहिणीच्या म्हणण्यानुसार त्याचे संबंध तुटले होते. तो त्या मित्राच्या घरी जावू शकत नव्हता.

मित्र तो. भावापेक्षाही मोठा वाटत होता. त्या मित्राच्याच म्हणण्यानं जय लग्नाला तयार झाला होता. लग्नामुळेच तो त्याला जीव की प्राण समजत होता. लग्नापूर्वी त्याने मित्राची भरपूर कामे केली होती. मित्रानेही त्याची भरपूर कामं केली होती. अगदी त्याची नोकरी परमानंट करण्यापासून. कारण तो संस्थाचालकाचा पुतण्या होता.

जयला करमत नसल्यानं तो तिथं गेला होता. त्याचं नवीनच लग्न. संसार ही कसा करतात तेही त्याला माहित नव्हतं. अशातच मित्राच्या पत्नीनं मित्राला तोडून टाकलं होतं. तो सविता शी नीट आजपर्यंत बोलला ही नव्हता. ऐनवेळी असा प्रश्न. यांनी आपल्याला सांभाळून न्यायला हवं होतं. पण.. .. . हे उलटच झालं असं त्याला वाटत होतं. त्यामुळे त्यानं त्या दिवशी निर्णय घेतला की कोणावर विसंबून राहायचे नाही. आपली कामं आपण करायची.

झालेली चूक वहिणीच्या नंतर लक्षात आली होती. पण आता वेळ निघुन गेला होता. तीरातील बाण आणि तोंडातून

निघालेला शब्द कधीच मागं हटणार नव्हता. तसं तिच्याही बाबतीत घडलं होतं.

अचानक त्याची नजर ड्रेसिंगटेबलकडं गेली. तसा विचार आला मनात. ड्रेसिंगटेबल आपलं सौंदर्य जोपासण्याचं साधन. पण ती माझं जीवन आरशासारखं फुलवेल का? की मधातच स्वतःला आरशाचा पाश्वभाग बनवेल. त्याच विचाराच्या चक्रव्युहात आज त्याला झोप लागली नव्हती.

आज त्याला दोन दिवसाची आलेली सविता गोड वाटत होती. ती मार्ग दाखविणारी वाटत होती. ज्या आईनं त्याची तहानभूक सांभाळली. त्या आईसाठी त्यानं पत्नी केली होती. मोठ्या भाटव्यानं आयुष्याचं गणित जुळवून दिलं होतं. शहरात शिकायला आणलं होतं. पण आज सर्वकाही मिळाल्यावर ते परके वाटायला लागले होते. ज्यांनी जयसाठी कष्टाचं चीज केलं होतं. त्या बहिण भाटव्याच्या अपेक्षावर पाणी फेरत तो या नव्या नवील्या सवितासमोर झुकला होता.

साक्षगंध झाल्यावर जेव्हा पहिल्यांदा सविता घरी आली. ती आईच्या पाया पडली. तेव्हा आईला अश्रू आवरले नाही. तशी आई म्हणाली,

"सुनबाई, माझ्या लेकरानं खुप कष्ट झेलले. तू माझ्यी मुलाला सांभाळून घे. भावाबहिणीसारखे राहावे. त्यातच मला आनंद आहे. "

"मी सगळं सांभाळून घेईल. तुम्ही काळजी करु नका. "

तिनं आईला म्हटलं. आईनंही त्याच्यासाठी काबाडकष्ट केले होते. आपली पिल्लू मोठं व्हावं. त्याला सुखाचे दिवस प्राप्त व्हावे. असं आईला वाटत होतं. म्हणून त्यावर तिनं म्हटलेले सांभाळून घेईल हे शब्द तिला सुखद धक्का देवून गेले.

सुरुवातीचा काळ अतिशय धामधुमीचा होता. नवनवीन लग्न झालं होतं. या नवीन समयी परिस्थीतीशी कसं जुळवून घ्यावं याचा विचार जयला येत होता. त्यातच फार मोठा अपेक्षा असल्या तरी त्या अपेक्षावर पाणी फेरल्या जात होतं. सर्वात पहिला प्रश्न होता दुःखाचा. ती दुःखी तर नाही ना असं त्याला वाटत होतं. ती हसत दिसली नाही तर जय तिला विचारायचा,

"अगं, काय झालं तुला. स्वस्थ तर नाही ना वाटत. "

"पोटात दुखत आहे आज. "

"दवाखान्यात चलते का?"

"नाही थोडेसेच दुखते. "

"जास्त झालं म्हणजे?"

"नाही होणार. थोडंसच दुखते. "

तो चिंतेत पडायचा. त्याला वाटायचं की ती सुखात जगलेली. तिला वेदना व्हायला नकोत. त्रास व्हायला नकोच.

तेवीस वर्षाची होती सविता. घरात सर्वात लहान असल्यानं तिला बाळी म्हणत. ती अल्लड वागत होती. व्यवहारीक ज्ञानाची माहिती नव्हती तिला. तिची लग्न करायचीही इच्छा नव्हती. तशी तिची तयारीही नव्हती. आपल्या बहिणीचं लग्न आपल्या आधी होईल असं तिला वाटत होतं. त्यामुळं तिला स्वयंपाक ही कसा करावा याचं ज्ञान नव्हतं. आयतं जेवन तिला मिळत होतं. वडील बहिणच स्वयंपाक करुन घ्यायची. पण जेव्हा तिनं आपलं लग्न होणार हे ऐकलं. तेव्हा ती काळजीत पडली. आता आपल्याला स्वयंपाक शिकणं भागच आहे. असं तिला वाटलं व साक्षगंधानंतर ती स्वयंपाक शिकली होती.

सविताला तिचा बाप घेवून गेला होता. तो चिंता करीत घरी बसला होता. त्याला लग्नाआधीचा प्रसंग आठवला. एकदा भेटीदरम्यान त्यानं विचारलं,

"सविता, स्वयंपाक बनवता येते तुला?"

"होय. का बरं?"

"तुझ्या बाबांनी सांगीतलं तुला स्वयंपाक येत नाही म्हणून. सांभाळून घ्याल. "

"मग तुम्ही काय म्हटलं?"

"मी म्हटलं, घेईल सांभाळून. त्यात काय. "

"म्हणजे तुम्ही पत्रिकेत लिहिलं त्यानुसार तर. "

"होय. तसंच समझ. पण मला सांग तुझा बाप का बरं तसं म्हणाला असेल?"

"त्यांना वाटलं असेल की जावई काय म्हणतात ते ऐकून घ्यावं. कदाचित तुमची परीक्षा घेतली असेल त्यांनी. "

ती बोलून गेली. तो क्षण आज आठवत होता.

सविता तब्बल पाच दिवसानं घरी आली होती. तिच्या बापानं आणून दिलं होतं. जयच्या मनात फार राग होता. तो बरोबर सासऱ्याशी बोलला नाही. त्या रात्री तिनं आपल्या वडीलाचा स्वयंपाक बनवला. तसे ते जेवले व आपल्या घरी निघून गेले. तसं त्यानं म्हटलं,

"किती आठवण येत होती मला. अन् का गं तू किती पागल की तू येण्याचा हट्ट धरला नाहीस. का? तुला माझी आठवण येत नव्हती का?"

"येत होती. पण माझं कुठं चालत होतं तिथं. आई बाबाच्या इच्छेसमोर मी कशी बोलणार. म्हणून मी आले नाही. पण तुम्ही यायला हवं होतं ना. "

"मी कसा येणार. माझी तर गोची होत होती. अन् मला एक सांग. या पाच दिवसात काय केल?"

"स्वयंपाक शिकले. "

"म्हणजे? मी समजलो नाही. "

"मी स्वयंपाकच शिकले. "

"पण तू तर मागेच सांगीतलं होतं ना की तुला स्वयंपाक येते म्हणून. "

"मी खोटे बोलले. तुम्हाला वाईट वाटू नये म्हणून. "

"कशाचं वाईट वाटेल. "

"तुम्हाला माहित नाही. मी स्वयंपाक केव्हा शिकले. साक्षगंधानंतर आई म्हणायची. बाळी स्वयंपाक शिक. मी लक्षच द्यायची नाही. मग सेवया चारण्यानिमित्य माझ्या मोठ्या आईकडं

जेव्हा गेली. तिनं मला फक्त चटणी करणं शिकवलं. माहित आहे. मला भाजी येत नसल्यानं पहिल्या दिवशी चटणीच केली होती मी. आता आईला म्हटलं, भाजी शिकव. आईनं मला या पाच दिवसात भाजी शिकवली. "

"का बरं एवढे दिवस तू स्वयंपाक शिकली नाही?"

"मी सर्वात लहान लाडाची. मला वाटत होतं मोठ्या ताईचं लग्न होईल. पण झालं उलट माझंच झालं. पण आता सांभाळून घ्या. माझ्या हातचा काही स्वयंपाक चुकला तर माफ करा. "

सविताचं बोलणं काळजाला झोंबून गेलं. पण आज बनविलेल्या स्वयंपाकानं वाटत नव्हतं की तिला स्वयंपाक येत नसावा. ते जेवन रुचकर झालं होतं. अजूनही हाताचा सुगंध हातावर घमघमत होता.

घरी आई जय व सविता असे तिघंच जण होते. दिवसभर जय आपल्या नोकरीवर जायचा. आईला सवय होती. पण सविताला सवय नसेल असं तुळसेला वाटलं. कंटाळवाणं वाटत होतं. त्यातच आईनं जयला म्हटलं,

"बापू, आपल्या घरात एक टिव्ही घेवून टाक. सुनबाईला बोर वाटत असेल. "

आईनं मुलाला केलेला प्रश्न. पण तो प्रश्न सविताला बोचून गेला. तिला वाटलं. आईनं टाँट मारला. माझ्या वडीलांनी सर्व काही आंधनात दिलं. टिव्ही दिला नाही म्हणून. त्यामुळं सविता त्या दिवसापासून आईचा राग करायला लागली. तिच्या म्हणण्यानुसार सवितानं आपल्या बापाला म्हणून टिव्ही घेवून मागावा. असं सविताला वाटलं व तिनं सासूचा राग धरुन बापाच्या मागं लागून जुना टिव्ही घ्यायला बाध्य केलं.

साक्षगंध झालं होतं. तरीपण ते दोघंही भेटले नव्हते. आठ दिवस पुरते निघून गेले होते. तशी तिची आठवण येत होती. तसा जय रविवार येताच तिला भेटायला गेला. तशी त्या रात्री त्याला झोप आली नव्हती. केव्हा तिला भेटतोय असं त्याला वाटत होतं. कारण तिला मिळविण्यासाठी त्यानं आपल्या नातेवाईकांचीही पर्वा केली नव्हती.

बाहेर लख्ख प्रकाश पडला होता. त्या संधिप्रकाशात चिमण्यांचा चिवचिव आवाज कानावर आला. त्या आवाजाने परिसरातील शांतीला चिरुन टाकले. तसा आज तो लवकर उठून तिला भेटायला गेला होता. तसं त्यानं तिला फिरवायला नेलं होतं. भेटीदरम्यान सविता म्हणाली,

"काहो, तुम्हाला राग येते का?"

त्याला तसा राग यायचा. तो परिस्थीतीचा नेहमी राग करायचा. पण पत्नीनं विचारलेला प्रश्न. तो अवाक् झाला व म्हणाला,

"मला राग  येतो. तसा राग पाहिला तर मला परिस्थितीचा येतो. मी फार कष्ट शोषलेत. जीवाचं रान केलं. कधी कांदाभाकर खाल्ली. कधी बुरशीगत पोळयांही. कधी रस्त्यानं येतांना अपघातही पाहिले तर कधी काळया अंधाराचा विळखाही. मला त्या पावसाचाही राग येतो. ज्या पावसानं माझं गावचं घर पाडलं आणि राग येतो त्या माकडांचा. ज्या माकडामुळं माझं घर पडलं. पण मला सांग तू हा प्रश्न का केला?"

"मला तुमचा अभ्यास नको का? तुम्ही स्वयंनिर्णयी व्हावं. स्वतःचे निर्णय स्वतः घ्यावे. असं मला वाटतं. " ती बोलून गेली.

ती जशी पाहायला सुंदर होती. तशी बोलायलाही. जयला तर तिच्याशी बोलतच राहावसं वाटत होतं. तशी ती नवनवीन असल्यानं बोलायला आवडत होतं त्याला. तिनं तसं म्हटल्यावर त्याला हायसं वाटलं. आपल्या भावी पत्नीच्या तोंडचं हे वाक्य त्याला सुखदता देवून गेलं.

पुढे वटपौर्णिमा होती. सविताचं माहेर हे त्याच शहरात होतं. ज्या शहरात जय राहात होता. तिला वटपौर्णीमेला वड पुजायला जायचं होतं. जय म्हणाला,

"तुझी इच्छा आहे तर जा वस्तीतील लोकांसोबत वड पुजायला. "

पण ती म्हणाली,

"मी माहेरी जाणार व आपल्या आईसोबत वड पुजायला जाणार. या वस्तीतील बायांसोबत जायला मला लाज वाटते. "

तोही मानायला तयार नव्हता. तिही मानायला तयार नव्हती. जयचा तिला राग येत होता. पण ती चूप बसली होती. तसाही जय देव धर्म मानत नव्हताच. त्यामुळं त्याला फरक पडत नव्हता. पण पत्नीचं मन.. .. .. ती तर नाराज झाली होती ना. त्याचं काय?शेवटी सायंकाळचे चार वाजले व त्यानं सविताला सासूकडे नेलं. तिथं ती तिच्या आईसोबत वड पुजायला निघून गेली होती.

जयनंच सविताला माहेरी नेलं होतं वड पुजायला. तेव्हा निघतेवेळी तिची आई जयला म्हणाली,

"जावई, माझी मुलगी बारीर झाली अािण तुमची आई व तुम्हीही लठ्ठ झालात. "

"आई, हे लहान दूधाचा पाकीट आणतात. "

"हे पाहा जावई, तुम्ही मोठ्या दूधाचा पाकीट आणत जा. आमची मुलगी दूध पिणारी आहे. "

ती दूध पिते की अजून काय पिते हे जयला माहित नव्हतं. तसं सवितानंही त्याला सांगीतलं नव्हतं. त्याच शब्दाच्या उत्तरादाखल जय म्हणाला,

"मला काय माहित ही दूध पिते की अजून काही. मला माहित असतं तर म्हैसच घेतली असती विकत. " त्यावर तिची मोठी बहिण जिचं लग्न झालं नव्हतं. जिनं संसार पाहिला नव्हता. ती म्हणाली,

"हे बघा, आम्हाला तुमच्यासारखे छक्के पंजे समजत नाहीत. "

जयच्या मनात विचार आला की त्यानं आजपर्यंत सविताला कोणत्याच गोष्टीची कमी केली नव्हती. तरीही त्या ठिकाणी त्याला असं ऐकावं लागत आहे. त्यावर ही आपली पत्नी असूनही चूप बसली आहे. तिही आईकडूनच बोलते. म्हणत नाही

की आई, मला त्यांच्या घरी सगळं बरोबर आहे. माझ्या मनामनानं कारभार चालत आहे. कारण जयचा तिला कोणताच त्रास नव्हता.

ती बारीक होण्याची व छक्क्यापंज्याची गोष्ट ऐकताच कोणताही व्यक्ती त्या ठिकाणी भडकला असता. तेच जयच्या बाबतीत घडलं.

आधीच मनात जळफळाट. त्यात सासुचे टोमणे. जयसोबतचे असे दुरावे. लग्नाच्या दिवशीपासूनच जयच्या मनाची झालेली वाताहत. त्यातच सविताचं असं वागणं, त्याच्या मनात तिच्याबद्दल असुया निर्माण करीत होतं. अशातच तो आषाढीचा सण येणार होता.

आषाढीचा सण पुढे होता. तिचं माहेर त्याच शहरात. वडसावित्रीला तो तिला घेवून गेला होता माहेरी. तशी ती नेहमीच आपल्या माहेरी जात असे व मायबापांना भेटून येत असे. पण हा आषाढीचा सण त्यांच्या जीवनाच्या रिंगणाचं तात्कालिक कारण ठरलं. तसं तर तो देवधर्म मानतच नव्हता. त्याला वाटत होतं की दोन दिवसावर आषाढी आहे. अशात तिनं माहेरी जावं. पण ती हट्ट करीत होती की ती आठ दहा दिवसांपूर्वी पासूनच माहेरी जाणार. त्यानं तिला धमकीही देवून पाहिली. पण ती ऐकली नाही. शेवटी तिचा बाप तिला न्यायला आठ दिवसापूर्वीच आला.

सासऱ्यानं काही त्याला कसेही करुन पाठव म्हटले नाही. वाटल्यास त्यांना नंतर पाठवीन असे तो म्हणू शकत होता. पण जयनं तसं केलं नाही. त्यानं तिला दहा दिवसापूर्वीच पाठवून दिलं. कारण तिला धडा शिकवायचा होता.

दोन दिवस उरले होते आषाढी पौर्णिमेला. अशात जयनं एक पत्र लिहिलं. तसा त्याला लिहायचा भारी छंदच होता. त्यानुसार भडकून उठलेला सासरा ते पत्र दाखवत आला व त्यानं त्या पत्राची शिकायत केली. त्यावर जय म्हणाला,

"माझी पत्नी मला आणून द्यावी. वाद संपला. मी माझी पत्नी परत यावी म्हणून पत्र पाठवलंय. "

शेवटी त्या पत्राच्या अनुषंगाने सविता जयच्या घरी दोन दिवसानं आली. तिच्याही मनात भयंकर राग होता. जयबद्दल असुया निर्माण झाली होती.

जयला नेहमी वाटत होतं की या सवितानं आपल्याला मकान सोडायला लावलं. बहिणी हिच्याचमुळं तोडल्या. नव्हे तर हिच्याचमुळं तो आता संसाराला लागला. पण आतातरी तिनं आपला हेका सोडून संसार बघावा. मागील गोष्टीचा विचार करावा व मला समजून घ्यावं. पण दुरावे दिवसेंदिवस वाढत चालले होते. तिही समजून घ्यायला तयार नव्हती. तोही समजून घ्यायला तयार

नव्हता. त्यातच वडसावित्रीच्या दिवशी तिच्या आईनं मारलेला टाँट त्याला आठवत होता. तसं त्या मुलीनं म्हटलेलं वाक्यही आठवत होतं.

आषाढीचा सण.. .. .. . जातांना सविता मुजोरी करुन गेली होती. जावयांची इच्छा नसेल तरी चालेल. जावयांना त्रास पडला तरी चालेल. पण मुलीला माहेरी न्यायचं धोरण सासऱ्यानं अंगीकारलं होतं. आमचा जावई सुखी तर मुलगी सुखी म्हणणाऱ्या तिच्या माहेरकडील मंडळींनी तिचं फक्त सुख पाहिलं. आपल्या मुलीला कमालीचं दुःख असावं असं त्यांना वाटत होतं. तिच्या मनात विष पेरणं त्यांनी सुरु केलं होतं. त्यामुळे तिचं क्षणोक्षणी हेकड वागणं वाढत चाललं होतं.

सासरा एका सरकारी नोकरीवर होता. त्याला वाटत होतं की जावई लोभानं का होईना, पोरीच्या मनामनानं वागेल. म्हणून तो म्हणत होता की मला तीन मुली आहेत. तीन जावई येणार. मी तिघांनाही माझी संपत्ती समान देणार. परंतू त्यांना माहित नव्हतं की त्यांचा जावई जय काही लोभ करणारा नव्हता.

सासरा जरी सरकारी नोकरीवर असला तरी त्यांना दारुचं व्यसन होतं. त्यात त्यानं कमविलेली पुर्ण संपत्ती तशीच गेली होती. एक पैसा शिल्लक पडत नव्हता. फक्त एक घर होतं. तेही

टिनाचं होतं. जयनं बांधलेल्या घरासारखंही नव्हतं. तरीपण भाव मात्र जास्त होते. तसेच ते घर जिथं होतं, तिथं डांबर रोड होता. पण जयच्या घराकडे जायला रस्ताच नव्हता.

जयला आता लग्न केल्याबद्दल पश्चाताप येत होता. पत्नी असूनही स्वतःच्याच हातानं कित्येक दिवस भाकरी भाजाव्या लागत होत्या. लग्न केल्यानंतर आपल्याला सुख मिळेल या आशेनं केलेलं लग्न. पण त्या आशेवरच विरजण पडलं होतं.

ती नेहमी सासर माहेर करीतच होती. अशातच ती कधी आठआठ दिवस येत नव्हती. आज पोळयाचा सण होता. घरी माहेरी जाण्यावरुनच वाद झाला होता. सकाळची ड्यूटी होती. तिनं रात्रीच म्हटलं होतं की बैलजोडी पुजनाला माहेरी जाणार. पण उद्या मी अजिबात माहेरी जावू देणार नाही. असं सविताला जयनं समजावून सांगीतलं होतं. पण ती ऐकत नव्हती. त्यामुळं जयचा पारा वाढला व त्यानं तिला एक थोबाडीत लावली.

सविताला एक थोबाडीत पडताच तिचा जीव कासावीस झाला. तिला भयंकर राग आला. ती सकाळी उठली नाही. जय सकाळी उठला. अंघोळ प्रातःविधी उरकवला व तो आपल्या ड्यूटीवर गेला.

तो ड्यूटीवर जाताच ती उठली व तिनं त्या पोळ्याच्या दिवशी पुऱ्या आणि भजे बनवले व तिही मन शमविण्यासाठी आपल्या मोठ्या आईकडे न सांगता निघून गेली.

जय दुपारी शाळा सुटताच घरी आला. त्याला स्थिती कळली. त्याला वाईट वाटले. त्याला वाटले की ही रात्रीचा प्रकार सांगायला गेली असेल. तेव्हा हिला आता आल्यावर जाब विचारु.

दुपारी तीनच्या सुमारास ती आली. आपल्या बापाला व आपल्या भाटव्याला घेवून. त्यांनी झालेल्या प्रकाराबाबत विचारणा केली. त्यांना जय उत्तर देवू लागला. पण ते ऐकण्याच्या नादात नव्हते. तेव्हा जय म्हणाला,

"आता ही कितीही सोन्यासारखी असेल तरी मला नोको मला. "

जयने बोललेले शब्द. रागाच्या भरात त्याने ते शब्द बोलले होते. पण त्याला सायंकाळी पश्चाताप येत होता. आपण असं करायला नको हवं होतं असं त्याला वाटत होतं. त्यांनीही रागाच्या भरात माणूस काहीही करु शकतो. हे समजून आपल्या मुलीला माहेरी नेलं होतं. दोन दिवसानं जेव्हा आणलं. तेव्हा दोघांचा वाद शमला होता.

जयच्या सासऱ्यावर दिड लाखाचं कर्ज होतं. ते नंतर कळलं होतं. तिला जेव्हा जयनं ड्यूटीवर लावून दिलं तेव्हा. तिही पगार कमवीत होती. जयही कमवीत होता. तो तिच्याजवळ पैसा ठेवीत होता. पण एक दिवस तिला हिशोब विचारल्यावर नकळत तिच्या तोंडून शब्द फुटले की माझ्या वडीलावर दिड लाखाचं कर्ज आहे. कदाचित त्यांनी मला लुटण्यासाठी तर मुलगी दिली नसेल. जयला वाटलं व त्यानं आता आपला पगार तिला देणं बंद केला होता.

भांडण झालं होतं. ती आता माहेरीच होती. जय निराश होता. अशा निराशेत कुठेतरी गावाला जावून हवामान पालटवून यावं असं त्याला वाटलं व तो दूर गावी असलेल्या महादेवाच्या यात्रेला गेला. तिथून परत आल्यानंतर त्याला पुन्हा सविताची आठवण आली व तो आपल्या पत्नीला भेटायला तिच्या घरी गेला. विचारलं,

"सविता आहे?"

"होय, तिला बरं नाही. "

"काय झालं?"

"ती गरोदर आहे. "

"किती दिवस झाले?"

"दोन महिने. तुम्हाला सांगीतलं नाही का?"

"नाही. मला माहितच नाही. "तसा तो परत म्हणाला,

"मी न्यायला आलोय. "

".. .. .. .. "कोणी काहीच बोललं नाही. तसा तो म्हणाला.

"मी न्यायला आलोय. "

"ती येवू शकत नाही. "

"का बरं?"

"तिला स्वस्थ वाटत नाही तेव्हापर्यंत ती येणार नाही. "

"बरं मी चालतोय. "

तसा तो निघाला, मनाला दोष देत. आपलंच चुकलं याचा विचार करत.

तो विचार करीत होता. त्याला शेजारच्या वहिणीची गोष्ट आठवत होती. त्यांनी दवाखान्यात न तपासताही बाळाला जन्म दिला होता. बाळ कसं गुटगुटीत होतं. पण आजच्या मुली.. .. .. .. डॉक्टरकडे जावूनही मुलं गुटगुटीत होत नाहीत. शेजारच्या चंदूला मागील पाच वर्षापासून मुलबाळ नव्हतं. तर त्या एका

शिक्षक मित्राला मुलबाळच झालं नव्हतं. आज लग्नाला पंधरा वर्ष झाली होती. त्याला ती गरोदर असल्याचा फार आनंद झाला.

एक दिवस मधल्या माणसाचा निरोप आला. आपल्याला तुझ्या सासऱ्यानं बोलावलंय. निरोपाप्रमाणे जय सासऱ्याच्या घरी गेला. बोलणं सुरु झालं होतं. सासरा म्हणत होता.

"पोरगा काही चांगला निघाला नाही. शंकेखोर आहे. बदमाश आहे. मारकुंडाही.. .. .. . आता आम्हाला सोडचिठ्ठी हवी. त्याचबरोबर आमचा जेवढा पैसा लग्नाला लागला. तोही व्याजासह हवाय. "

ते सासऱ्याचे खड़े बोल. ते ऐकताच जयचा तिळपापड झाला. काय झालं ते त्याला समजेनासं होतं. ती आपलं माहेर घट्ट चिकटून होती. तिला हेही माहित नव्हतं की लग्नानंतर आपलं नाव मिटतं. पतीचं नाव लागतं. कारण अजूनही त्यावेळी जमाना बदलला नव्हता.

लग्नानंतर मायबाप पोरींना सांभाळून घेत नाहीत. कधीकधी भांडण करतात. हेही जयला माहित होतं. एकत्र राहिल्यास भांड्याला भांडं लागणारच हेही जयला माहित होतं. पण

त्यांचं म्हणणं होतं की जयनं तिच्या पोटातील बाळाला आपलंच आहे हे म्हटलं नाही.

उत्तरादाखल तो म्हणाला की हा वाद आला कुठून?पोटातील बाळ हे कुणाचं आहे कुणाचं नाही हा प्रश्न उपस्थीत झाला कसा? त्यावर सासरा म्हणाला की आपण हिला दवाखान्यात पैसे लावायला तयार नाही. त्यावरुन वाटतं की तुम्ही तिच्या पोटातील बाळाला आपलं मानत नाही. जय म्हणाला,

"हे बघा, सविता तुमच्या घरी आहे. मी पैसे कसे लावणार?आपण माझ्या घरी पाठवा. मी लावेलच पैसा. अन् तुम्ही जर तसं समजत आहात तर तुम्हाला शंका आली कुठून? तुम्हाला शंका येणे याचाच अर्थ डाळीमध्ये काहीतरी मिसळलं आहे. "

"आपण साफ साफ बोलावं. "

"हे बघा, मला वाद करायचा नाही. आपण माझी पत्नी माझ्यासोबत पाठवून द्यावी. "

"आमच्या मुलीला तुमच्याकडे फारच त्रास होतो. आम्ही आमची मुलगी पाठवणार नाही. "

"ठीक आहे. नका पाठवू. पण तिचा जोही काही खर्च लागेल. तो मी देणार नाही. कारण ती काही माझ्या घरी नाही. "

"कसे नाही देत तर तेच आम्ही बघणार. आम्ही कोर्टातून वसूल करु. "

"ठीक आहे. जसं तुम्हाला वाटते तसं करा. " जयनं म्हटलं व तो मधस्थासोबच माघारी फिरला. मनात भयंकर विचारांचं काहूर माजलं होतं.

दोन तीन दिवस झाले होते. तो बहिणीकडे गेला होता. तशी बहिण बोलायला लागली,

"तू आपल्या मनाने लग्न केलं. आता त्याचे भोग तुलाच भोगावे लागतील. या प्रकरणात आम्ही काहीच बोलू शकत नाही. " तसा तो माघारी आला.

त्याला जीवनाचा वैताग आला होता. तरीही तो जगत होता. आपल्या आईसाठी. ज्या आईला आज अर्धांगवायू तर होताच. शिवाय तिनं जीवनात बरेच कष्ट केले होते. तिला सुख हवंय म्हणून तो जगत होता.

एक दिवस असाही उजाडला. सविता मध्यस्थाला घेवून आली. म्हणाली,

"मला यांची तक्रार पोलिसस्टेशनला टाकायची आहे. मी आता याक्षणी तक्रार द्यायला जात आहे. "

जयला वाईट वाटलं. जिला तो चांगला समजत होता. ती त्याच्या जीवावर उठली होती. पोलिस तक्रारीचा सरळ अर्थ होता की त्याची नोकरी खाणे. नोकरी गुन्हेगारी सिद्ध होईपर्यंत जात नव्हती. पण जयला ह्या गोष्टी तेव्हा माहित नव्हत्या. शिवाय या पत्नीपतीच्या आपसी भांडणात कोणाची चूक आहे हे न पाहता सरळसरळ पतीलाच अटक होत होती. त्याची जमानत देखील होत नव्हती. तेव्हा जय थोडा घाबरला. पण त्यानं ते चेहऱ्यावर दाखवलं नाही. तसा तो म्हणाला,

"तू नोकरी खाण्यापेक्षा मीच राजीनामा देतो आणि कुठेही निघून जातो. आईला बहिणीकडे नेवून ठेवतो. "

सासू म्हणाली,

"नेट लागली काय पोसाचा. अरे नोकरी पाहून दिली पोरगी तुले डुकरा. भिकारी होतास. चाटू चमच्यापासून सारं काही दिलं. सर्वी जिंदगी बसवून दिली. "

"तुमच्यामुळं जिंदगी बसली का? नोकरी तुम्ही लावून दिली का?गँस तुम्ही घेवून दिला का? तांदूळ, गहू, तेल मीठ तुम्ही पुरवता काय? अन् किराया तुम्ही देता काय?सकाळी दूधाचा पुडा

आणल्यास तो माझ्या म्हाताऱ्या आईलाही देत नाही प्यायला. हो, मी भिकारी आणि डुक्कर जर होतो. तर माझ्यासारख्या भिकाऱ्याला तुम्ही मुलगी का दिलीत?तुम्ही याचा विचार करायला पाहिजे होता. तुम्ही मुलगी दिली माझी लाखो रुपये किमतीची शेती पाहून. तुम्ही मुलगी दिली मला कोणतेही शौक नाहीत हे पाहून. इतकच नाही तर तुम्ही मुलगी दिली माझी नोकरी पाहून. "

"तुम्ही म्हणता शौक नव्हता. लग्नाच्या पहिलं तुम्हालाही शौक होता. "

"मग तुम्ही मुलगी दिलीच कशी?अन् तुम्ही जसं मोठ्या जावयाचे नातेवाईक तोडल्या. त्याची आई तोडल्या. तसं मला म्हणता काय?पण मी सांगून ठेवतो की तुम्ही कितीही काही कराल तरी मी माझ्या आईला सोडणार नाही. मी तिच्यापासून दूर जाणार नाही. "

असं म्हणताक्षणी जावई उठला. ज्याला लग्नासाठी मुलगी जयनंच सांगीतली होती. म्हणाला,

"चाल सविता उठ, यानं तुमच्या बरोबर माझाही अपमान केला. याला असं सोडायचं नाही. याला आपण पोलिसस्टेशनलाच देवू. "

साळभाऊ का चिडला हे जयला समजत नव्हतं. तसा तो आईला पोषत नव्हताच. नातेवाईकही त्याच्या घरी जात नव्हते. कारण तो सासुच्या घराशेजारीच राहायला गेला होता. दोघंही पतीपत्नी जरी नोकरीला असले तरी सासऱ्याला रिटायर्ड झाल्यावर मिळणाऱ्या मालमत्तेवर ते टपले होते. तसं जयचं नव्हतं. जयचा स्वाभिमानीपणा पाहून तो चिडला होता.

"जा जा पोलिसस्टेशनला जा. जो आपल्या आईची सेवा करु शकत नाही. तो काय सासूसासऱ्याचं करेल. "जय म्हणाला.

साळभाऊ सविताला चिथावत होता. जशी तिच त्याची पत्नी होती. जाता जाता सविता म्हणाली,

"आठ दिवसानं या न्यायला. "

जयला आश्चर्य वाटलं. जी मुलगी क्षणापुर्वी आपली तक्रार पोलिसस्टेशनला करतो म्हणते, ती आठ दिवसानं आपल्याला न्यायला बोलावते कशी? तरीही तो गप्प होता. एकीकडे नोकरी सुटण्याचा विचार तर दुसरीकडे पोसायची नेट लागला का म्हणणे. ह्या साऱ्या गोष्टी त्या दिवशी जयला विचार करायला भाग पाडणाऱ्या वाटल्या.

सविताला आणण्यासाठी त्यानं बरेच प्रयत्न केले होते. पण सविता आली नाही. तेव्हा नाईलाजानं त्यानं ती केस महिला सेलला टाकली.

महिला सेलच्या तारखा सुरु झाल्या होत्या. ती सुरुवातीला महिला सेलला आलीच नाही. त्यानंतर नोटिस काढण्यात आला. पोलिस तिच्या घरी गेला. नोटिस देवून परत आला. महिला सेलला तिला बोलावण्यात आलं. विचारणा केली गेली.

तिनं सेलला आपली बाजू सांगीतली. त्या महिला अधिकारी बाईनं ऐकून तो गुन्हेगार नाही हे तिला वाटलं. तशा तारखा सुरु झाल्या होत्या.

"बाई तुला नांदायचं आहे का?" महिला सेलची बाई म्हणाली.

".. .. .. .. . " सविता गप्प होती.

"बाई, तुला सोडचिठ्ठी हवी आहे का?"

".. .. .. .. . " ती गप्पच होती.

तिचं चूप राहाणं पाहून बाई जयला म्हणाली,

"काहो, तुम्हीच तर तिला ठेवायला तयार नाही असं तिचं म्हणणं आहे. "

"बाई, मी ठेवायला तयार नसतो तर केस टाकली असती का? आताही ती यायला तयार असेल तर मी इथूनच नेतो. शिवाय हिनं लिहून मागीतलेले 'बाळ माझे आहे' हे शब्द तुमच्यासमोर लिहून दिले असते का?"

"तू का बरं नांदायला जात नाही?"

"हा मारत असतो नेहमी. गंगा जमुनात जातो. अन् महत्वाची गोष्ट हा बलत्कार करतो. यांनी सहाशे रुपयाची बाई ठेवली आहे बाहेर. अन् मलाच दुसऱ्यासोबत लटकली आहे असं म्हणतो. "

"काहो साहेब, हे असं का म्हणता?"

"अन् यांना वीस वीस रुपयात बाहेर मिळते म्हणे. मला फक्त मोलकरीण म्हणत असतात. "

सविता बोलत होती. ती रागात होती. तिला काय बोलावं ते कळत नव्हतं. तसा जय म्हणाला,

"ताई बघा, मी जर सहाशे रुपयाची बाई ठेवली असती तर मला लग्न करायची काय गरज होती?अन् वीस रुपयात

माणसाची शारिरीक इच्छा पुर्ण झाल्या असत्या तर माणसानं लग्न का केलं असतं. तसंही पाहिलं तर आताही लग्नानंतर फरशी पुसणे, पाणी भरणे ही कामं मला करावीच लागतात. "

"हे खोटं बोलतात. "

"ताई, मी जर खोटं बोलत असेल तर वस्तीतील लोकांना विचारुन घ्या. माझं स्वतःचं घर असून यांनी म्हटल्याप्रमाणे मी किरायाची रुम करुन राहतो. मला सांगा हिनं लग्नानंतर तिथं राहायला हवं नव्हतं का? अन् आता तर मी माझ्या स्वतःच्या घरी जाणार आहे राहायला. "

"का गं तू का किरायानं कमरा करायला लावला?"

"तिथं चिखल असते पावसाळ्यात. "

"ताई आज माझी नोकरी शहरात आहे म्हणून ठीक आहे. जर ही नोकरी दूर कुठेतरी जंगलात चिखलात असती तर.. .. .. . "

"का गं, त्यांचं काय चूक आहे. खेड्यावर लोकं गुढघाभर चिखल तुडवीत जात नोकरी करतात. माहित आहे का तुला. "

"ताई, मीही नोकरी करते. रात्री जावं लागतं मला. "

"ताई, माझा पगार आम्हा तिघांना पुरेल एवढा आहे. सोड म्हणावं नोकरी. तशीही मीच लावून दिली तिला नोकरी. ताई ही जर येत नसेल तर मला परवानगी द्या. मी माझ्या राहत्या घरी जात आहे उद्या. "

"ठीक आहे. तुम्ही आपल्या घरी जावू शकता. "

"ताई, पण ती लग्नापुर्वीची अट आहे. "

"ताई, ही येत नाही राहायला. मग मी फालतूचा किराया बसवून काय करु?"

"ठीक आहे. जायचंच आहे घरी तर उद्या जावू शकता. "

"ताई, माझं आंधण?"

"सोडचिठ्ठी घ्यायची का तुला?"

"नाही. "

"मग. "

"हे तोडफोड करतात. "

"आता तोडायचं नाही हिचं सामान. अन् तोडलं तर पैसे भरुन द्यावे लागतील. "

तसा तो त्या अधिकारीला म्हणाला,

"हे बघा ताई, हिच एक नवसाची मुलगी नाही की हिला मी पाळण्यात झोके देणार. ते माझं स्वतःचं आणि हक्काचं घर आहे. तिथं कोणत्या गोष्टीस मनाई नाही. मायबाप काही जन्माला पुरत नाहीत. ते जेव्हापर्यंत जीवंत असतात, तेव्हापर्यंत चांदी असते. पण जेव्हा ते जातात, तेव्हा समजतं. जेव्हा ही म्हातारी होणार ना. तेव्हा कळेल की आपण कसं वागायला हवं होतं. कोणीही पोसायला पुढं येणार नाही. स्वतःचं लेकरु देखील. आपण स्वतः आपल्या पायावर कु-हाड मारु नये. एका शुल्लक चुकीसाठी आपणहून आपली जिंदगी बरबाद करु नये. "

"चोपड्या गोष्टी नका सांगू. "

जय सांगत होता. पण मध्येच तिनं व्यत्यय आणला. तसा तो चूप झाला. तिच मग काही वेळानं बोलली,

"ताई, चाबीचं कसं करायचं?"

"पोलिसस्टेशनला तक्रार टाकायची चाबी हरवली म्हणून. "

"पण चाबी तर हिनंच नेली. "

"तरीही तक्रार टाका. दूधाचं पाणी होवू द्या. "

"ताई हे लैंगीक शोषण करतात. "

"त्या ताई काय समजायचं ते समजल्या. त्यांनी तो विषय छेडायचा टाळला. तशा त्या म्हणाल्या,

"ही चिठ्ठी घ्या व यात जे डॉक्टर लिहिले आहे. त्याच्याकडे जा आणि तपासणी करुन या. जा आता. पुढच्या तारखेला तपासणी करुनच या. "

ते बाहेर निघाले. तसा तारखेदरम्यान तो तिला तीन चार वेळा लैंगीक शोषणाच्या रिपोर्टबद्दल म्हणाला, कारण जयमध्ये खोट नव्हती. पण ती काही केल्या तपासणी करायला गेली नाही. ती म्हणत असे.

"मी परिचारीका आहे. मला सगळं माहित आहे. गरज तुम्हालाच आहे. तुम्हीच जा. "

लैंगीक तपासणीची गरज तिलाच होती. तिनंच मुद्दा उकरुन काढला होता. हे प्रकर्षानं जयला जाणवत होतं.

ती तशी पटकन ती उठली व भाटव्याच्या गाडीवर बसली. त्याच्या खांद्यांवर हात ठेवत. हे सर्व लोकांनी पाहिलं होतं. कारण ती दरवाज्याच्या बाहेर निघणार. तोच सविताला चक्कर आली होती. तेव्हा तिला जयनंच पाणी पाजलं होतं.

ती गेल्यावर लोकांना कोण कसं ते समजलं व त्याला लोकांनी म्हटलं,

"तुम्ही स्वतः सक्षम नाही. तुमच्या लाचारीचा फायदा ती घेत आहे. अहो चक्क तुमच्यासमोर तुम्हाला दाखवत भाटव्याच्या गाडीवर तेही त्यांच्या दोन्ही खांद्यांवर हात ठेवून जात आहे. गाडीवर बसणं ठीक आहे. पण हात ठेवणे. हे विचित्र वाटतं. हं लग्नाआधी ठीक आहे. पण लग्नानंतर.. .. .. .. पतीच्या खांद्यावर हात ठेवणं ठीक आहे. पण भाटव्याच्या खांद्यावर. ही शंका येणारी गोष्ट आहे राव. अन् चक्कर ही आला असता तर पटकन उठून ती गाडीवर बसून गेली नसती. राव ती नाटक करण्यात माहिर आहे. तुम्ही पुढे जपून राहा. "

"ती कोणाशी तरी लटकली असेल. म्हणूनच अशी वागत असेल. त्याशिवाय कोणी असं वागत नाही. तुमच्यासोबत राहायला तयार नाही असं दिसते. "

तो काय समजायचं ते समजला व आपल्याच प्रारब्धावर अश्रू ढाळत घरची वाट चालू लागला. मनात प्रश्न होता की तिला माझ्या आईला मारलेल्या अर्धांगवायूचीही दया का येत नसावी?

तिनं पोलिसस्टेशनला जायची धमकी जरुर दिली होती. पण त्या दिवशी काही ती पोलिसस्टेशनला गेली नाही. पण जयला तसंच वाटत होतं की ती पोलिसस्टेशनला जाईल व नोकरी जावू शकेल. तिचा काही भरवसा नव्हता.

घराकडील लोकं त्यांच्यावर हसत होते. लोकं तिच्यामुळं त्याला काहीबाही बोलत होते. तिच्या त्या लैंगीक छळ म्हणण्यानुसार त्यांना हसायला मोकळीक मिळाली होती. कारण ती पत्नी असल्यानं तिला लैंगीक छळ म्हणणं आणि त्याची तपासणी करायला चाल म्हटल्यावरही न जाणं कुठंतरी तिचं चुकत आहे हे दर्शवत होतं. अशातच घराकडील एकजण म्हणाला,

"गुरुजी, तुम्ही सुरुवातीपासून आपली सत्ता आपल्या हातात ठेवायला हवी होती. जुनी माणसं उगाच म्हणतात का पायाचली चप्पल पायात ठेवावी. तुम्ही तिचा लाड केला. ती आता डोक्यावर बसली. आतापर्यंत तुम्ही तिच्या मनानं केलं. आता तुम्ही तिला धाकात ठेवण्याचा प्रयत्न करताय. खरंच आता ती दबणार तरी आहे काय? तिला मायबापाचा आधार आहे. तिच्या सर्व गरजा पुर्ण होत असाव्यात. कोणीतरी फ्रेंड असावा की तो तिची लैंगीक गरज पुर्ण करीत असावा. मायबाप मानसिक गरज पुर्ण करतात. तर

ती स्वतः पैसे कमवीत असल्यानं तिची आर्थिक गरजही पुर्ण होते. पण तुमचंच बघा.

ती तिची गरज पुर्ण करणारे मंडळी प्रसंगी काम संपलं की तिला हुसकूनही लावतील. तेव्हा तिला तुमची आठवण येईल. संसाराची जाणीव होईल. पण तेव्हा वेळ निघुन गेलेली असेल. गुरुजी, तुम्ही लवकर सोडचिठ्ठी घ्या. नाहीतर ती पुढं सोनं, नाणं, पैसा, आडका सारं घेवून जाईल. तुमच्या आडून. तुमच्या आईला काय समजते. एवढंच नाही तर तुमची नोकरीही खावून बसेल. हे बघा, तुम्ही तुमची नोकरी सुरक्षीत ठेवा. तुम्हाला नोकरी असेल तर हिच्यासारख्या शंभर बायका मिळतील. आम्ही तुमच्या पाठीशी उभे आहोत. "

जयनं मनात विचार केला. सोडचिठ्ठी हा यावरचा पर्याय नाही. कारण हिला सोडलंही तरी प्रारब्धात जे लिहिलं आहे. तसंच होईल. दुसरीही अशीच मिळाली तर.. .. .. .. जिला आपलंसं करण्यासाठी एवढं केलं. तिच्यावरच खटला भरायचा. तोही सोडचिठ्ठीचा. त्याला ती गोष्ट न पटणारी होती. म्हणूनच त्यानं कोर्टाची पायरी चढण्याऐवजी महिला सेलकडे धाव घेतली होती.

जयला गमत नव्हतं. पदपदी तिचीच आठवण यायची. काय करावं समजायचं नाही. सुचायचंही नाही. त्याच्या मनात तिच्या मिलनाची चिंता सतवायची. ती केव्हा केव्हा पाहायला मिळते असं वाटायचं. कारण तिच त्याचं पहिलं प्रेम होतं. आजपर्यंत त्यानं कधी कोणावर प्रेम केलं नव्हतं. बापानं व भाटव्यानं म्हटलं होत की पहिलं आपलं जीवन बनवायचं. नोकरी मिळवायची. नोकरी असेल तर सतरा पोरी मागं लागतील. पण फुकट प्रेमात पडून आपलं भविष्य बरबाद करायचं नाही. म्हणून त्यानं आपलं आयुष्य घडविताना कोणाकडं ढुंकूनही पाहिलं नव्हतं आणि जेव्हा नोकरी मिळाली. तेव्हा थेट लग्नच ठरलं होतं.

तिला भेटायची चिंता त्याला स्वस्थ राहू देत नव्हती. अशातच ज्या ठिकाणी त्यानं तिला नोकरीवर लावून दिलं होतं. तो तिथं तिला भेटायला गेला.

केवळ संसार हा सासरच्या गोष्टी माहेरी सांगण्यामुळं व माहेरच्या लोकांनी तिला प्रेमानं समजावून सांगण्याऐवजी भडकविल्यामुळं वाया जात होता.

महिला सेल. बऱ्याच लोकांना या महिला सेलनं समजावून त्यांचा संसार बसवला होता. त्यामुळं जय महिला सेलला गेला. तिनंही त्या ठिकाणी आपली तक्रार नोंदवली. गाडी

आणि टिव्ही दिला नाही म्हणून त्रास देते. पण ती तक्रार करण्या आधीच तिला कंटाळा वाटू नये. घरी करमावं म्हणून जयनं टिव्ही घेतला होता. गाडीही घेतली होती. तसेच कोणत्याच वस्तूंची मागणी केली नव्हती.

तिच्या आरोपपत्रात पुष्कळ सारे मुद्दे होते. कोणा वकीलाचा सल्ला घेवून तिनं आरोपपत्र लिहून घेतलं असावं हे प्रत्यक्षदर्शी लक्षात येत होतं.

सविता चांगली होती. ती घरी चांगली वागायचीही. पण जेव्हा जेव्हा ती माहेरी जायची. तेव्हा तेव्हा ती भडकून यायची व जयसोबत भांडण करायची. मग त्या भांडणात अश्लील शिव्याही निघायच्या. शिवाय आईच्या बद्दलही घाणेरडे बोलायची. आपल्या पतीसोबत झोपायला सांगायची. जयला हे सहन व्हायचं नाही. त्याला वाटायचं की ज्या आईनं उदरातून जन्म दिला. त्या आईला असं बोलणं शोभत नाही. पण त्याच्याजवळ उपाय नव्हता.

"रांडेसारखा बोलते. माझ्या मुलीच्या मागं मागं फिरते. " सासऱ्याचे शब्द होते ते. जयला ते बरे वाटत नव्हते. पण त्याला त्यावर तोडगा कसा काढायचा तेही सुचत नव्हतं. त्यातच सासऱ्यानं म्हटलं की गर्भात असलेला मुलगा त्याला पाडून टाकायचं.

जयची त्यावर सही हवी होती. जयला भीती होती की ती विना सहीनंही बच्चूचा गर्भपात करेल. पण आता जयला कोणीतरी सांगातलं होतं की त्याची तक्रार महिला सेलला आहे. ती तिच्या मनात असूनही गर्भपात करु शकणार नाही. जर केलाच तर तिच फसेल.

जयनं गर्भपाताला नकार दिला. तसा त्यांनी त्यावर दुसरा पर्याय काढला. कारण मुलीला फक्त लग्न करायचं होतं. लग्न झालं हे दाखवायचं होतं. त्या लग्नाच्या बंधनात कोंबडीसारखं अडकायचं नव्हतं. परंतू काळानुसार तिला लवकरच गर्भही राहिला होता. त्यामुळं ती परेशान होती. जेव्हा त्यांना समजलं की गर्भपाताला जयची परवानगी नाही, तेव्हा त्याची डी एन ए चाचणी करायची. कारण उद्या खावटी मिळवितांना त्यांना काही समस्या निर्माण व्हायला नको. तशी तिही गोष्ट त्यांनी जयजवळ बोलून दाखवली. जर जयनं नकार दिलाच तर आपण विजयी झाले. पण जयही कुठं हार मानणार होता. तो सत्यानं वागत होता. सत्याला संकट झेलावंच लागते हे त्यालाही माहित होते. तसा तो डी एन ए चाचणीलाही तयार झाला.

डी एन ए चाचणी.. .. . तिच्या मायबापानं म्हटलं तर होतं. पण उद्या त्या चाचणीत आपण हरलो तर.. .. .. .. हा प्रश्न

त्यांनाच पडला होता. शेवटी ती डी एन ए चाचणीही फोल ठरली. कारण तिला शंका असल्यानं तिनं त्या चाचणीला नकार दिला होता.

जय हा सत्य बोलत होता पुर्वीपासूनच. त्याला खोटं बोललेलं आवडत नव्हतं. सविता पदोपदी खोटं बोलत होती. एक खोटं लपविण्यासाठीच दुसरं खोटं. पण ते खोटं पटत नव्हतं. कारण ती त्या बोलण्यावर ठाम राहात नव्हती. त्यामुळं सहजच लक्षात येत होतं की ती खरी बोलते की खोटी. लैंगीक छळाचा आरोप तिनंच केला होता. पण ती तपासणीला आली नाही. डी एन ए तिनंच करायचं ठरवलं होतं. पण तिनं त्यालाही नकार दिला होता. क्षणाक्षणाला बदलणारे हे विचार. यातच जयला मानसिक त्रास व्हायचा व रोज रात्री डोकं दुखत राहायचं. पण आपले हेही दिवस निघून जातील याचा विचार करीत तो जगत होता.

ती स्वतःच खोटं बोलत होती. पण जयला खोटं बोलणं सोडा म्हणत होती.

गणपतीचं जेवन होतं तिच्या घरी. सासरा सांगायला मधल्या माणसाच्या घरी आला होता. त्यानं जावयाला जेवन करायचं सांगणं टाळलं होतं. पण मधला व्यक्ती म्हणाला,

"जयला सांगीतलं का जेवायचं?"

"नाही. "

"मग त्याला नाही सांगीतलं तर मी कसा येणार?"

"बरं ठीक आहे. सांगतो. "

सासऱ्यानं जेवनाचं आमंत्रण सांगीतलं. पण त्या आमंत्रणात ते का बरं सांगीतलं ते रात्री कळलं होतं. जेव्हा तो मधला माणूस त्याला स्वतः होवून न्यायला आला होता. त्याला हे वाटत होतं की जय जेवायला येतो की काय. कदाचित त्याला वाटत होतं की जय जेवायला येणार नाही. म्हणून तो स्वतः न्यायला आला होता. तेव्हा रस्त्यातून जातांना त्यानं जयला त्याच्या सासऱ्यासोबत झालेला वार्तालाप ऐकवला होता.

जेवन झालं व त्या रात्री तो काहीही न बोलता मधल्या माणसासोबत माघारी आला.

गणपती उत्सव निघून गेला होता. जयला तिचीच आठवण येत होती. तशी महिला सेलला केसही सुरु होती. तिला आणायचं कसं? हा प्रश्न जयला पडला होता. कारण केस. महिला सेलची ताई रागावणार असं वाटत होतं. त्यातच त्याला आठवलं. सवितानं मागे न्यायला या म्हटलं होतं. तसा तो तिला एक दिवस वेळ काढून न्यायला गेला.

सकाळची वेळ होती. तिची अंघोळ झाली होती. तिनं केसं वाळत घातले होते. तसा जय म्हणाला,

"अगं मी न्यायला आलोय. "

"मी येत नाही. "

"अगं तुच मागं म्हटलं होतं की न्यायला या. म्हणून मी आलोय. "

"नाही येत तिथं. तुम्ही दुसरीकडे रुम करा किरायाची. मी तिकडे येणार. "

"अगं नीट विचार कर. माझ्यात अशी कोणती खोट आहे. काही सट्टा लावतो की जुव्वा खेळतो. खर्रा खातो की दारु पितो. सिगार ओढतो की अजून दुसरे शौकं करतो. पण एक सांगतो की तू जर अशीच आली नाहीस तर मलाही शौकं लागू शकतील. "

"मला काय करायचंय तुमच्या शौकाचं. तुम्ही दारु प्या की सिगार ओढा. रंडीबाजी करा की अजून काही करा. मला काहीही फरक पडणार नाही. "

"नाही रुम दुसरीकडं केली तर नाही येणार का?"

"नाही. "

"का?"

"तिथं मला भीती वाटते. लाजही वाटते. "

"मग मला सांग की समजा दुसरीकडं रुमही केली तर तिथंही तू तशीच वागशील आणि परत मला रुम बदलवायवा लावशील. मी काय जीवनभर हेच धंदे करायचे काय?अन् चोर नाही त्याला डर कशाला? अन् हे बघ आता मी जातोय. मी आठ दिवस वाट बघणार. नाही आली तर आपल्या स्वतःच्या घरी सामान घेवून जाणार. मग रुम कर म्हणायचं नाही. "

"जा तुम्ही. "

जय परत फिरला. मनात अत्यंत वैताग घेवून. एक एक क्षण त्याला कापणं मुश्किल होत होता. पण आता उपाय नव्हता. तिची अवस्था तशी नव्हती. म्हणून ती यायला नकार देत राहिली.

आठ दिवस झाले होते. जयला माहित पडलं की तिच्या वडीलाची प्रकृती ठीक नाही. तेव्हा तो त्याला भेटायला रुग्नालयात गेला. त्याला भेटला. तिथं कोणीच नव्हतं.

सविता आपल्या ड्युटीवर निघून जायची. तिची बहिणही. दुपारी कोणीच नसायचं. तेव्हा दुपारी सासऱ्याची सेवा करायला तो जायचा. त्याला वाटत होतं की अशानं तरी तिला दया

येईल किंवा सासऱ्याला दया येईल व सासरा तिला पाठवेल. एक दिवस त्याची सेवाभक्ती पाहून सासरा म्हणाला,

"जावई, मी तरी काय करु. मी पोरीला आणूनही दिलं असतं जबरदस्तीनं. नांदवलंही असतं जबरदस्तीनं. पण ती नांदायला तयार नाही. म्हणत असते की तुम्ही जर तिथं पाठवाल तर मी आत्महत्या करील. आता मला सांगा कोणता बाप आपल्या मुलीला असा पाहू शकेल. शेवटी तुम्हीही फसाल न. तेव्हा जे तिच्या मनात असेल ते होवू द्या. माझी ही अवस्था तुम्हाला दिसतेय ना. ही अवस्था तिच्याचमुळे. काय करु, मी मुलीचा बाप आहे. मला सहन न झाल्यानं माझी ही अशी अवस्था झाली. तुम्ही समजून घ्या. "

एक लाचार बेबस बाप बोलत होता. कदाचित आज सत्य त्याच्या तोंडून वदलं होतं. तसा जय म्हणाला,

"मग राहायला तयार नाही. तर सोडचिठ्ठी तरी दे म्हणावं. माझी आबाळ होत आहे. स्वयंपाक नीट करता येत नाही. आईलाही अर्धांगवायू मारला आहे. माझी त्रेधातिरपीट उडत आहे. तिनं सोडचिठ्ठी देवून दुसरा चांगला पती करावा. मलाही दुसरी पत्नी करु द्यावी. "

"पण जावई, ती तसंही करायला तयार नाही. वाटल्यास तुम्ही दुसरा विवाह करुन टाका. मग पाहू काय करायचं ते. पण तिच्या मागं फिरणं सोडा आणि तिला चाल म्हणणंही सोडा. "

सासरा त्या रुग्नालयात काय बोलायचं ते बोलून गेला. पण त्यानं संकेत दिला होता.

सायंकाळी पाच वाजले होते. ती दवाखान्याची रुम, त्या कमऱ्यात कोणीच नव्हतं. तेव्हा सविता त्या चार पाच डॉक्टरासोबत एकटीच त्या कक्षात शिरली होती. कदाचित त्या वागण्यातून ती जयला डिवचत आहे असं वाटत होतं.

जयचं सविताच्या नादात आईकडं दुर्लक्ष होत होतं. त्याची आई जेवते की नाही हे काही तो पाहात नव्हता. सारखं सविता सविता करीत होता. सविताच त्याच्या सदोदित डोळ्यासमोर दिसत होती. मोहिनी टाकल्यागत त्याची अवस्था झाली होती.

जय घरी आला होता. त्याला सासऱ्यानं संकेत दिला होता. ती येणार नाही कधीच असं वाटत होतं. शेवटी किराया बसवून काय उपयोग. त्यानं विचार केला आणि एक दिवस त्यानं आपलं सामान टेम्पोत भरलं आणि तो आपल्या स्वतःच्या घरी राहायला आला.

दिवसामागून दिवस जात होते. तिची आठवण काही केल्या हृदयातून निघत नव्हती. त्याला घरी करमतही नव्हतं. आता बरेच दिवस झाले होते. तशी त्याला सविताची आठवण आली. तसा तो तिच्या घराकडील त्या माणसाकडं गेला. ज्या माणसानं त्याच्या लग्नाचे प्रमाणपत्र बनवले होते. त्याला सर्व गोष्टी माहितच होत्या. तसा तो म्हणाला,

"साहेब, माझं काय चुकलं ते सांगा. तिला माझा एवढा राग का आला ते कळत नाही. "

"तुम्ही महिला सेलला केस का टाकली?तिला त्याचाच राग आला. "

"पण ती केस टाकायला तिनंच तर मजबूर केलं. मी माझ्या बचावासाठी टाकली केस. "

"पण तुम्हाला माहित आहे का की न्यायालयात वाळलंही जळते ओलंही. चांगल्या चांगल्याची जिंदगी बरबाद होते

कोर्टात. तुरुंगवास मात्र भलत्यालाच होते. लोकं केस बनवतांना स्वतःच्याच हातानं स्वतःवर वार करतात आणि केस रंगवतांना दुसऱ्यानं मारलं म्हणून सांगतात. साक्षी पुरावे एका रात्रीत बदलवतात. घटना न पाहणारा ही पाहिली असं सांगतो. इथे सतरा वर्षांच्या मुलीवर बलात्कार होतो आणि निकाल सतरा वर्षानंतर लागतो. तेव्हा साक्षीदार अर्धे अधिक मृत्यूच्या दारात पोहोचलेले असतात. मग पुरावे न सापडल्यानं कोर्ट म्हणतं की मी आरोपीला बा इज्जत बरी करीत आहे. खरंच सतरा वर्षापर्यंत पुरावे टिकतात तरी का? बरं न्यायाधीश महोदयांना जर विचारणा केली याबद्दल तर ते म्हणतील की मी तुमच्या घरी येवू का साक्षीपुरावे पाहायला. मग मला सांगा की आज तुम्ही ती केस महिला सेलला टाकली. उद्या कोर्टात जाईल. तिचा निकाल लागेपर्यंत तुम्ही म्हातारे झालेले असाल. वकीलाला काय, तो निकाल लागो अगर न लागो तुमच्या बाजूनं. तो केस टाक म्हणणारच. कारण त्याला पैसा मिळतो त्यावर. पण तुमचं काय?वकीलाचा धंदाच असतो. तो तुम्हाला केस निघते म्हणणार नाही तर तुम्ही त्याला पैसे तरी देणार का? तुमच्या खटल्यातील एकमेव साक्षीदार तुमची आई मरण पावल्यावर तुमच्याजवळ काय उरेल?शेवटी तुम्ही केस जिंकले आणि सविता आलीही तुमच्या घरी. तरी तुम्हाला आनंद उरणार नाही. कारण तुमच्या आईची सेवा करायला जी मदतनीस हवी. ती

मदतनीस तुमच्याजवळ तिच्या मृत्यूपर्यंत नसेल. मग तुम्हाला तिच्या येण्याचा कोणता उपयोग?शिवाय तिही मनातून येणार नाही.

अहो, मी तुम्हाला चांगला समजतो. कारण तुम्ही आईला चिपकून आहात. नाहीतर काही काही लोकं मी आणि माझी बायको एवढंच समजतात. आईला सोडतात. नातेवाईकाकडे ठेवतात किंवा वृद्धाश्रमात ठेवतात. माहित आहे तुम्हाला, तुमच्या साळभावानं आईला सोडलं. तिला याच लोकांनी सोडायला भाग पाडलं. त्यांची आई ही त्यांच्या भावाकडं आहे. हे माहित नव्हतं का तुम्हाला? कशाला ही मुलगी मागीतली?माहित आहे तुम्हाला की पुर्वीच्या काळची माणसे लग्न करतांना मुलीचा स्वभाव, खानदान पाहून लग्न करायचे. ते का बरं?मुलगी टिकली पाहिजे. तिनं सर्वांची सेवा केली पाहिजे म्हणून. पण आजची मुलं लग्न करतात. ना खानदान पाहात. ना स्वभाव पाहात. अन् लावतात जीभ टाळूला. त्यानच आज अशा केसेस वाढल्या आहेत. हे लक्षात घ्यायला हवे.

अहो, आज पैसा महत्वाचा आहे. पैसा जपून वापरा. बचत करा. त्या सविताच्या नादात लागून आपली जिंदगी बरबाद करु नका. येईल नाही तर नाही येणार ती. दुसरी करजा काही कालांतरानं. अशा बायका कित्येक मिळतील. अशा मायाही

कित्येक मिळतील. पैशानं नाती तयार करता येतातच. पण खरी जन्म देणारी आई मिळणार नाही. ती एकच मिळेल. तिचीच सेवा करा. तुम्हाला आशिर्वाद मिळेल. खरी ममता तिच्याजवळच आहे. "

तो व्यक्ती पेशानं वकीलच होता. त्यानं सत्य समजावून सांगीतलं होतं. तसा जय म्हणाला,

"साहेब तुमचं म्हणणं बरोबर आहे. लोकं बाळासाठी नवसं करतात. तरी त्यांना बाळ होत नाही. कित्येक चाचण्या करतात. हताश होतात. मी तिला सोडलंही असतं. पण मी तिथेच अडकलो. कारण ती गरोदर आहे. मी जातो त्यांच्याकडे. कारण मी मजबूर आहे. पण एक सांगतो. समजा मी या जाळात अडकलो नसतो तर मी तिच्याकडं ढुंकूनही पाहिले नसते. पण काय करु?आज माझ्याकडे उपाय नाही. साहेब आपणच काय ते करा व तिला समजवा. तसेच आमचं सोयरसुतक जुळवून द्या. "

"बरं बरं. मी पाहतो प्रयत्न करुन. " तो व्यक्ती म्हणाला. तसा जय परत आपल्या घरी निघाला.

जय रस्त्यानं जात असतांना त्याला विचार येत होता. वाटत होतं की वीस बावीस वर्ष मायबापाच्या घरी राहणारी मुलगी. लग्न होवून जेव्हा सासरी जाते. तेव्हा तिला सासरकडलं

काय समजतं. काहीच नाही. ते समजण्यासाठी थोडा वेळ घ्यावा लागतो. काही मुली तीन महिण्यातच परीस्थितीशी जुळवून घेतात. तर काहींना एक वर्ष ही लागतो. पण जर ती पूर्णतः सासरी राहिली तर. पण ती जर मायबापाच्या घरी येणं जाणं करीत असेल तर. तिला सासरकडील वातावरण कसं समजेल. जर तिला वेगळंच राहायचं होतं, तर तिनं वेगळं राहायला हवं होतं किंवा लग्नच करुन वेगळं राहायचं होतं तर माझ्यासारख्या मजबूर मुलाशी विवाह करायला हवा नव्हता. तर जो अय्यास आहे किंवा जो मजबूर नाही अशा मुलासोबत विवाह करायला हवा होता.

जय आपल्या घरी पोहोचला होता. आई भुकेनं तळमळत होती. त्यानं घरी आल्यावर भात मांडला व त्या दिवशी वेळ झाल्यामुळं त्यानं चटणीसोबतच भात खाल्ला.

"साहेब सविता आली नव्हती का?" जयनं वकीलाला प्रश्न केला.

"नाही. "

"निदान भेट तरी झाली काय?"

"नाही. "

"भेट घ्यायला नाही गेले काय?"

"नाही. "

"पण तुम्हीच तर म्हटलं होतं की मी सविताला आणणार म्हणून. "

"तुम्ही जावून बघता का?"

"पण ते येवू देतील का?"

"का नाही येवू देणार. सोडचिठ्ठी झाली का?"

"नाही. तसा मुकदमाही नाही कोर्टात. "

"मग खुशाल जा आणि तिला माझ्याकडे घेवून या. "

जय सविताच्या घरी निघाला. वाटेत विचारही होता. तसा तो तिच्या घरी पोहोचला.

सविता घराबाहेर बसली होती निवांतपणे. आज तिच्या मनात कोणत्याही स्वरुपाची चिंता नव्हती. तसा जय म्हणाला,

"काय ड्युटीवर नाही गेली का?"

"तुम्हाला काय करायचंय?"

"सहज विचारलं. "

"असं विचारायचं नाही. तुमचा माझा संबंध उरला नाही. "

"कशी बोलतेय?"

"मग माझं ऐकलं का?"

"काय नाही ऐकलं. "

"तुम्ही रुम केली का किरायाची. तुम्ही तर आपल्या घरी गेले राहायला. "

"मी न्यायला नाही आलो. तुला इथं राहायचं असेल तर खुशाल राहा. माझी मनाई नाही. अन् यायचं असेल तर तिथं ये. तुझ्या स्वतःच्या हक्काच्या घरी. "

"मी तिथं अजिबात येणार नाही. "

"का?"

"ते माझं घर नाही. "

"मग कोणाचं आहे?"

"तुमच्या आईचं. भूताचं घर आहे ते. तिथं भूतं नाचतात. "

"अगं आईचंच ना. मग आई मेल्यावर आपलंच होईल ना. दोघांचं. "

"नको मला. मी काही घरची भिकारी नाही. "

"तुला यायचं असेल तर ये. नाहीतर नको. मी काही तुझ्यावर दबाव टाकत नाही. "

"लग्नाआधी अटच होती आमची की किरायानं राहायचं. "

"हो ठीक आहे. सोयी नव्हत्या म्हणून मी रुम केली. पण तू तिथं राहिली का? नाही ना. "

"मी येत नाही तिकडे. अन् तुम्ही माझे कोणी नाही. "

"तुझा कोणी नसेल गं. पण मी तुझ्या पोटात वाढणाऱ्या बाळाचा बाप आहे. "

"मी मग त्यालाही साफ करुन टाकीन. "

अगदी सहजपणे उच्चारलेले शब्द.. .. .. . त्याच्या काळजाला भेदून गेले. त्याला वाटलं की ही आई आहे की कैदाशीन. जी आपल्या पोटातील बाळालाही संपवून टाकीन म्हणते. परंतू तो चूप बसला. कारण प्रारब्ध त्याचं खराब होतं. त्याच्या मनात विचार आला. अशी बाळाचा जीव घेतो म्हणणारी

मुलगी आपली होवू शकत नाही. उद्या हिला नांदवायला नेलंही घरी. तरी विष देवून मारेल आणि आपल्या मालमत्तेची मालकीन होईल. आपण प्रसंगी उपासतापास भोगला. पण मालमत्ता विकून ऐषआराम भोगला नाही. पण ही त्या प्रकारातील नाही. जसं मी समजत आहे. तसा त्या साहेबाचा विचार तिथं न काढता तो म्हणाला,

"मी निघतोय आता. "

"निघा. आता परत येवू नका. "

तो रस्त्यानं जात होता साहेबाच्या घरी. तसा त्याला विचार आला. जावई म्हणजे देव असतो सासऱ्याच्या घरी. पण मला ते कुत्रा म्हणतात डुक्कर म्हणतात. नानाप्रकारच्या शिव्याही देतात. माझ्या आईला रांड म्हणतात. सोडचिठ्ठी व्हायची आहे तरीही. यांचं असं बोल निघत असतं. खरंच ही मंडळी आपल्या लायकीची नाही. त्याला सगळं आठवत होतं. तसा तो एकदाचा प्रसंग आठवला,

"जन्मभर पोसून घेईल आपल्या मुलीला. " बाप म्हणत होता. त्यावर जयनंही तसंच उत्तर दिलं होतं,

"उद्या खड्ड्यात गेल्यावर खड्ड्यातून वर येवून पोसजा पोरीला. "

तो वकीलाच्या घरी गेला. त्याला घडलेली कहानी सांगीतली व तो तेथून निघाला. आणि घरी आला. पुन्हा कधीही न जाण्यासाठी.

काय करावं काय नको असं जयला वाटत होतं. काही सुचत नव्हतं. त्यातच त्यानं विचार केला की आपण तिला नोटिस पाठवावा. तो नोटीस पाठवल्यावर तिलाही कळेल आणि तिच्या परीवारालाही. कारण तिच मंडळी सवितामध्ये विष कालवून तिला आणि मला तोडत आहेत. पती पत्नीत्वातून. सर्वच गोष्टी मायबापाजवळ सांगायच्या नसतात. पण हिनं सांगीतल्यानं ही समस्या निर्माण झाली आहे. नागाला नागीणीपासून दूर केल्यास जे घडते. तेच माझ्या आयुष्यात घडत आहे. एखादा मुलगा चोर असतो. लपून छपून सिगारेट पितो. गुंडगीरीही करतो. त्यांचा पुत्र तरीही पुजनीय वाटतो. कारण ते एक रक्ताचं नातं असतं. रक्ताचा बाप किंवा माय बनवता येत नाहीत. तसंच तरुणपणाचं आहे. एकदा का हा तरुणपणा गेला की पुन्हा कितीही केलं तरी येणार नाही. कोणी कितीही प्रेम करीत असेल तरी पतीचं जे प्रेम असतं, ते कोणीच देत नाही. किंवा पत्नीचं जे प्रेम असतं, ते प्रेम कोणीच देणार नाही. पण ह्या गोष्टी सविताला केव्हा कळतील? पती हाच

शेवटपर्यंत पत्नीला निभावून नेतो. कधी चिंतेनं चुकतही असेल दोघांचं, तरी त्यावर विचार करुन तोडगा काढणं व समंजसपणानं वागणं गरजेचं आहे. कधी पती टेन्शनमुळं त्रास ही देत असेल तरी पती हा पतीच असतो. त्याची माया कोणी देवू शकत नाही. ज्याप्रमाणे जन्मानंतर मायबाप मुलांना उन्हातून सावलीत नेतात. त्याप्रमाणे लग्नानंतर पती पत्नीला जोपासतो. पण विश्वास ठेवायला हवा. त्याच्या सुखदुःखात सहभागी व्हायला हवं. नोकरी किंवा मालमत्ता ही शाश्वत नसते. तेव्हा कोणत्याही मुलीनं विवाह करतांना मुलांची मालमत्ता पाहून विवाहाचा निर्णय घेवू नये किंवा समजा एखाद्या प्रसंगी पती जर लग्नानंतर अधू झाला किंवा गरीब झाला तर पत्नीनं त्याला सोडून जावू नये.

मुलीनं मायबापाला टेन्शन देवू नये. लग्नापुर्वीचं टेन्शन मायबाप झेलूनही टाकतील. पण लग्नानंतरचं टेन्शन मायबाप झेलू शकत नाहीत. सवितामुळं बापाला हृदयाचा झटका आला. पण तिला उमगलं नाही. ती फक्त आपलाच स्वार्थ पाहात आहे. तिला पतीच त्रास देतो आहे असं वाटते. तिला माहित नाही की पती किती त्रास देतात. समजा एखादा बेवळेबाज भेटला असता तर.. .. .. तर दररोज झोडपत राहिला असता मदिरापान करुन.

आपण मारत नाही, तिला बोलत नाही. म्हणून ही डोक्यावर बसल्यासारखी वागते.

नवरा म्हणजे तिला भातुकलीच्या खेळातला बाहुला वाटतो की काय, आपला तिला काही त्रास नाही तरी ती निघून गेली आपल्या घरुन. खुशी वाटत असेल का तिला मायबापाच्या घरी राहायची. बाकीच्या लोकांच्या पत्नी घर घर करीत परत येतात आणि हिला तर घरच समजत नाही. मला तर राहावत नाही कधीच तिच्यापासून दूर आणि तिलाच का राहावते.

त्याच्या मनात क्षणोक्षणी तिचेच विचार असायचे. तसा त्याला परत विचार आला. नवनवीन लग्न आणि नवनवीन लग्नानंतर कधीच पत्नी पतीपासून विभक्त राहात नाही बायफ्रेंड असल्याशिवाय. कदाचित तिला बायफ्रेंड तर नसावा?म्हणूनच तर तिचं लग्न लवकर नाही ना केल असावं?खऱ्या जिंदगीच्या स्त्रिया या अशा विभक्त होत नाहीत.

चंचल सवितानं कदाचित आपला घात केला असं त्याला वाटत होतं. आपण पूर्णतः आपल्या बायकोवर विश्वास केला. म्हणूनच तिनं फायदा घेतला असं त्याला वाटत होतं. लग्न झाल्यावर पती जर नाराज असेल तर पत्नीही निराश असते हे त्याला माहित होतं. पण इथं तर सविताच्या चेहऱ्यावर कोणत्याच

स्वरुपाचं रोगण नव्हतं. खऱ्या जिंदगीच्या मुली असल्या स्वरुपात वागत नसतात. पण चरलेल्या स्त्रिया अशाच वागतात हे तो अनुभवातून शिकला होता.

तिच्या अफेअरची त्याला हळूहळू शंका यायला लागली होती. ते मुल तिच्या पोटात होतं, त्या मुलाबाबतही त्याला संशयता यायला लागली होती. कारण हे त्याला आधी माहित झालं नव्हतं. शिवाय ती तर म्हणत होती, लैंगीक शोषण करते आणि डी एन एच्या तपासणीत तिनंच नकार दिला होता. तीन महिण्यात अर्धेअधिक दिवस माहेरी राहणारी ती मुलगी गरोदर राहिलीच कशी हा प्रश्न होता. कदाचित त्याची मालमत्ता नव्हे तर आपल्या मायबापाच्या घरी बसून खावटी वसूल करुन बायफ्रेंड कडून लैंगीक गरज भागवून ऐषआराम करण्याचा तिचा डाव आहे हे जयने ओळखले होते. याचमुळे की काय तिच्यासह सर्व घरची मंडळी त्याला धमकी देत होती की आम्ही तुमच्याकडून खावटी वसूल करु.

खावटी.. .. .. .. पती जर पोषत नसेल तर पतीकडून लग्नानंतर तिच्या उदरनिर्वाहासाठी दिली जाणारी रक्कम.

जयनं तिचा डाव ओळखला व जयनं वकीलातर्फे तिला नोटीस पाठवला. तसा तो नोटीस पोहोचताच तिनंही त्याचं

उत्तर दिलं होतं. उलटा चोर कोतवाल को दाटे अंतर्गत ही बाब झाली होती. तसा जय आपल्याच वकीलाला म्हणाला,

"मी तिच्या वकीलाला भेटून येतो. समजावून सांगतो. जमेल तर पाहतो जुळवून. "

जयचा हेतू हा रास्त होता. पण तिच्या मनात पापच होतं. वकीलानं तिच्या वकीलाला भेटायला जायची मनाई केली होती. पण जय काही ऐकला नाही. जयला प्रकरण वाढवायचं नव्हतं. तसा तो त्या वकील ताईच्या घरी गेला. सोबत एक त्याचा वकील मित्रही होता.

बोलणं झालं होतं. तिची वकील बाई चांगलीच बोलली होती. तिनं सुतक जुळवून देण्याचं आश्वासन देत आशा पल्लवीत केल्या होत्या. परंतु तीनचार दिवसात तिचा नोटीस आला होता. त्यात लिहिलं होतं की जयनं माझ्या वकील ताईलाही धमकी दिली तेही तिच्या घरी जावून. त्यावर वकील म्हणत होता की मी तुम्हाला समजवलंय की जावू नका तिच्या वकीलाला भेटायला. परंतू तुम्ही गेलात. आता बघा तिनं यात काय लिहिलं.

"तुम्ही आले होते नाक घासत. " ती म्हणत होती. जयला फार वाईट वाटत होतं.

ती शहरातील रमणीय बाग. त्या बागेत प्रेमी युगल फिरायला जायचे. एरवी एकटाही माणूस फिरायला जायचा. जयला घरी करमत नव्हतं. म्हणून तो सहज फिरायला गेला होता त्याच बागेत. ज्या बागेत सविताही त्या दिवशी फिरायला गेली होती. योगायोगच तो.. .. .. . अचानक त्याची नजर तिच्यावर पडली. ती कोणातरी मुलासोबत फिरायला आली होती. तिलाही घरी कंटाळवाणं वाटत असेल की दररोज ती त्याचेसोबत फिरायला जात होती कुणास ठाऊक. तो तिच्याजवळ गेला. म्हणाला,

"कोण हा?"

"तुम्ही कोण विचारणारे?"

"मी तुझा नवरा. हा कोण?"

"असेल कोणीही. तुम्हाला काय करायचंय?"

"तुला फिरायचंच आहे तर माझ्यासोबत फिर. चार मैत्रीणी घेवून फिर. हे असे दोघं.. .. .. .. . "

तसं त्याला काय वाटलं कुणास ठाऊक. तो तिथून निघून गेला.

"हे बघ सविता, मी चांगल्यानं विचारतोय. हा मुलगा कोण होता?"

"तुम्हाला कोण म्हणायचंय?"

"मी शंका घेत नाही. पण सहज विचारतोय. हा मुलगा कोण होता?"

"माझा बायफ्रेंड होता. अजून काही?"

"मी तसं विचारलं का?"

"अन् तुम्ही माझ्या हॉस्पिटलला कशाला गेले होते?"

"तुला भेटायला. "

"हे बघा, माझ्या हॉस्पिटलला यायचं नाही अजिबात. मी सांगून ठेवते. मग काही झालं तर म्हणायचं नाही. "

"काय करशील?"

"काय करशील म्हणता. मी करुनच दाखवेल. अरेस्ट करुन दाखवेल तुम्हाला?"

"आपल्या पतीलाच. "

"कोण पती?कुठला पती?मी तुम्हाला ओळखत नाही. "

"या बाळाला ओळखते का पोटातल्या?"

"मी त्यालाही ओळखत नाही. "

"मग मगाशी जो तुझ्यासोबत चाळे करीत होता. त्याला ओळखतेस का?"

"हो, तो माझं सर्वस्व आहे. "

"मग त्याच्यासोबत लग्न का केलं नाही आधी?"

"तुम्हीच नाक घासत आले होते. अन् हे बघा, तुम्ही असं माझ्या पाळतीवर फिरत जावू नका. मला टेन्शन येतं. "

"म्हणजे पतीसोबत बोलाले फिराले टेन्शन येते. अन् त्या मुलाबरोबर?"

"बोलीन बोलीन. तू कोण म्हणणार?"

"मग मला सोडून दे. त्याच्याशी लग्न कर. मी हवं तर लावून देतो लग्न. "

"वेळ आल्यावर तेही करील. "

जयला तिथेच सोडून ती निघून गेली होती. तिचा खरंच तो बायफ्रेंड असेल. कारण ती अचानक दिसली होती त्या बागेत. त्याच्यासोबत फिरतांना. जयला विचार येत होता की माझी पत्नी दुसऱ्यासोबत हातात हात घालून फिरते. त्याला ती कल्पना सहनच होत नव्हती. सासरकडच्यांना सांगतो म्हटलं तर ते ही हेकड

बोलत होते. तिच्या लाडासमोर सर्वांनी नांगी टाकली होती. अशातच दिवाळी आली.

"आम्हाला तुमच्या कपड्याचं माप घ्यायचं आहे. " सासरा बोलत होता.

"मला तुमचे कपडे नको. मला तुमची मुलगी हवी. "

"अहो, पहिली दिवाळी आहे. त्यासाठी कपडे घ्यावे लागणार नाही का तुम्हाला?"

"जर तुमची मुलगी जर माझ्या घरी येत नसेल तर मला तुमच्या कपड्याची कोणती गरज?"

"ठीक आहे. पाहतो. मी माझ्या पोरीला समजावून. "

जयला थोडं बरं वाटलं. जेव्हा सासऱ्यानं तिला आणून देण्याविषयी म्हटलं. तशी ती आली नसल्यानं दिवाळीच्या दोन दिवसांपूर्वी तो तिच्या घरी गेला असता सासू म्हणाली,

"तुम्ही किरायाची रुम केली का?मी पाठवते. पण किरायाच्या रुमवर. "

जयला परत वाईट वाटलं. तो माघारी फिरला. जणू आपल्या जेवनात कोणीतरी विषच कालवत आहे की काय असं त्याला वाटलं.

तो घरी आला. त्यानं खरमरीत पत्र लिहिलं व ते पत्र पाठवून आपला राग शांत केला.

जयला आता मार्ग सापडला होता. त्याला जेव्हा जेव्हा आठवण यायची. तेव्हा तेव्हा तो पत्र लिहित होता. तिला पाठवीत होता. त्यात त्याचा रागही शांत होत होता. पण ती वाचत होती की काय कुणास ठाऊक. पण तिच्यात कोणताच फरक पडत नव्हता.

खावटीचा मोठा प्रश्न त्याच्यासमोर उभा होता. ज्या नोकरीसाठी त्यानं एवढे कष्ट सहन केले होते. जो नोकरीतील पैसा वाढला पाहिजे म्हणून तो राबला होता. त्या पैशातून काही पैसा विना मेहनत करता तिला मिळणे या गोष्टीची तो कल्पनाही करु शकत नव्हता. त्याला वाटत होतं की जो पगार सुरु झालाय. त्या पगारासाठी ज्यांची ज्यांची मेहनत खर्ची पडली, त्याला ही रक्कम मिळाली तर चांगलं परंतू सरकारच्या या निर्णयानं आताच्या मुली चुका करुन आपल्या पतीच्या घरी न राहता, माहेरी जावून आपल्या बायफ्रेंड सह गुलछर्रे उडवितात. वरुन खावटी मागत त्या आपले व बायफ्रेंडचे शौकं पुर्ण करतात. ती कल्पनाही असह्य करणारी होती.

जयला वाटत होतं की आपण दुःखी असतांना ही सविता आपल्याला साथ देण्याऐवजी माहेरी जावून बसली. उद्या

ही खावटी मागेल आणि फुकटच आपल्याला खावटी द्यावी लागेल. या कल्पनेनं त्याच्या मनाचं टेन्शन वाढत चाललं होतं.

खावटी व बायफ्रेंड सतत जयच्या डोळ्यासमोर तरळत असायचं. त्यातच त्याचं टेन्शन वाढायचं. कधी डोकं दुखायचं. अर्धांगवायू मारलेली आई कधी त्याच्याजवळ लंगडत लंगडत यायची. त्याच्या कपाळावरुन हळूवार हात फिरवायची. तसं त्याला बरं वाटायचं. जिनं आपल्या आईला सांभाळून घेईल असं साक्षगंधानंतर वचन दिलं होतं. ती बेईमान निघाल्याचं दुःख वाटायचं. आईबद्दल अजून जास्त प्रेम जागृत व्हायचं.

त्याला वाटायचं की ती मुलगी. भर तारुण्यात आपल्या घरी राहते. नवऱ्यापासून विभक्त राहते. ती आता बिघडली आहे. बायफ्रेंड बाळगते आहे. पण तिला बिघडवलं कोण? त्याच मायबापानं ज्यांनी तिचा लाड करीत तिला जवळ केलं. संसार समजावून सांगीतला नाही. तिला मार्गदर्शन केलं नाही. आपण एकुलते एक. ना आपल्या आईचा त्रास तिला. बहिणी तर तुटल्याच होत्या. त्यामुळं नंनदेचाही तिला त्रास नव्हता. ना दिराचा ना भासऱ्याचा. तरीही तिला टिकवलं नाही. तिच्या मायबापानंच तिच्या भावनांचा घात केला. तिलाही शारीरिक भावना होत्या. पण

त्यांच्या बोलण्याच्या विषानं तिच्या माझ्याविषयीच्या भावना बदलवल्या.

संसार म्हटलं तर तर पती पत्नीचं मिलन. जीवनाचे दोन चाकच. एक चाक तुटलं तर जशी गाडी चालत नाही. तसाच संसारही चालत नाही. पती पत्नीचं भांडण जगात होत नाही काय? होते. तरीही ते एकत्र राहतात. पण माझ्या बाबतीत वेगळंच घडलं. आमचं शुल्लक भांडण. त्याला भांडणही म्हणता येणार नाही. तरीपण एवढं टोकाला गेलं. सायंकाळी होणारं पती पत्नीचं भांडण सकाळी विसरुन जायला हवं. पण आमचं भांडण ती एवढे दिवस होवूनही विसरु शकली नाही. त्यात तेल मीठ टाकत अजून ते सुलगवत ठेवलं.

पती पत्नीचं भांडण. सकाळी जर झालं तर सायंकाळी विसरुन एकाच ताटात त्यांनी अन्न खायला हवं. भांडणं पती पत्नीत होणार नाही तर कोणात होईल. माझं ही भांडण झालं. पण आता त्या भांडणात रस नाही राहिला. हे लग्न फक्त तिनं खावटीसाठीच केलेलं दिसते. बाकी कोणत्याच गोष्टीसाठी नाही. कारण मी जेवढ्या तिला विनवण्या केल्या. तेवढ्या विनवण्या जर दगडालाही केल्या असत्या तर आज दगडालाही पाझर फुटला असता.

लग्नानंतर पत्नी आपलं सर्वस्व पतीला प्रदान करतो. पतीही त्या सर्वस्वाचा आनंदानं स्विकार करते. भावी जीवनात तिच्या संरक्षणाची हमी देते. तिच्या केसाला जरी धक्का लागला तरी तो पती धावून जातो. कोणी वडील येत नाही धावून बायफ्रेंड तर नाहीच नाही. बायफ्रेंड तरुणपण जेव्हापर्यंत असतं. तेव्हापर्यंतच असतो. म्हातारपण आलं की बायफ्रेंड संपतो. मग सुरु होतात आजार. हे आजारही असे तसे नाही तर विश्वकोटीचे. त्यातच शंका सुरु होतात. अंधश्रद्धेच्या. कोणी म्हणतात कोण्या एके ठिकाणाहून भूतानं झपाटलं. कोणी जादू केली, कोणी टोना केला असंही म्हणतात.

जयला वाटत होतं की त्याचं भांडण झालंच नाही. जयनं मागं वळून पाहिलं. त्याला तसं मोठं कारण दिसलंच नाही. फक्त समज गैरसमजमधून तो प्रकार घडला होता. सुरुवातीचे त्यांच्या लग्नाचे पंधरा दिवस चांगले गेले होते. लग्नानंतर ते बरेच फिरले. पण त्या सुखी संसाराला कोणाचं गालबोट लागलं ते कळलंच नाही. संसार तिला समजलाच नाही. तिला वाटलं असेल की असा स्वयंपाक करण्यापेक्षा मला स्वयंपाक बनवून आयता चारणारा नवरा मिळायला हवा होता. कदाचित बायफ्रेंडनं तर अशी हवा ना दिली. पण तिनं हे सांगायला हवं होतं. पण तिनं तर हे

सांगीतलं नाही. उलट आपल्या मनात आपल्याला ज्या कोणी सांगीतल्या तिरस्काराच्या गोष्टी. त्या भरुन घेतल्या.

कोणतीही स्त्री वा माणूस कुणाहीजवळ आपला गुन्हा सांगत नाही. हा जगाचा नियमच आहे. तेच जयबाबतीत झालं. तिनं कधी आपला गुन्हा कोणाला सांगीतला नाही. तर जयचाच गुन्हा सांगीतला. त्यामुळं पावलोपावली तिला मार्गदर्शन करण्याऐवजी तिला तिरस्कार करण्याचे काटे भेटले. सविता आणि जयच्या या सुखी संसाराला तिच्याच बहिणभाटव्याची व आईवडीलांची दृष्ट लागली होती.

१८२९ मध्ये सतीबंदीचा कायदा पारीत झाला होता. स्त्रियांचं जीवनमान उंचावण्यासाठी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी घटनेत स्त्रियांबद्दल काही कलमा टाकल्या होत्या. ४९८ ब व १२५ अ ह्या कलमा स्त्रियांचं अस्तित्व दाखवत होत्या. याच कलमानुसार आता स्त्रिया पुरुषावर अत्याचार करु लागल्या होत्या. पोषायला तयार असणाऱ्या पतीवरही ताशेरे उडवीत त्यांचा गुन्हा नसतांनाही त्याला गुन्हेगार ठरवू लागल्या होत्या. ज्या घरात खरंच अत्याचार होता. त्या घरची मुलगी कधीच कोर्टकचेरी करीत नव्हती. तर निमुटपणे अन्याय सहत होती. पुढे आपलेही दिवस पालटतील याचा विचार करुन. पण ज्या घरी असा अत्याचार

नव्हता, त्या घरी मात्र काही स्त्रिया आपल्यावर भयंकर मोठा अत्याचार होतो हे दाखविण्याचं काम या स्त्रिया करीत. ज्या ठिकाणी अत्याचार होत होता, तिथली परिस्थिती वेगळी होती. पण ज्या ठिकाणी अत्याचार होत नव्हता तिथलं काय, त्या स्त्रिया पतीला कळसुत्री बाहुला समजू लागल्या. मग पती जर थोडासा गुरगुरला की बस पोलिसस्टेशनच्या धमक्या, चारशे अठ्यानव ब कलमेचा वापर व एकशे पंचवीस अ कलमेचा वापर ह्या स्त्रिया करीत असत. ती पुरातन आदराची भावना गेली. पतीला मग या कलमाअतंर्गत बोटाच्या उंगलीवर या स्त्रिया नाचवू लागल्या. प्रसंगी आपल्या सासूलाही सोडण्यास बाध्य करु लागल्या. त्यातील काही स्त्रिया ह्या आपल्या सासूची रवानगी पतीकरवी वृद्धाश्रमात करु लागल्या. मीच नाही तर तुमची माय याच भूमिकेमुळेच पतीही पत्नीचं ऐकून तिच्या इशाऱ्यावर चालू लागला. कारण स्त्रियांच्या सोबतीला त्या कलमा होत्या. पुढं मी, माझी मुलं व पती. पतीही ऐकत नसेल तर फक्त मी.. .. .. .. मुलंही गेली खड्ड्यात असं चित्र निर्माण झालं. स्त्रिया पतीपासून वेगळ्या राहात असतांना धाक न उरल्यामुळं अनैतिक कार्यही करु लागल्या. त्याचबरोबर जीवनभर लग्न न करता खावटी मिळवीत बायफ्रेंड सोबत जीवनभर मजा मारीत वेगळ्या राहू लागल्या होत्या.

जयनं सरकारी रुग्नालयात नोकरी केली होती. त्यानं परिचारीकांचा स्वभाव पाहिला होता. त्याला परिचारीका आवडत होत्या. वाटत होतं चांगली निघेल. जशी रुग्नांची सेवा करतात. तशीच आपलीही सेवा होईल. पण सोच फसली होती.

दिसते तसं नसते याप्रमाणे त्यानं हा पेशा आपल्या विवाहासाठी निवडला होता. पण ती तर त्याच्यापासून वेगळं राहू इच्छीत होती. सेवा तर दूरच. ती शुद्ध धमक्याही देत होती. 'तू कसा लग्न करतो. 'अशी प्रत्येकवेळी तिची धमकी असायची. हॉस्पिटलला गेल्यास 'इथं यायचं नाही. ' घरी गेल्यास 'हात धरून बाहेर काढील. ' ' प्यायला पाणी मागीतल्यास 'पाणी नाही. ' रस्त्यावर भेटायचं म्हटल्यास'मी वाह्यात मुलगी नाही. ' कारणं सांगा म्हटल्यावर त्यालाही नकार. तसेच 'मी कोर्टात पाहून घेईल. 'अशा प्रकारच्या नेहमीच्या धमक्या. त्या पावलोपावली असलेल्या शंका. त्या शंकांचं निरसन कसं करावं हे जयला समजत नव्हतं. वडीलासमोर बोलू देत नव्हती. डोकं दुखते म्हणत होती. तर हॉस्पिटलला ती 'भेटायला यायचं नाही' म्हणत होती.

मर्यादा.. .. .. .. प्रत्येक गोष्टीला मर्यादा असते. जिथं मर्यादा संपली. तिथं माणूसही संपतो. मृत्यूही माणसाला सार्वकालिक पृथ्वीवर राहू देत नाही. अशीच एक घटना

वर्तमानपत्रात आली होती. एक पती पत्नीला न्यायला माहेरी गेला होता. पण अपमान न सहन झाल्यानं त्यानं आत्महत्या केली होती. पोलिसांनी त्याची चौकशी न करता त्याला सहज मृत्यू म्हणून घोषित केले होते.

बावीस वर्ष मायबापाच्या घरी राहणारी मुलगी. तिला सासर कळायला कमीतकमी दीड वर्ष लागेलच. परंतू यात आपला आततायीपणा आपल्यालाच समुळ नष्ट करीत असतो. संधीही मिळू देत नाही. अशावेळी संयम व समजदारीपणाची गरज असते. तारुण्यपणात तेवढा संयम आलेला नसतो. समजदारीपणाची भावना तर नसतेच. कारण रक्त पातळ असतं. गरम असतं.

सर्व नाशाचं मुळ पुरुषांना मानलं जातं. स्त्रियांना हतबल समजलं जातं. पण ते चुकीचं आहे असं जयला वाटत होतं. स्त्रिया आधीपासूनच कमजोर नाहीत. रामायणातील सीतेनं रामायण. तर महाभारतात सत्यवती व द्रोपदीनं महाभारत. गार्गीनं शास्त्रोक्त केला, तर लोपामुद्रानं पतीसाठी कवनं रचली. मैत्रेयीही विद्वानच होवून गेली.

सीता जेव्हा वनवासात गेली. तेव्हा तिला मायबापानं अडविलं नाही. तसेच तिनं पतीला दोषही दिला नाही. मी, माझा पती जिथं असेल तिथं राहिल. असा विचार तिनं केला. तर

सुलोचना मांडवीनं पती आज्ञेचं पालन केलं. रामावर जे दुःख आलं. ते दुःख तू अर्धांगीनी म्हणून झेल असा सल्ला जनकराजानं दिला होता. नव्हे तर सीतेनं पतीबरोबर राहून त्या सल्ल्याचं स्वागत केलं होतं. पण पतीला सोडून पळून मायबापाकडं गेली नाही. रावण मंदोदरीचं ऐकत नसूनही ती त्याच्याच घरी राहून पत्नीधर्माचं पालन करीत होती. पण सविता तसं काही करीत नव्हती.

स्त्री वेळ पडल्यास पतीला सुधारु शकते आणि वेळ पडल्यास पतीला बिघडवूही शकते असं जयला वाटत होतं. समुद्राच्या पाण्याची खोली मापनाचं यंत्र मानवाजवळ होतं. पण एका स्त्रीच्या मनाची खोली मापनाचं यंत्र मानवाजवळ नव्हतं. म्हणून सवितासारख्या स्त्रियांचा जय हा बळी पडला होता.

एक स्त्री अशी असते की जिच्यासाठी शहाजहान ताजमहाल बांधू शकतो. पण एक एक स्त्री अशी असते की तिला शिळा ही बनावं लागते.

ती पोलिस स्टेशनला गेली होती. तिथं तिनं म्हटलं,

"साहेब, त्याला आताच्या आता अरेस्ट करा. " पोलिसवाला म्हणाला,

"हे बघा, टाळी एका हातानं वाजत नाही. त्यात तुमचीही थोडीशी चूक असेल. त्याचं काही ऐकलंच नाही आणि आम्ही त्याला अटक करणार. हे बरोबर होणार नाही. आम्ही त्यांना बोवावून आणतो. मग बोलू काय ते?तुम्ही थांबा थोडं. "

दोन पोलिसवाले जयच्या घरी आले. त्यातील एक म्हणाला,

"साहेबानं बोलावलंय. "

"कशासाठी?"

"तुम्हाला अटक करायचीय. "

"काय केलं मी?"

"तुम्ही तुमच्या पत्नीला फार त्रास दिलाय असा तिचा आरोप आहे. हुंड्याचाही आरोप आहे. "

"ठीक आहे. येतो थोड्या वेळानं. "

पोलिस निघून गेले. तसा थोड्या वेळानं जय पोलिसस्टेशनला गेला. सविता निघून गेली होती. तिला महिला सेलमधून लिहून आणायला पाठवलं होतं. ती ते पत्र आणायला महिला सेलला गेली होती. जिथून पत्र मिळताच जयला अटक होणार होती.

जय न घाबरता पोलिस स्टेशनला गेला. त्यानं नमस्कार घेतला व कारण विचारलं. साहेबानंही तेच कारण सांगीतलं. तिला महिला सेलला पाठविल्याचं समजलं आणि म्हणाले,

"तुम्ही आपल्या सुरक्षेची बेल काढून घ्या. तुमच्या आईचीदेखील. पत्र भेटलंच तिला तर नाईलाजानं तुम्हा दोघांनाही अटक करावी लागेल. "

क्षणभर जय चूप बसला. तसा नंतर तो बोलका झाला.

"मी महिला सेलला केस टाकली. ती हजर न झाल्यानं ताईनं ती केस एकतर्फी लावली. सगळी कागदं आहेत माझ्याकडे. "

"तरीही तुम्ही बेल बनवून घ्या. सांगता येत नाही. आपली सुरक्षा आपणच करावी. "

शेवटी नाईलाजानं पैशाचा नासोडा करीत जयनं बेल बनवली. बेल बनवल्यावर कळलं की ती  महिला सेलला गेली. पण महिला अधिकारी ताईनं तिच्या अनुपस्थितीवरुन तिलाच झापलं होतं. त्यांनी पत्र न दिल्यामुळं ती परत पोलिसस्टेशनला जावू शकली नव्हती. त्यामुळं त्याविरोधात गुन्हा तिला पोलिसस्टेशनला

नोंदविता आला नव्हता. पैसे तेवढे वाया गेले होते. पण जयसमोर पैशाचा विचार नव्हता. त्याला वाटत होतं की जर गुन्हा नोंदविला गेला असता तर.. .. .. .. .

जय तरीही प्रेमच करीत होता तिच्यावर. तिच्याशिवाय राहवत नव्हते त्याला. त्याला तिची आठवण येत होती. याकरीता तो पत्रही पाठवीत होता.

त्याने आपल्या सासऱ्याला एक पत्र लिहिलं. 'मी सवितासाठी घर सोडलं. माझ्या भावना दुखावल्या. आता घरासाठी मला सविता सोडावी लागणार असे वाटत आहे. हे परिस्थिती सांगेल. तुम्ही काही तिच्या जन्माला पुरणार नाही याची खात्री करा. ठीक आहे, मी तुम्हाला पसंत नाही. पण दुसरा माझ्याहीपेक्षा बदमाश निघाला तर.. .. .. . हे बघा परिस्थिती समजून घ्या. तिच्या पोटात माझं बाळ वाढत आहे. याचा विचार करा. सर्वच गोष्टी पैशानं पुर्ण होत नाहीत. आपण जे सुख सविताला मिळायला हवं म्हणून ती मला सोपवली. त्यावर विश्वास करा. तुमची मुलगी काही बाजारातील खेळणं नाही. मीही नाही. तुटला की फेकून द्यायचा. मला माझे कर्तव्य पुर्ण करु द्यावे.

काही लोकांच्या जीवनात बरेच काटे असतात. तुम्ही पाहिले नाही काय? काबाडकष्ट करतात बिचारे. आणि जावई

पाहिला तर दारुडा असतो. तो सतत दारु पिवून मारतो मुलीला. तरीही ते नांदवतात. त्यांची पत्नी त्याच माणसांजवळ असते.

लग्नानंतर या संसारात थोडाफार त्रास होणारच. त्याचा एवढा बाऊ करु नये. माझ्याकडे तर कोणताच त्रास नाही. झाल्या असतील चुका थोड्याफार. त्या विसरुन माफ करावे आणि सविताला आणून द्यावे.

पत्नी ह्या देव्या असतात. त्या अंध पतीलाही माधुकरी मागून जगवतात. त्यांचा त्रास नाही होत का पत्नीला. तरीही त्या करतात पतीसाठी तेवढी कामं. त्या घरंदाज स्त्रिया. पतीच्या सेवेतच विश्वाची कल्पना करतात. काही सुना तर अशा असतात की त्या आपल्या पतीधर्मासाठी गर्भश्रीमंत बापाचाही त्याग करतात हे आपण चित्रपटात बघतोच आहोत. खऱ्या जीवनातही काही ठिकाणी तसंच आहे.

कोणाची जिरवताय तुम्ही?ज्यांनी आपले बहिण भाटवे सोडून तुमच्या घराला स्वर्ग मानला. पण एक सांगतो, माणूस एकटा येतो. एकटा जातो. कोणाच्यानंच कोणाचं अडत नाही. पण ज्या क्षणभराच्या सुखासाठी माणूस तळमळतो ना. मेहनत करतो. कोणी चोऱ्या करतात. कोणी व्यसनं करतात. ते क्षणभराचं सुख नाही मिळालं तर माणूस बेचिराख होतो. तिच अवस्था सध्या माझी

होत आहे. ह्याच क्षणभराच्या काळात आम्हा दोघांनाही असं विघटनाचं दुःख झेलावं लागत आहे. पण एक सांगतो की तो दिवस दूर नाही ज्या दिवशी हे ही दिवसं निघून जातील माझे. मलाही तुमच्या मुलीबद्दल राग असेल. मीही तुमची नफरत करणार असेल. माझ्याही मनात तेव्हा तुमच्याबद्दल आसक्ती नसेल. मग तुम्ही धावाल माझ्या मागे. पण मी सापडणार नाही. मी बराच लांब गेलेला असेल.

खरं तर आपण आम्हाला मार्गदर्शन करायला हवं होतं. पण आपणच त्यात तेल टाकलं. आपण देवाच्या जागेवर असतांना राक्षसासारखे वागलात. आमच्या लहानशा परीवारात हस्तक्षेप केला. प्रारब्धानं चांगलं बोलायला जीभ दिली. पण तिचा वापर बरोबर केला नाही तुम्ही. आपण शिक्षक आहात समाजप्रबोधन करणारे. पण मला तुमच्या वागणुकीतून ते जाणवलं नाही. तुम्ही तर अखंड मदिरेमध्येच आनंद मिळवला आणि घरच्यांवर दबाव ठेवला नाही. म्हणूनच आपलं तिथं कोणी ऐकत नाही.

तुम्ही अंतर्मनातून विचार करा. इतिहास आठवा. अन् आत्मशुद्धी करा. पैसा कोणीही कमवतो. पैसा कसा खर्च करावा आपला अन् दुसऱ्याचा आजतरी शिका. साधारणतः जो पैसा चांगल्या मार्गानं कमविला जात नाही ना. तो पैसा अखंड

आजार, चोऱ्या, आत्मघात यात जातो. टिकत नाही. म्हणून खावटीचा विषय सोडा. हा खावटीचा पैसा आपल्याला माझ्या आनंदी मनातून मिळणार नाही. माझ्या मनाच्या शापातून मिळेल. तो आपल्याला व आपल्या मुलीला यथायोग्य लाभणारच नाही. कुणाचा आत्मा दुखावून पैसा कमावणार तर तो असाच जाईल.

जगात परिवर्तन झालं. जग चंद्रावर गेलं. व्याभीचार वाढला पृथ्वीवर. अर्धनग्नतेची परीधानता आली. काळ बदलला, काळासोबत व्यक्ती ही. स्वार्थ आला. स्वार्थासाठी लोक एकमेकांचे गळे कापणे. लुटणे, लोकांच्या चांगल्या जीवनात वादळं तयार करणे. ह्या गोष्टी शिकले. म्हणून काय पृथ्वीनं आपली फिरण्याची गती बदलविली काय?दिशा तरी.. .. . सुर्यानं आपलं उगवणं सोडलं काय? विज्ञानाचं खरंच भुकंप येणं थांबवलं काय?थोर महात्म्ये सुखी संपन्न होते. तरीही त्यांनी ते सगळं सोडलं. त्याग केला. कारण त्यांचा धर्म त्यांना आठवत होता. चिंताग्रस्त करीत होता. जी सेवा त्यांना करायची होती. परीवर्तनाच्या नावाखाली मला तुमच्याकडून ही अपेक्षा नव्हती की तुमच्या मुलीनं मला अकाळी सोडून द्याव. याच दुःखाच्या प्रगतीपथावर.

मला फॅशनेबल मुलगी हवी नव्हती. तुमच्या मुलीचे केस हे खुपच लांबलचक होते. ती बापकट राहणारी नव्हती. नव्हे तर

मला साधी सरळ वाटली. म्हणूनच मी होकार दिला. मला काय माहित होतं की की अशी वागेल. तुम्ही तिला असे वागायला प्रोत्साहन द्याल. नाहीतर मी बापकट मुलगी पाहिली असती माझ्यासाठी. लग्नापूर्वीची तुमची पुरुषाई पाहून मी विचार केला होता की तुम्ही चांगले असाल. पण नाही, माझं गणित फसलं. मी थोडा विचार करायला पाहिजे होता.

खरंच माणसानं विश्वास ठेवू नये कोणावरही. लग्नाच्या गाठी बांधतांना तरी नाही. कारण ही लगीनगाठ जन्मोजन्मीची असते. जर ती गाठ तुटकी असेल तर संसार तुटतो. मी नव्या पिढीला तोच संदेश देईल. '

जयनं खरमरीत पत्र लिहिलं होतं. त्याला वाटत होतं की सासऱ्याला राग आला तरी चालेल. पण त्यानं त्यांच्या डोळ्यात खरमरीत अंजन टाकलं होतं. त्याला वाटत होतं की त्यांनी पुन्हा आपल्या दुसऱ्या मुलीचा विवाह करतांना दुसऱ्या कुणाची फसवणूक करु नये. म्हणून तो एक बोध होता.

पत्र समाप्त झालं होतं. पण आठवण काही समाप्त झाली नव्हती. आता तिला भेटण्याचं पत्रच एक माध्यम उरलं होतं. ते पत्र ती वाचत होती की काय कुणास ठाऊक. पण तो पत्रानं आपल्या आठवणीचं खंडण करीत होता.

गुन्हे हे पुरुषच करतात असं जगजाहिर होतं. पण काही काही गुन्हे सर्रास स्त्रियाही करीत होत्या. पण ते जाहिरपणे दिसत नव्हतं. जयला पुर्वी तसंच वाटायचं. तो मानत नव्हता त्या गोष्टीला. जेव्हा लोकं सांगत की स्त्रियाही गुन्हेगार असतात. कधी कधी नकळत वर्तमानपत्रातून बातम्या यायच्या. अमक्या मुलीनं अमक्याची हत्या केली. पण तरीही तो स्त्रिजातीवर विश्वास करीत होता. त्यात पुरुषांचाच गुन्हा वाटायचा त्याला. पण आता तर त्यानं प्रत्यक्ष अनुभवलं होतं.

त्याला आता वाटायला लागलं की एखाद्या स्त्रीनं हिरवा कंदील एखाद्या पुरुषाला दाखवलाच नाही तर तो मुलगा तिच्या प्रेमात पडेल काय? प्रेम आंधळं असतं. ज्यावेळी व्यक्ती संपुर्ण प्रेमात पडतो, तेव्हा वाटतं की तू माझी नाही तर कोणाचीच होवू शकत नाही. मग पेट्रोल पण छिडकणं सुरु होतं तिचा नकार पाहताच. पण त्याला प्रेमात कोण पाडतं. अशा बऱ्याच घटना घडत आहेत. त्यापेक्षा स्त्रीनं हिरवा कंदील दाखवलाच नाही तर.. .. .. .. अशा घटना घडतील का? तसेच जर मग हिरवा कंदील जिथे दाखवलाच, तिथे अवेळी सोडून का जावं?अवेळी त्याला सोडून दुसऱ्यावर प्रेम का कराव?

खऱ्या प्रेमाची परियंती अशीच की जेव्हा खरं प्रेम असतं. ते विवाह करतात. समाजाची पर्वाही करीत नाहीत. पण जिथं खोटं प्रेम असतं, तिथं लग्न तर होतं, पण त्यानंतर भांडणं आणि घटस्फोट होतात. त्यानंतर खावटी. माणूस परेशान होतो. तो एवढा परेशान होतो की प्रसंगी काळकोठडी सहन करणं त्याच्यासाठी अवघड नसतं. पण ती अवघड असते. स्वतःचा जीव संपविणं त्याच्यासाठी अवघड नसतं. पण ती अवघड असते. कोणी कोणी तर आपलं जीवन संपवितात. कोणी मात्र तिचं. खरंच तो गुन्हेगार असतो का?

जयला वाटत होतं की निर्णय घ्यायला महिला स्वतंत्र्य असतात. तो त्यांचा हक्क ही आहे. पण असे उटपटांग निर्णय त्याला पसंत नव्हते की त्या तसल्या निर्णयातून आपलाच जीव धोक्यात पडेल. त्याला वाटत होतं की कुणाला जर निखळ सुख पाहिजे असेल तर त्यांनी विवाहच करु नये. कारण विवाह झाल्यानंतर व्यवहार आलाच. मुलं सांभाळणं आलंच. चुलही फुंकणं आलंच.

चैत्र महिना नुकताच लागला होता. वृक्षाला पालव्या फुटल्या होत्या. उन्हाळ्याची चाहूल लागली असली तरी बाहेर गारवाच होता. असं वाटत होतं की आताही हिवाळाच असावा. त्यातच सविताची आठवण आली. जर ती प्रसुत झालीच तर तिला भेटायला जायचं. परंतू तिच्या घरुन तर कोणतीच बातमी आली नव्हती. जयनं मनात दिवस मोजले होते. नववा महिना लागला असेल असं त्याला वाटत होतं.

काळ प्रदर्शनकारी होता. या काळात आई महत्वाची नव्हती. त्याची आई आधार देत होती त्याला. पण त्याला सविताचंही आकर्षण होतं. ती त्याला पोलिसाच्या स्वाधीन करायला पोलिसस्टेशनला त्याची तक्रार टाकायलाही गेली होती. तरीही ते आकर्षण स्वस्थ बसू देत नव्हतं. कदाचित ते बाळाचं आकर्षण होतं.

जयला सविताची आठवण यायची. पण तो तिच्या घरी जात नव्हता. कारण त्याच्या सासूनं म्हटलं होतं की मी हात धरुन बाहेर काढील. एवढा अपमान त्याचा आजपर्यंत कोणी केला नव्हता. जेवढा सासरकडील मंडळींनी केला होता.

त्याला तिची येणारी आठवण. कदाचित त्यालाही वाटत होतं की तिलाही आठवण येत असेल की नाही. अशातच एक बातमी कानावर येवून धडकली.

"तुम्हाला मुलगी झालीय. "

मुलगी झालीय, पाहायला या असा निरोप होता. पण जय निराश होता. त्याला वाटत होतं की हा डाव तर नाही सासूसासऱ्याचा फसवणुकीचा. कदाचित मुलीला समाप्त करुन नाव माझ्यावर टाकण्याचा. तसं त्यानं विचारलं,

"कुठं आहे भर्ती?"

"सरकारी रुग्नालयात. "

"बरं. "

निरोप देणारा माणूस निघून गेला. तसा जय स्वगत विचार करु लागला.

'भिकारी कुठले?मलाच म्हणत होते भिकारी. अन् दिलेवरी खाजगी रुग्नालयात करु म्हणत होते, अन् आता आपण स्वतः पैसे लागतात म्हणून सरकारी रुग्नालयात केली दिलेवरी. काल मी नापसंत होतो. अन् दिलेवरी होण्यापुर्वीही सांगीतलं नाही

त्यांनी आणि आता दिलेवरी झाल्यानंतर सांगीतलं. पण जावू नये. कदाचित.. .. .. '

त्यानं आपला विचार बंद केला. तसेही ते त्याला बदमाशच समजत होते. जसे जयने खुप सारे खुन केले होते. दरोडे टाकले होते.

जयनं जायचं टाळलं. कारण कदाचित बाळ मारुन टाकण्याची भीती होती किंवा कोणाला विकून टाकण्याची भीती वाटत होती. तसेच सवितालाही पाहता बरोबर टेन्शन येवून काही होण्याची भीती होती.

दिवा जळतो ते कोणालाही दिसतं. पण मन जळतं ते कोणालाही दिसत नाही. जयचंही तसंच होतं. त्याचं मन जळत होतं, पण ते कोणालाही दिसत नव्हतं.

दोन दिवस झाले होते. तो दिलेवरीवेळी गेला नव्हता. पण आज इच्छा होत होती. आठवण स्वस्थ बसू देईना. तेव्हा आवविचार न करता करता तो त्या सरकारी रुग्नालयात गेला तिला भेटायला.

त्यानं विचारपूस केली. त्याला काहीच माहिति भेटली नाही. तसा रुग्नालयात माहिति न भेटल्यानं तो तिच्या घरी

गेला. सोबत बिस्किटाचा पुडाही होता. त्याला माहित होतं की सविता भेटणार नाही. पुडा घेणे तर दूरच.

"सविता आहे का?"

"आहे, का आले?"

"सविताला भेटायला. "

"आतापर्यंत मेले होते काय?"

"मला आज भेटावसं वाटलं. "

"नाही भेटायचं तिला. "

"हा बिस्किटाचा पुडा ठेवून द्या. "

"आपला पुडा घेवून जा. "

त्याला खूप मोठा अपमान वाटत होता. पण काय करणार. भांडण झालं असतं. म्हणून तो गप्प राहिला. म्हणाला,

"जातो आता. "

"तुम्हाला बोलावलंच कोणं होतं. " बहिण म्हणाली.

जय तिथून निघाला. तो तिच्या नातेवाईकाच्या घरी गेला. तिथं बातमी मिळाली की मुलगी झालीय. पण ती मरण पावली. जसं जयनं मरण पावल्याचं ऐकलं. त्याला आनंद वाटला त्याचबरोबर दूःखही. आपला वंश जेव्हा मरण पावतो, तेव्हा

बापाला कधीच आनंद होत नसेल. पण जयला झाला होता. कारण तो तिच्या मोहमायेच्या बंधनातून सुटला होता. आणि दूःख याचं होतं की त्याचं रक्त नष्ट झालं होतं. पण मनात थोडी संशयता होती. ती संशयता म्हणजे सविता आणि जयची मुलगी तिच्या रिश्तेदारानं कदाचित विकून तर टाकली नसावी किंवा मारुन तर टाकली नसावी.

हताश मनानं जय घरी आला. जो मनात विचार केला होता. तेच घडलं होतं. हा संदेश होता की योगायोग ते त्याला समजत नव्हतं. पण रक्ताचा एक जीव त्यानं नक्कीच गमावला होता. कदाचित मरणही पावला असेल तिच्या पोटातील तो जीव. पण त्याचे हत्यारे तेच तिचे मायबाप आणि बहिण भाटवे होते. ज्यांनी जयपासून तिला तोडण्याचा प्रयत्न केला होता. जयला शंका आली होती की तिच्याच मायबापानं आपल्या मुलीचा विवाह दुसऱ्यासोबत लावून देण्यासाठी ती मुलगी मारुन टाकण्याचं धाडस केलं होतं. याचं कारणही तसंच होतं की सविता जयच्या बंधनात राहू नये.

आधीपासूनच गर्भपाताची धमकी देणारी ती सविता आज त्याला हत्यारीन वाटत होती. काही अपरिहार्य कारणांमुळे ते बाळ नाईलाजानं सविताला नऊ महिनेपर्यंत आपल्या गर्भात

वाढवावं लागलं होतं. शेवटी त्या बाळाला आधीपासूनच संपवू पाहणाऱ्या त्या कुटूंबानं ते बाळ अखेर संपवलंच. अन् ते बाळ मृत्यू पावलं हे जगजाहिरही केलं.

काळ असाच सरकत गेला. काळाबरोबर जय तिची आठवण विसरला. त्यानं लपुनछपून दुसरं लग्न केलं. ते लग्न जगजाहिर केलं नव्हतं. कारण त्याची सोडचिठ्ठी झाली नव्हती. त्याला वाटत होतं की जर आपण आपला विवाह जगजाहिर केला. तर आपली नोकरी जावू शकेल.

आज वीस पंचवीस वर्ष झाली होती. ती आता यायला तयार झाली होती. तसा जयला प्रश्न पडला होता. तिला आणायचे कसे? कारण त्याचं तर लग्न होऊन गेलं होतं.

तिनं आपल्या तरुणपणाची गरज आपल्या बायफ्रेंडकरवी पुर्ण केली होती. मात्र तरुणपण सरताच त्यानं तिला हाकलून लावलं होतं.

आज जयला ती नकोशी वाटत होती. कारण तिनं खुप सारे चटके त्याला दिले होते लग्नानंतर.

तिनं दत्तक मुलगा विकत घेतला होता. थकत्या काळात दत्तक मुलाचा जरी तिला आधार असला तरी आता तिला

आपला म्हणणारा जीवनसाथी हवा होता. तरुणपणाची जीवनसाथीची तिची कल्पना जरी योग्य असली तरी त्याच बायफ्रेंडने तिच्या शरीराचा उपभोग घेत तिला हुसकून लावले होते. तिला धोका दिला होता.

तिला आता पश्चाताप येत होता. मायबाप मरुन गेले होते. तर नातेवाईक तिला जवळ करीत नव्हते. कारण नातेवाईकांनाही तिचा स्वभाव माहित झाला होता.

ज्या व्यक्तीवर तिनं प्रेम केलं होतं. त्याच्यासाठी एवढं शरीर अर्पण केलं होतं. त्यानं तिच्याशी अद्यापही लग्न केलं नव्हतं. लग्नाचा जेव्हा विचार यायचा. तेव्हा तो काहीबाही बहाणे करुन टाळायचा.

आज तिला जीवनाविषयी तिटकारा वाटत होता. आपला पती आपल्याला खरंच येवू देईल काय असं वाटत होतं. जीवनाचं खरं तत्वज्ञान आज तिला कळलं होतं. मुलगा दत्तक घेतला असूनही तो तिला नकोसा वाटत होता. तसा तो आता सज्ञान झाला होता. त्याला खरं ते कळलं होतं. आपल्या आईनच आपल्या बाबाला सोडलं असं त्याला वाटत होतं. तो जरी सावत्र असला तरी स्वतःला तिच्या उदरातून जन्म घेतल्यासारखा वागत होता.

आता ती एकाकी पडली होती. जीवनात पैसाच महत्वाचा असतो ही भ्रमती दूर झाली होती. पैशामुळं सुख प्राप्त होतं. ही कल्पना देखील आज तुटून पडली होती.

तो तरुणपणाचा जोश होता की आपलं कोणी काही बिघडवू शकणार नाही असं तिला वाटलं होतं. पण आज नुकसानीची प्रचीती पंचवीस वर्षानंतर येत होती. सासूला वृद्धाश्रमात पाठवायला लावणारी ती आज स्वतःला वृद्धाश्रमात जावं लागते की काय याबद्दल शासंक होती.

अंजूम.. .. .. . जिला दोन मुलं होती. तिलाही पती होता. तिचा पहिला पती तिला सोडून गेला होता. तिलाही एक बायफ्रेंड होता. तो तिच्याशी लग्न करायला तयार नव्हता. कारण त्याला ती हवी होती. तिची मुलं नव्हती. जशी जयची तिची ओळख झाली. तसं त्यानं तिला सुधरवायचं ठरवलं. तो तिच्याशी मायेनं वागू लागला. तसा एक दिवस तिला म्हणाला,

"अंजुम, तू कोणाशी लग्न करुन राहायला जा. असं करणं बरोबर नाही. "

तशी ती म्हणाली,

"जय, तुम्ही स्वभावानं चांगले आहात. मी तुमच्याचकडे येवून राहते. वाटल्यास विवाह करते. मी तुम्हाला

आधार देईल. तुमच्या आईलाही सांभाळून घेईल. फक्त एक की तुम्ही माझ्या मुलांना आधार द्या. तुमच्यासारखा पती मिळणं कोणाच्या नशीबात आहे. तुम्हाला कोणत्याच प्रकारचा शौक नाही. "

"पण माझी पत्नी तर म्हणाली होती की तुम्ही बदमाश आहात म्हणून. "

"अहो, तिला काय समजणार. तुम्ही शिकले आहात. सुंदर आहात. तिला मस्ती आली. तिला जावू द्या. भोगेल ती. तुम्ही चिंता करु नका. माझ्यावर विश्वास ठेवा. वाटल्यास आपण विवाह न करता राहू. "

"नाही गं, सविता हिच माझी पत्नी. मी तिच्याशिवाय कोणावरच प्रेम केलं नाही आणि करणारही नाही. ती येईलच कधीतरी. "

"केव्हा येईल. म्हातारे झाल्यावर. ही तरुणाई पुन्हा काय तुम्हाला परत येणार आहे. अन् ती शेवटपर्यंत नाही आली तर.. .. . "

"तर मी तसाच राहिल. ती येईल, माझा विश्वास आहे. जेव्हा तिच्या मनातून कलुषता जाईल तेव्हा येईल ती. "

"कलुषता बाहेर निघेल कशी?"

"का निघणार नाही. ती तशी नाही. ती तर नातेवाईकाच्या भडकविण्यात आली. जेव्हा तिचे बंध तुटेल. तेव्हा येईल ती. पण तू मला सांग तू माझ्याशी लग्न करण्यापेक्षा एखादा करुन टाक नाहीतर आपल्याच पतीच्या घरी जा. "

"अन् त्यानं हाकलून लावलं तर. "

जयला विचार आला की एक ही की हिला हिचा पती नांदवायला तयार नाही आणि एक मी की माझ्या घरी सविता नांदायला तयार नाही.

असेच काही दिवस गेले व अंजुम आपल्या मुलांना आपल्या मायबापाच्या घरी सोडून एका हिंदू मुलासोबत पळून गेले. पुढं ती सुखात होती. तिनं काही दिवसानं आपल्या मुलांनाही नेलं होतं.

दत्तक मुलगा. लहानपणापासून तिनं त्याला वाढवलं होतं. लहानाचं मोठं केलं होतं. जपलं होतं. उन्हातून सावलीत नेलं होतं. आज तो तरुण झाला होता. पण त्याला तिच्या बायफ्रेंड सोबत वावरणं त्याला आवडत नव्हतं. तो तिला सारखा बोलायचा, भांडायचा. मारायलाही धावायचा. याचाच परीणाम बायफ्रेंडवर झाला व बायफ्रेंड चालता झाला होता.

आज सविताजवळ भरपूर पैसा होता. पण पैशाचा सदूपयोग होत नव्हता. आईबाप आज नसले तरी आईवडिलांच्या अकलेनं आज तिच्यावर ही वेळ आणली होती.

आज सायंकाळची वेळ होती. सुर्य मावळतीला टेकला होता. सहजच तिच्या मनात विचार आला. जय कसा असेल?त्यानं लग्न केलं असेल का?की आपल्यासारखाच तो लग्न न करता राहिला असेल. मी माझ्याच हातानं माझ्या पायावर कु-हाडी मारलेली आहे. बहिणभाटव्याचं ऐकून आईवडीलांचं ऐकून जीवनाचा सत्यानाश केलेला आहे. आता म्हातारवयात माझा बायफ्रेंडही मला सोडून गेला. माझा दत्तकही मला मारायला धावतो. अजून लग्न व्हायचं आहे तरी. माझं आता उतरत्या वयात कसं होणार. कदाचित हे त्या अतोनात प्रेम करणाऱ्या जयच्या शापाचं तर फळ नाही ना हे. जर मी त्याचं ऐकलं असतं तर.. .. .. . तर मी आज किती सुखी राहिले असते. माझा परीवारही असता आणि माझं जीवन उध्वस्त झालं नसतं.

आज ज्या मायबापाच्यामुळं मी माझ्या पतीला सोडलं, ते मायबाप तर गेले. ज्या बहिणभाटव्यामुळं मी सोडलं, ते माझ्याशी बोलत नाहीत. मी कशी आहे हे येवूनही पाहात नाही. माझ्याजवळून कधीही तिचा दूर न राहणारा तिचा मुलगा आज

जवळून जातो. पण बोलत नाही. मला त्यावेळी वाटलं होतं की माझी बहिण भाटवा मला साथ देईल जीवनभर. पण नाही. शक्य नाही.

माझ्या दोन्ही बहिणींनी मला समजून घेतलं नाही. माझ्या पतीविरुद्ध मला भडकवलं. पती पतीच असतो. पण मला त्यावेळी ते कळत नव्हतं. मी शंका करीत होते त्यांच्यावर. त्यांच्याशी बोलत नसायची. डोकं दुखते म्हणायची. ते निराशेनं पत्र पाठवायचे. पण मी ते वाचत नव्हते. मीच मुर्ख. किती त्रास दिला त्यांना.

लोकं तर जुव्वा खेळतात. त्यात आपल्या पत्नीला लावतात आणि विकून टाकतात. मंगळसुत्रही हिसकावून घेतात. जय तर त्यातील नव्हता. मीच पत्नीधर्माचं पालन केले नाही. त्यांच्या घरी राहिले नाही. मी त्यांच्यासोबत एक प्रेयसी म्हणून व्यवहार केला. प्रेयसी तरी बरी असते. पण मी. त्याही पलिकडचा व्यवहार केला. ते माझ्या बापाला म्हणत होते की उद्या खड्ड्यातून येवून पोसायचं. ते बरोबर बोलत होते. नव्हे तर त्यांच्या तोंडून त्या वेदना बोलत होत्या. त्या भावना बोलत होत्या. ज्या मला समजल्या नाहीत. पण त्या भावना तर माझ्या मायबापाला समजत होत्या ना. मग त्यांनी मला का समजावून सांगीतल्या नाहीत.

आज माझे आईवडील खड्ड्यातून मला पोसायला येत आहेत का? तर याचं उत्तर नाही असंच आहे. माझं दुःख मलाच भोगायचं आहे.

तरुणपणात शारिरीकतेची भूक असते. ती भूक माझी माझ्या बायफ्रेंडनं भागवली. पण ते कसे राहिले असतील?बायफ्रेंड.. .. . ज्याच्यावर मी फार विश्वास केला. त्याच्यासाठी पती सोडला. त्यानं माझा स्वार्थासाठी वापर केला. पण आज स्वार्थ संपल्यावर तो उठून पळाला. पण माझा पती पळाला असता काय? कायद्यामध्ये पतीला सोडता येत नाही. तो कधीच सुटला नसता. जयनं मला सांभाळून नेलं असतं. कधीच सोडलं नसतं. कारण तो निरतिशय प्रेम करीत होता माझ्यावर.

'चूक माझीच होती. ' सविताला सर्व आठवत होतं. आठवत होत्या त्या गतकाळातील सर्व आठवणी. तरुणपणी सोडचिठ्ठी झाली नसली तरी सोडचिठ्ठीची बातमी तिनं मैत्रीणीकरवी जयला पाठवली होती. त्या तशा सोडचिठ्ठीला मान्यता नव्हती.

ती नोकरी करीत असल्यानं तिला आयतं खायला मिळायचं. जयच्या जीवंतपणातच मंगलसुत्राचा त्याग करुन तिनं

जयला तोडल्याचं दाखवलं होतं. ती साधी चैन वापरत होती. बाळंतपणानंतर ती जयपेक्षा लठ्ठ झाली होती.

'मी माझ्या सासूचाही शापच घेतला. अर्धांगवायू मारलेली माझी सासू, माझी किती आस करीत होती. आज ती मृत्यू पावली असेल. पण मी पापी आहे.

मी माझ्या स्वतःच्या मायबापालाही सुख दिलं नाही. माझ्या वडिलांना जेव्हा हृदयविकाराचा झटका आला, तेव्हा जय त्यावर बोलला होता की तू जर माझ्या घरी असती तर असा झटका आला नसता. पण मीच त्यांना म्हटलं होतं की माझे मायबाप मरो की जावो. तुला काय करायचंय. मी माझं सुख बघितलं. त्याचं सुख बघितलं नाही. दत्तक मुलगा घेवून जगेल या निर्धारानं मी त्यांच्या घरी गेली नाही. अन् माझ्या वडीलांकडून होणारा त्यांचा अपमान मी सहन करीत राहिले. ते येत मला न्यायला केविलवाणा चेहरा करुन. पण माझी मीच वैरीण. मला त्यावेळी कोणी जिंदगी समजावून सांगीतली नाही. मला ती कळली ही नाही. आता जावेसे वाटते, कशी जाणार. ते ठेवतील का मला पंचवीस वर्षानंतर. अन् ठेवतीलही कदाचित. पण या माझ्या दत्तक मुलाला स्विकारतील का?'

आज ती जयची आठवण करायची. पण जय काही तिची आठवण करीत नव्हता. कधी पुसटशी त्याला आठवण यायची. पण त्या आठवणीत न राहता तो आपलं लक्ष इतर गोष्टींमध्ये गुंतवून टाकायचा.

वर्षाऋतूचं आगमण झालं होतं. मृग संपत आला होता. रोहिणी केव्हाच निघून गेल्या होत्या. तरीही पावसाचा एकही थेंब धरेपर्यंत पोहोचला नव्हता. शहरात कोरडा दुष्काळ पडतो की काय असं वाटायला लागलं होतं. नळातून एक दोन गुंड पाणी मिळायचं. कदाचित आठ दिवस जर पाऊस आला नाही तर किती दुष्काळ होईल याचा नेम नव्हता.

भर दुपारी चांगलं ऊन पडलं होतं आणि अचानक आभाळ भरून आलं. तसा एक एक थेंब पडायला लागला. एक एक थेंब करीत करीत तो वाढत गेला. तशी जयला सविता आठवली.

'टाळी काय एका हातानं वाजते काय?' तो स्वतः म्हणत होता. आपला काय गुन्हा असेल ह्याचं चिंतन करीत असतांना तो

काही प्रश्न स्वतःलाच विचारत होता. माझंही काही चुकलं असेलच. तो स्वतः मानत होता.

आपल्या घरी तिला स्वतः स्वयंपाक करावा लागायचा. तिच्या घरी तिला आयतं जेवन मिळायचं. जयला विचार यायचा. असाच एक विचार त्याच्या डोक्यात चमकून गेला.

माणसानं लग्न करावं लैंगीक टेस्ट करुन. प्रेम म्हणजे औपचारीकतेतून निर्माण झालेला संबंध. खरं प्रेम हे लग्नानंतरचं. लग्नापुर्वीचं प्रेम हे प्रेम नसतं. ती एक वासना असते. वासनेचं आकर्षण असतं. लग्नापुर्वी कोणीही प्रेमच करु नये. कारण लग्नानंतर त्यांच्या संसारात वितुष्ट निर्माण होतात. कारण पतीकडून अशा स्त्रियांना थोडा जरी त्रास झाला तरी स्त्रिया त्याची परियंती घटस्फोटात करुन घेतात. तो बायफ्रेंड त्यांना हवाहवासा वाटतो. तेच प्रेम त्यांना शाश्वत वाटत असतं. कारण ते प्रेम ओळखता येत नाही. काही महिला या यावरुन वेगळ्या असतात. त्या लग्नानंतर कितीही चांगल्या स्वभावाचा प्रियकर असला तरी त्याला सोडून टाकतात. आपल्या इभ्रतीला जपतात. तर काही स्त्रिया ह्या आपल्या मायबापाला लग्नापुर्वीच सोडून जातात. ज्यांना हे जमत नाही. त्या लग्नानंतर पळून जातात.

हे सगळं का घडतं? स्त्रियांना समानतेचा अधिकार मिळाला म्हणून. सरकारनं सामाजीकीकरणातून स्त्री सक्षमीकरणाचा विचार केला. त्यांना नोकऱ्या दिल्या. त्यांना आपल्या पायावर उभं केलं. पण काही काही स्त्रियांनी तर याचा गैरफायदाच घेतला. पुरुषांकडून स्त्रियांच्या मामसिकतेवर धक्का पोहोचतो, म्हणून ४९८ ब व १२५ अ आणली. जेणेकरुन पुरूषांनी स्त्रियांवर अत्याचार करु नये. त्यानंतरही पुरुषांचे अत्याचाराचे प्रमाण बंद झाले नाही म्हणून त्यांना ३३ टक्के आरक्षणही दिलं. त्यांना कायद्याचे अधिकार प्रदान केले. त्यांना शालेय शिक्षण मोफत केलं. मग पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियाही जीन्स आणि टी शर्ट वापरु लागल्या. स्कुटी आणि मोबाईलही. विदेशी भपकेबाज संस्कृती रुढ झाली. त्यातच माणुसकी विसरली गेली. मग तयार झाली एक जगावेगळी संस्कृती.

समानतेच्या अधिकारानं त्यांना कामं करण्याची जी संधी मिळाली. त्यातच त्यांचे छंद वाढले. मग नोकरी करणाऱ्या या स्त्रिया कोणा बेरोजगारासोबत विवाह न करता जोडीदार निवडू लागल्या नोकरीवर असणार ते तरुणे. जे तरुण तिकडे दुसऱ्यासोबत शारीरीक संबंध ठेवायचे. तरुणीही त्याच प्रकारात. आपल्या ऐषपणामुळं पुर्ण संस्कृतीचा नाश झाला. मग मी, माझी मुले, माझा

पती व माझे सासूसासरे म्हणण्याऐवजी मी एवढंच सत्य समोर येवू लागलं. पतीला त्या केरकचरा समजायला लागल्या. अशातच काही महिला तिकडे नोकरीवर असूनही आपल्या ऐषआरामामुळे मोबाईल, स्कुटी किंवा तत्सम प्रकारची नवऱ्याकडून गरज ज्यांची पुर्ण होत नाही, त्या चक्क पतीला सोडत बायफ्रेंड बनवतात आणि आपल्या गरजा पुर्ण करतात. त्या आपल्या स्व मुलाला आणि आपल्या पतीला आणि आपल्या सासूसासऱ्यांनाही त्रासदायक ठरतात आणि पतीनं काही म्हटल्यास उलट आरोप लावतात की पती बदमाश आहे. सासरची मंडळी वाह्यात आहेत.

कोणतीही स्त्री पतीला सोडून गेल्यावर उपाशी राहात नाही. ती आपल्या उदरनिर्वाहासाठी काही ना काही कामधंदे करतेच. छोटीशी मधमाशी किंवा मुंगीही अन्न मिळविण्यासाठी प्रयत्न करते. मग ही तर मानवजात आहे. कोर्टाचे चक्कर कापत असतांना स्त्रिया नोकरी करुनही त्या खावटी मागतात. पुरुषांकडून कोणताच अत्याचार न होवूनही त्याला खावटी देणे भाग पडते. त्यांच्या नैसर्गिक गरजा मारल्या जातात. त्याची मानसिकता ढासळली जाते. त्याला त्रास वाटावा म्हणून बायफ्रेंडच्या गाडीवर हसतहसत बागेत वा इतरत्र फिरु लागल्या. अशा काळात काही मुले तर एवढी निराश झाली की त्यांनी आत्महत्याच केल्या. काही

तर खुन करुन तुरुंगात खडी फोडत बसलेत. तर काहींनी लग्न न करण्याचा निर्णय घेतला. ज्याने खुन केले. तो माणूस गुन्हेगारी जगताचा बादशहा बनला. स्त्रियाही या बाबतीत मागे राहिल्या नव्हत्या. त्यांनी पुरुषांच्या संशयी वृत्तीमुळे बायफ्रेंडकडून त्या पुरुषांचा जीवही घेतला. अशा बऱ्याच बातम्या वर्तमानपत्रातून वाचायला मिळतात. त्या पतीनंतर एकच बायफ्रेंड ठेवीत नाही तर अनेक बायफ्रेंड एकाच वेळी बाळगतात. फक्त भेटण्याची वेळ वेगवेगळी असते. हेच बायफ्रेंड कधी संशयार्थ आपल्या प्रेयस्यांनाही संपवतात. कधी कधी ह्याच स्त्रिया आपल्या मुलांनी आपल्यासोबत बायफ्रेंडला पाहिलं, तो आपल्या पतीला सांगणार, म्हणून आपल्या सख्ख्या मुलांनाही संपवितात. पुरुषही या प्रकारात मागे नाहीत.

जय विचार करीत होता. त्याला आता सगळं आठवत होतं. एकदा एका पुस्तकातून एक गोष्ट वाचली होती. एका स्त्रिला फसवून मध्यस्थी माणसानं तिचं लग्न एका फिट येणाऱ्या माणसाशी लावून दिलं होतं. त्याला फिट येते हे सासरच्या लोकांनी दडवून ठेवले. लग्नविधी आटोपला. त्यानंतर ती पत्नीच त्याची. ती पत्नी असल्यामुळे तिला त्या गोष्टी माहित झाल्या. जसं तिला माहित पडलं की याला फिट येते. ती त्याला सोडून गेली. तिचं म्हणणं

एवढंच होतं की सासरच्या मंडळींचा त्रास आहे. खरंच किती बेकार असतात स्त्रिया. लग्नानंतर जर एखाद्या माणसाला पंगुत्व आलं, तर त्या सोडून जातात व आरोप करतात की सासरचे लोकं बदमाश आहेत. पण तिला जर असे रोग असले तर.. .. .. .. तर मग कोणाला दोष द्यायचा. खरंच ज्यांना असे आजार असतात. त्यांनी काय विवाहच करु नये काय?

जयनं मुली घटस्फोट घेवून वेगळे होतांना बरेचदा पाहिले होते. त्यात काही मुलेही वेडे झालेले पाहिले होते. काही मुलांना चिंतेनं अर्धांगवायू देखील मारलेले पाहिले होते. घटस्फोटाचे प्रमाण वाढतच चालले होते. कारण स्त्रियांना न कमवता खावट्या मिळत होत्या. समानतेच्या काळात स्त्रिया सबल असूनही न्यायालयात दुर्बल सांगून खावटी घेत होत्या. शासनही एकीकडे स्त्रियांना दुर्बल समजत आरक्षण देत होतं. तर दुसरीकडे तिला कोणी दुर्बल म्हटलं तर त्याला अटकही करीत होतं. शासनाच्या एका धोरणामुळं ती पंगू बनली होती. तर दुसऱ्या धोरणाने ती सबळ ठरली होती.

सरकारी नोकरीच्या बऱ्याचशा क्षेत्रात स्त्रिया आघाडीवर होत्या. पुरुषांची संख्या एकदमच कमी होती. मग स्त्रिया कशा दुर्बल हा प्रश्न जयला नेहमीच पडत असे. मग स्त्री जर दुर्बल

नाही. सोडचिठ्ठी घेतल्यानंतरही ती कमाऊ शकते हे माहित असूनही न्यायालयातून खावटी मिळत असल्याने बऱ्याच स्त्रिया या थोड्या थोड्याशा कारणाने पतीला सोडून जात होत्या. सोडून जाण्याच्या व खावटी वसूल करण्याच्या धमक्याही देत होत्या. म्हणून जयला वाटत होतं की ही खावटीची कलम व ४९८ अ ची कलम रद्द व्हावी. यामुळे घटस्फोटाचे प्रमाण कमी होईल.

कोणत्याही स्त्रीवर अत्याचार होवो अगर न होवो. ती फारकत घेतांना हुंड्यावरच जास्त जोर देत होती. मग नवरा मुलगा हुंडा मागो अगर न मागो. हुंडा मागणाऱ्यांचे प्रमाण जास्त झाले होते. यात हुंडा मागणारा जसा दोषी राहात होता. तसाच देणाराही तेवढाच जबाबदार होता. पण देणाऱ्याला काहीच होत नव्हते. मागणाऱ्याला शिक्षेचं प्रावधान होतं. न्यायदानात समानता नव्हती. त्यामुळे जयला आवर्जून वाटायचं की जोपर्यंत स्त्री पुरुषांच्या न्यायात समानता येणार नाही. तोपर्यंत समाज सुधारणा होणार नाही.

एकदा जय पतीपीडीत स्त्रीच्या घरी गेला. त्यानं एकंदरीत तिच्या घराचं निरीक्षण केलं. ती कोणत्याच बाजूनं पतीपीडीत वाटत नव्हती. छान सौंदर्याचं नटून होती. तिच्या एकंदर

वागण्यावरुन तिनंच पतीला प्रताडीत केलं असावं असं वाटत होतं. तिलाही पाचशे रुपये खावटी मिळत होती.

एक पत्नी जर सोडून गेली तर दुसरी पत्नी करता येत नाही. न्यायालयात त्याला मंजुरी मिळत नाही. न्यायालय सांगतं की मिळतं जुळतं घ्या. म्हणून ते लवकर निर्णयही लावत नाही. दुसरी पत्नी न करु देण्यामागे न्यायालयाचा उद्देश संसार विस्कटतो असा असतो. ते तेवढंच सत्य आहे. पण जी राहायलाच तयार नाही अशावेळी पुरुषानं काय करावं. ती न्यायालयात वकीलामार्फत सांगते की ती नांदायला तयार आहे. पण प्रत्यक्षात तिचं बोलणं वेगळं असतं. ती पंचमहाभूतातून निर्मीती असलेल्या या पुरुषांच्या नैसर्गिक लैंगीकतेवर बंधन घालू शकते. हे न उलगडलेले कोडे जयला परेशान करीत होते. स्त्री मात्र या कोर्टामुळे खुश असते. कारण तिला कोर्टामुळे खावटी मिळत असल्याने तिला पूर्णतः ऐषआराम करता येतं. अन् पुरुष एखाद्या प्राण्यागत ढोर मेहनतच करीत असतो.

ज्याच्या वंशा जावे, तेव्हा कळे प्रमाणे ज्याची पत्नी नांदत होती. ते जयला हासत होते. अन् टिंगलटवाळी करीत होते.

"पत्नीसाठी तुम्ही आहे. तुमच्यासाठी पत्नी नाही. मग तुमच्या आईला अर्धांगवायू असो की तिला कॅन्सर असो, तुम्हाला पत्नीच्या मनानुसार तिला वृद्धाश्रमात ठेवावंच लागेल. " सासू म्हणत होती. वकीलानंही तेच म्हटलं होतं. पण वकील आईला वृद्धाश्रमात टाकावं लागेल हे म्हणत नव्हता. तर खावटी द्यावी लागेल हे म्हणत होता.

पत्नीला काहीही झालं तरी पतीनं सांभाळायचं. अन् पतीला काही झालं तर पत्नीनं पळून जायचं. हा कुठला न्याय?अशा कित्येक केसेस जयनं पाहिल्या होत्या. एका शिक्षकाचं प्रकरण त्याच्या लक्षात होतं. त्याचा पगार बंद असतांना असाच तो अंधारी येवून कोमात गेला होता. तेव्हा त्याची पत्नी त्याला सोडून गेली होती. दुसरी एक गोष्ट त्याला आठवत होती. ती बौद्ध समाजाची. तो हिंदू समाजाचा. तो डॉक्टर, ती एम ए झालेली. दोघांचं निरतिशय एकमेकांवर प्रेम. कोर्टात लग्न केलं. बौद्धविहारातही लग्न केलं. मुलीनं दोन दिवसानं नांदायला येईल असं सांगीतलं.

मुलगा दोन दिवसांनी जेव्हा न्यायला गेला, तेव्हा तिनं सांगीतलं की मी येत नाही. तो माघारी फिरला काही न म्हणता.

आठ दिवस झाले होते. मुलीनं पोलिस स्टेशनला तक्रार केली की माझ्यावर मानसिक दबाव आणून माझ्याशी विवाह

रचला व माझ्याशी बलत्कार केला. कोर्टात केस सुरु झाली होती. त्यात ती जरी डॉक्टरालायक नसली तरी खावटी वसूल करीत होती.

कित्येक स्त्रिया आपल्या पहिल्या पतीकडून जेव्हा माहेरी येतात. काही दिवसानंतर लपून छपून लग्नही करतात. मुलं घेवून येतात. ती मुलं पहिल्याच पतीच्या नावानं शिकवितात. पण हे लग्न लपवून ठेवलं जातं. त्याचबरोबर खावटीही वसूल केली जाते दुसऱ्या पतीकडे राहूनही. काही तर चक्क बायफ्रेंडच ठेवतात. हे सारं जय पाहात होता.

कोणत्याही गुन्ह्याची चौकशी न करता या घटस्फोटाच्या खटल्यात पुरुषांना अटक होत होती. न्यायालयातही खरा न्याय मिळत नव्हता. तरीही शेकडो लोक न्यायासाठी न्यायालयात जात होते. ज्या वकीलाला जास्त पैसा मिळत होता. तो वकील पक्षकाराची बाजू सबळपणे मांडत होता. ज्यांच्याकडे पैसा नव्हता. ती व्यक्ती जास्त पैशाचा वकील करु शकत नव्हती. स्त्रियांचं ठीक होतं. तिला मिळणाऱ्या खावटीमुळं तिच्या वकीलाची फी भागत होती. पण पुरुषांचं काय?तो तर खावटी, वकीलाची फी, तसेच कोर्टाचे चक्कर यामुळं बेजार होत होता.

काही मुली लग्नानंतर खाजगी कारणानं मरत होत्या. पण माय बाप सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करुन लढत होते.

ब्लॅकमेल करीत होते. असे कितीतरी खटले त्याला आठवत होते. पण तो त्यावर काहीही करु शकत नव्हता.

मुलगी मरण पावली की नाही हे जयला माहित नव्हतं. पण तो जेव्हा तिच्या घरी गेला आणि झालेला अपमान सहन करुन जेव्हा तो आपल्या घरी आला. तेव्हापासून तो तिला विसरुन गेला होता. सवितानं जसा बायफ्रेंड पकडला. तसं आपणही एखादी गर्लफ्रेंड पकडावी असं जयला वाटत होतं. मुलगी मरण पावल्याची पावती तिच्या नातेवाईकानं दिल्यानं त्याला हायसं वाटत होतं.

त्यानं अशीच एक मैत्रीण पकडली होती. पण सोडचिठ्ठी न झाल्यानं तो तिच्याशी विवाह करु शकत नव्हता. तो खरं तर तिला महान समजत होता. कारण तिला सर्वकाही माहित असूनही ती त्याच्यासोबत राहायला तयार झाली होती. तिला माहित होतं की ती कदाचित उद्या येवूही शकते. तरीही तिनं त्याला आधार दिला होता. नव्हे तर सवितासोबत लढण्यासाठी ती त्याला सामर्थ्य ही देत होती.

जयला घरी करमत नव्हतं. त्यामुळं तो आपला जीव गमवायला फिरायला जायचा. त्यातच त्याला एक तरुणी मिळाली. औपचारिक ओळखीतून तिच्यावर प्रेम निर्माण झालं. तिही

त्याचेवर प्रेम करु लागली. त्याला तर प्रेमच हवं होतं. त्यालाही वाटत होतं की कोणीतरी आपल्यावरही प्रेम करावं. कारण अशाच प्रेमातून तो सविताला विसरणार होता. ते त्याच्या सविताला विसरण्यावर रामबाण औषध होतं. आजपर्यंत त्यानं कधी कोणावर प्रेम केलं नव्हतं. पण आता त्याला प्रेम करावसं वाटत होतं. तिनंही त्या गोष्टीला आपली सहमती दर्शवली होती. मग तो तिच्या घरी जायचा. तिही घरी यायची.

एक दिवस त्यानं तिची त्यानं परीक्षा घ्यायचं ठरवलं. म्हणाला,

"मला तुझ्या घरी यावसंच वाटत नाही. "

"का बरं?"

"तुझ्या घरची मंडळी काही म्हणतील. "

ती खुप निराश झाली. अन् तिनं त्यावर एक चिठ्ठी लिहिली. ही सोडचिठ्ठीची चिठ्ठी नव्हती. तर ते एक प्रेमपत्र होतं. ते प्रेमपत्र त्यानं वाचलं. ते त्याच्या अंतकरणाला भिडलं. पण ते न वाचल्याचा आव आणत तो म्हणाला,

"काय लिहिलं होतं पत्रात?"

"काही नाही. माझ्या भावना होत्या. "

"कशाला लिहिल्या होत्या?"

"तुम्ही माझं मन दुखवता ना. मग मी काढली माझ्या मनाची भडक. मी माझ्या मनाच्या पटलावर तुमची प्रतिमा कोरलेली आहे. "

"अं राहू दे तुझ्याजवळच. स्त्रियांना जेवढे केसं असतात. तेवढेच मिसही. त्या केव्हा विश्वासघात करतील याची शाश्वती नाही. ती सविता. तिच्यावर मी निरतीशय प्रेम केलं. पण माहित आहे तुला. तिनं माझा विश्वासघात केला. आजही ती माझ्या मनात आहे. पण यायला तयार नाही. अगं, मी मान्य करतोय की टाळी एका हातानं वाजत नाही. चुका माणसाच्याच हातून होतात. प्राण्यांच्या नाही. पण त्यावर माफी तर असते ना. मी बरेच वेळा माफी मागितली. पण ती.. .. .. ती माफच करायला तयार नाही. दुसरा राहिला असता तर तिच्याकडं ढुंकूनही पाहिलं नसतं. म्हणून मी कोणावरही विश्वास ठेवत नाही आणि ठेवू तरी कसा विश्वास?"

"हे बघा, सर्वच मुली ह्या काही तिच्यासारख्या नसतात. त्यात सर्वच मुलींची गणती करु नका. तिला संसार करायचा नव्हता. कारण तिला जर संसार करायचा राहिला असता तर, जेवढं तुम्ही तिच्यासाठी बदललात. तेवढी ती बदलली नाही.

बदलणे हा स्त्रिचा धर्म असतांनाही. मला तर वाटते की तिनं तुमच्याशी लग्न फक्त ऐषआरामासाठीच केलं. मी तिच्यासारखी नाही. "

"माहित आहे. आज सर्वच मुली ह्या पैशावर प्रेम करतात. "

ती गप्पच झाली. तसं तिनं दुसरं पत्र लिहिलं. त्यात लिहिलं होतं.

"प्रिय मित्रा, कधीही विसर न पडावा एवढे तुमचे प्रेम पाहून माझे हृदय निकामी झाले. जीवन म्हणजे केवळ तुम्ही, असं वाटायला लागलंय. सदैव तुमचा चेहरा असतो माझ्या डोळ्यासमोर. आजुबाजूचे विश्व काय ते आठवतच नाही. मनाच्या प्रत्येक कोपऱ्यात तुमचं वास्तव्य आहे. आपल्या प्रेमाला मान्यता नाही. ते केवळ आपल्यापुरतं मर्यादित आहे. दोन हृदयाचं मिलन. त्यात तिसऱ्याला जागा नाही. आपलं प्रेम हे आपल्या दोघातच फुलू द्यावे. त्यामध्ये तिसरा येता कामा नये. पैसा म्हणजे कोणीतरी तिसराच. तो मला मान्य नाही. "

ते पत्र म्हणजे त्या जयला आनंदाची पर्वणीच वाटली. एकीकडं ती पत्नी होती की जिनं विवाहापुर्वी त्याच्यासोबत राहण्याचं आणि त्याला सांभाळून घेण्याचं त्याच्या आईला वचन

दिलं होतं. पण ती ते वचन तोडून गेली होती. तर दुसरीकडं आता जयला मिळालेली ही अबला होती. जी त्याच्यावर आज जीवापाड प्रेम करीत होती. तिला तो काहीही म्हणत होता. पण ती काही त्याचेवर रागावत नव्हती. त्याचं बोलणं मनाला लावूनही घेत नव्हती. तर ती त्याही परिस्थितीत त्याला सहकार्य करीत होती. ती त्यांना महान वाटली. आज तिनं त्याचं मन जिंकलं होतं. तरीही आपल्या हळव्या मनाला तसं वाटू न देता जय चूप बसला. चूप बसणं तो गरजेचं समजला. कारण त्यानं तसं जर केलं नसतं तर हिचंही मन तुटलं असतं व तिही निघून गेली असती. एरवी आता ती त्याचा एकमेव आधार होती.

आता ते एकमेकांशिवाय राहू शकत नव्हते. पण कायद्यानुसार ते विवाह करु शकत नव्हते. तिही त्याची कैफियत माहित असल्यानं त्याच्यावर विवाहासाठी आग्रह करु शकत नव्हती. मात्र ती जयला दिलासा देत म्हणायची,

"तुम्ही आतापर्यंत खुप दुःख झेललं. दुःखातच तुमचं जीवन गेलं. आजही तुम्ही दुःखातच आहात. तेव्हा मी माझ्या लग्नानंतरही महिण्यातून एकदा तुमच्या घरी येणार. तुम्हाला एकाकी सोडणार नाही. "

त्यावर तो तिला म्हणायचा,

"हे बघ, लग्नानंतर सगळं सोडायचं असतं. त्यानंतर पती हाच सर्वस्व असतं. बायफ्रेंड ठेवायचा नसतो विवाहानंतर. कितीही चांगला असला तरी.. .. .. .. आपला संसार बघायचा. लग्नानंतर माहेरचे सर्व लोकं काही दिवस तरी विसरावे लागतात. कारण माहेच्याच मंडळींच्या बहकाव्यात येवून आपल्या संसाराला गालबोट लागतं. याचा अर्थ असा नाही की माहेरच्या लोकांचा सन्मान करु नये.

"माहित आहे तुला. क्षणभर बायफ्रेंडच्या हवेचा गारवा तरुणाईची उब आहे, तेव्हापर्यंत मनाला मोहून टाकते. पण जेव्हा ती तरुणाई आपल्या शरीरातून निघून जाते, तेव्हा मात्र आपलं आपल्यालाच कळतं की मी फार मोठी चूक केली. पतीला सर्व प्रिय असतं. पण तो एक गोष्ट सहन करु शकत नाही. ती म्हणजे तिचा बायफ्रेंड. ज्याप्रमाणे स्त्री तिची सवत सहन करु शकत नाही. तिच परिस्थिती पुरुषांचीही असते. काही गोष्टी लग्नानंतर विसरायच्याच असतात. "

"नाही, मी तुम्हाला एकाकी सोडणार नाही. कारण तुम्ही माझं पहिलं प्रेम आहात. मला आधार देणारे. पहिलं प्रेम मी कसं विसरणार. मी माझ्या पतीला विसरु शकेल. पण पहिलं प्रेम. मी तुमची शपथ खावून बोलते. "

"इथंच तर चुकतं आपलं. आपण आपलं पहिलं प्रेम समजून पहिल्या प्रेमाला विसरु शकत नाही लग्नानंतरही. म्हणून तर घटस्फोट होतात. "

आधीच सविताची वचनं आश्वासन व शपथेनं चूर झालेल्या जयला तिची शपथ खोटेपणाची वाटत होती. तिचं त्याच्यावर असलेलं खरं प्रेम सवितामुळे खोटंच वाटत होतं. तो सरासरी तिच्यावर विश्वास ठेवू पाहात नव्हता. त्याला वाटत होतं की मुली लग्नाच्या पुर्वी अशाच बोलतात. शपथा घालतात. वचनं आश्वासनं देतात. पण ती आश्वासनं, वचनं पाळत नाही. त्या शपथाही तोडल्या जातात.

सरला.. .. .. . दिसायला सुंदर होती. ती जयला गवसली. एक प्रेमिका बनून. ज्याप्रमाणे राधा क्रिष्णावर प्रेम करायची. तसंच काहीसं सरलेचंही जयवर प्रेम निर्माण झालं होतं. तिचं प्रेम स्वार्थी नव्हतं.

ती गरीब होती. मजबूरही होती जयसारखीच, पण लाचार नव्हती. स्वाभिमान तिच्यात कुटकूट भरला होता तिच्यात. ती निरतिशय प्रेम करायची जयवर. तसा कधीकधी जयला विचार यायचा की काश!ही सरला आपल्याला लग्नापुर्वी मिळाली असती तर.. .. .. ..

ती त्याचेसाठी औषध होती सविता नावाच्या आजाराला दूर पळविण्याचं. म्हणून तोही तिच्या प्रेमात पडू पाहात होता. प्रसंगी आता तो तिला मदत करीत होता.

सरलाला माय नव्हती. तिची आई पाच वर्षापुर्वीच मरुन गेली होती. बाप होता. तोही आजारी होता. त्याचेमुळे त्याच्यानं कामं जमायचे नाहीत. घरी एक बहिण होती. तिही त्यांना सोडून गेली होती खूप दूर. तिचा अजूनही शोध लागला नव्हता. त्यामुळं घरची सगळी जबाबदारी जयवर आली होती. ती एकाकी झाली होती. घरी बाप व ती त्यामुळं दिवसं काढणं कठीण झाले होते. त्यामुळं तिला वाटायचं की कोणीतरी भेटावा. आपल्या सुखदुःखावर विचारावं व आपल्या सुखदुःखात सहभागी व्हावं. त्या सुखदुःखाची काळजी घ्यावी. कोणीतरी असा भेटावा की ज्यानं आपल्यावर निरतिशय प्रेम करावं.

जयतर प्रेमासाठी मैत्रीण शोधत होताच. अशावेळी सरलाचं भेटणं त्याला अमृतकलश भेटण्यासारखं वाटलं. ती प्रेमाच्या गोष्टी त्याला सांगू लागली. दोघांचंही एकमेकांच्या घरी जाणं सुरु झालं. तो तिचं दुःख ऐकून घेवू लागला. ती त्याचं. दोघांची मैत्री घनदाट होत चालली होती.

आता जयला सविताची पाहिजे तेवढी आठवण येत नव्हती. तो तिची आठवण विसरत चालला होता. ती पत्नीपेक्षाही जास्त आवडायला लागली होती. तिचं पाऊल त्याच्या जीवनाला सुखदायी ठरलं होतं.

कधीकधी जेव्हा जय दुःखात राहात असे. तेव्हा ती त्याला सांत्वना देत असे. ती चांगली बोलत असे. कधीकधी वाटायचं की ही घोका तर देणार नाही.

तो तिची चर्चा मित्र, नातेवाईक यांच्याशी करु लागला. त्यांनी परामर्श दिला की ती फक्त पैशावर प्रेम करते. एकदा का तुम्ही पैसा दिला नाही की मग बघा. पण त्याला आता त्यांचे सल्ले पटायचे नाहीत. कारण त्याला सवितानंतर खरा आधार या सरलानं दिला होता हे तो विसरु शकत नव्हता. त्यामुळं आता त्यानं आपल्या नातेवाईकाची पर्वा केली नाही. सदैव तो तिच्याच दुःखात दुःख व सुखात सुख शोधू लागला.

एकदा तिचं डोकं फार दुखत होतं. तिनं ती गोष्ट जयला सांगीतली. जयनं लवकरच तिला आराम पडावा म्हणून तिला औषधी आणून दिली. बस तोच प्रसंग. तिला त्याच्याबद्दल आत्मीयता निर्माण झाली होती. दुःखाच्या वेळी संकटात धावून

जातो. हे तिनं कहाणी मध्ये वाचलं होतं. पण आता ते प्रत्यक्षात घडलं होतं.

ती विचार करीत होती की जयला आपण औषधी आणण्याविषयी सांगीतलं नाही. तरीही त्यानं तिच्यासाठी औषधी आणली. तो खरा मित्र आहे. याची जाणीव तिला झाली होती. तिनं निर्धार केला होता की आपण जयलाच मित्र बनवावं कारण जय आपल्या गरजा पुर्ण करु शकतो स्वार्थ न ठेवता.

कदाचित याच दिवसापासून तिच्या मनात जयविषयी आकर्षण व पुढं प्रेम निर्माण झालं. पण या प्रेमाला कुणाची दृष्ट लागू नये असं त्याला वाटत होतं. त्याला हेही वाटत होतं की सविता आणि आपल्या प्रेमाला अशीच दृष्ट लागली असेल.

जयची सोडचिठ्ठी अद्यापही झाली नव्हती. अन् ती नांदायला ही येत नव्हती. त्यामुळं त्याच्या समोर प्रश्न मोठा गंभीर उभा होता. तिचे बोलणे ऐकायला येत होते. सोडचिठ्ठी झाली असं ती इतरांना सांगत होती.

आज त्याच्या जीवनात सरलाचं आगमण म्हणजे शिशिरात वृक्षाची पानं झडून वसंतात त्या झाडाला नवी पर्ण फुटावी असं होतं. शिशिर म्हणजे सविता की जी त्याच्या मनातून

पानाप्रमाणे निघून जाणार होती तर सरला म्हणजे वसंतात जशी पालवी फुटून वृक्षाला तरलता येते, त्याप्रमाणे होती.

जय देवदास चित्रपट पाहात होता. त्यात देव उच्चशिक्षीत जरी असला तरी निरक्षर पारुच्या  तो प्रेमात पडला होता. पण जेव्हा त्याला पारु मिळाली नाही, तेव्हा तो व्यसनाच्या आहारी गेला होता. तो चित्रपट पाहतांना सहज जयला विचार आला. स्त्री जातीच्या निर्णयावरही जयला आक्षेप होता. त्याला वाटत होतं की स्त्री आपले निर्णय घ्यायला दुसऱ्यावर अवलंबून असते. ती निर्णयासाठी कोणत्याही पुरुषांच्या कक्षेच्या बाहेर जात नाही. मग ती कितीही बलवान असो. तिचं जर कोणावर प्रेम असेल कितीही. तरीही बापानं म्हटलं की प्रेम सोडून दे तर ती सोडून देते व बापानं म्हटलं की अमक्याशी प्रेम कर तर करते. बापानं म्हटलं जयच्या घरी जायचं नाही तर ती येत नाही. हे त्यानं प्रत्यक्ष सविताच्या बाबतीत अनुभवलं होतं. कधी कधी तर प्रेयसीच्या प्रेमात धोके मिळाल्यास पुरुष व्यसनाच्या आहारी जातात.

जयचं प्रेम फुलत चाललं होतं. तशी एका दिवशी सरला त्याला म्हणाली,

"पुरुषांचं प्रेम अफाट असते. ते स्त्रिवर प्रेम करतात. पण जिला समजते तिच स्त्री पुरुषांचं प्रेम समजून घेवून तशी वागते.

त्याचं प्रेम जाणून घेण्याचा प्रयत्न करते. पुरुष कधीच प्रेम दाखवत नाहीत. ते दाखवायची गरजच समजत नाहीत. त्यांचही बरोबर आहे. प्रेम हे मनात असणं आवश्यक. कारण प्रेम जर दाखवलं तर त्या प्रेमाचे फायदे घेणारे घटक जास्त. हे प्रेम कृतीतून सहज दिसते. ते बोलून दाखविण्याची गरज नाही. तुमच्याबद्दल सांगायचं म्हणजे तुमचं माझ्यावर निरतिशय प्रेम आहे. पण तुम्ही ते दाखवत नाही. अन् दाखवालही कसे?कारण तुम्हू फार मोठ्या संकटात फसले आहात. पण मीही तुम्हाला वचन देते की मिही तुम्हाला त्या संकटातून बाहेर काढील. "

ते ऐकताच त्याला हायसं वाटलं. तसा तो सविताला विसरण्याचा प्रयत्न करु लागला.

जय बऱ्याच गोष्टीवर विचार करायचा. एकदा असाच विचार करीत असतांना सहजच त्याला विचार आला. मुलगी उपवर होते. मग त्याप्रमाणे आंब्याच्या झाडाला आंबे लागल्यावर मुलं दगडं मारतात तसे मुलं तिला पाहायला येतात. मग मुलं तिला पसंत करतात. लग्न होतं. मुलगी घरातून पाय बाहेर काढते. ती दुसऱ्याच्या घरी जाते. मग ती आपली कोणीच नाही असं ठरवत तिची रवानगी होते सासरला. तिही सुरुवातीला गोडी ठेवते

माहेरशी. पण काही काळानं तिही माहेराला एवढी विसरते की तिला माहेरची आठवणच येत नाही. मग संसार सुरु होतो. पती दररोज कामाला जातो. सायंकाळी कामावरून येतो.

सुरुवातीला पत्नीला त्याच्या कामावर येण्याचं कौतुक वाटत असतं. तो केव्हा केव्हा कामावरुन येतो, म्हणून ती सारखी वाट पाहात असते. पण जसजसे दिवसं जातात. काळाच्या ओघात मुलं होतात. त्यानंतर तिला त्याची काळजी वाटत नाही. हुरहूर राहात नाही. मग भांडणं होतात थोड्या थोड्या कारणावरुन. त्यातच कधी कधी कामावर काही अपरिहार्यपणे प्रसंग घडतात. तेव्हा तो घरी आल्यावर घरीही जर त्याची पत्नी त्याच्याशी भांडत असेल तर दुसऱ्या दिवशी तो आपल्या मित्रांना सांगतो. मित्र त्याला घरी जाण्यापुर्वी मदिरापान करण्याचे सल्ले देतात. तो सायंकाळी मदिरापान करुन घरी जातो. पत्नी आपल्या पतीची अवस्था पाहते की तो मदिरापान करुन आला. ती त्याचेही काही बोलत नाही. तिला पश्चाताप होतो. तरीही होणारा पश्चात्ताप ती बोलून दाखवीत नाही. त्याचेवर ती क्षमाही मागत नाही. त्याला बरे वाटते की आपल्याला घरी कोणी बोलत नाही. त्याचे अशाच विचारातून शौकं वाढतात. ती मात्र अबोलपणे सगळं सहन करते. मग काय एखाद्या दिवशी तोल जातो व ती त्याला घटस्फोट मागते. तिचं ते

बरोबर असतं घटस्फोट मागणं. त्याला सोडून जाणं. पण तो मदिरापान करायला का शिकला याचा ती विचार करीत नाही. पुर्ण दोष ती त्यालाच देते.

जीवन जगत असतांना काही दुर्दैवी घटना घडतांना आपण पाहातो. काही माणसे मजुरीला जातात. तर स्त्रिया ही. पण काहींच्या घरी स्त्रिया घरीच राहतात. अशांच्या घरी स्त्रिया कामावर जातात. त्यातच ते अवघड कामं करतात. कोण्या मजुरांना कधी दूर इमारतीच्या उंचीवर काम करावं लागतं तर कधी एखादा विहिरीचा खड्डा खणावा लागतो. खांबावर वीज सुधरवावी लागते. तेव्हा एखादा तोल जातो. तो पडतो. किरकोळ दुखापत होते. ती सांगण्यासारखी नसते. कधी विहीर खोदतांना एखादं दगड अंगावर पडतं. पण जीव गेलेला नसतो. त्या प्रकारांची चीड असते मनात. असे मजूर जर सायंकाळी घरी आले आणि त्यांनाही बायका मुलांची किरकिर सायंकाळी ऐकायला मिळाली तर किंवा घरचं वातावरण. घरची त्याची पत्नी सोडून गेलेली असली तर किती वेदना होत असाव्यात याची कल्पना न केलेली बरी. पत्नी माणसाच्या यशाचा आधार असते. पण तिनं त्या गोष्टी समजून घ्यायला हव्यात. काही स्त्रिया नक्कीच चांगल्या असतात. त्या स्त्रिया आपल्या पतीला समजून घेतात. पण काही तर निरंतर

किटकिटच करीत असतात. त्यांना पुरुष म्हणजे निव्वळ दगड मातीचा सांगाडा वाटतो.

पुरुषांनाही भावभावना असतात. त्यांनाही दु:ख होतं. त्यांनाही पत्नीच्या धीराच्या शब्दाची गरज असते. पत्नीचे चांगले शब्द नसेल किंवा पत्नी जर नसेल तर त्याला संसार म्हणत नाही. त्यांची अवस्था असून नसल्यासारखी असते.

नैसर्गिक शक्तीनं माणूस बनवतांना स्त्री देखील बनवली. का? तर पुरुषांना आधार देण्यासाठी. पण अशावेळी आधार जर मिळत नसेल तर त्या माणसाच्या जगण्याला अर्थ उरत नाही. त्याला जगावसंच वाटत नाही. त्यातच तो मेहनत करीत असलेल्या पैशातून खावटीची रक्कम जात असेल तर त्याला न जगण बरं वाटतं.

पती कोणकोणत्या विवंचनेतून घरी येतो. हे पत्नीनं समजून घ्यायला हवं. तो घरी आल्याबरोबर त्याला कोणत्याही गोष्टी तुरंत सांगू नयेत. त्याला हातपाय धुवायला पाणी नाही दिलं तरी चालेल. परंतू त्याला पत्नीनं सर्वप्रथम एक ग्लास पाणी प्यायला द्यावं. पाणी पिताच त्याचं मन शांत होतं. त्यानंतर काही वेळानं त्याला काही सांगता येते. पण आजच्या स्त्रीया अशा गोष्टी समजूनच घेत नाहीत. जयला याच गोष्टीचा राग येत होता.

जयला काहीतरी काम असल्यानं तो आठ दिवस तिच्या घरी गेला नाही. पण ज्यादिवशी गेला. त्यादिवशी कळलं की तिला मलेरिया झाला आहे. सतत थंडी लागून ताप येतो आहे. घरी कोणीही नव्हतं. बाप प्रकृती सुधारल्यानं कामावर गेला होता. ती एकटीच घरी होती. त्यानं तिच्या कपाळाला हात लावला. अंगात ताप फणफणत होता. तसं त्यानं विचारलं,

"दवाखान्यात गेली होती का?"

"नाही. "

"का बरं?"

"पैसे नाहीत. "

"फोन का केला नाही?"

"नाही केला. तुला त्रास घ्यावासा वाटला नाही. "

"अगं पण त्यात कसला आला त्रास?"

"तुला सतत त्रास देणं आवडत नाही. "

"हे असं बोलणच तर मला आवडत नाही. तू मला आपलं समजतेस ना. मग अशी बोलते. चल दवाखान्यात. "

"नको. मी होईल बरी. "

"नाही नाही, चल. विना औषधानं कोणी बरा तरी होतो काय?"

तशी ती गप्प राहिली. जयनं तिला उठवलं. चहा बनवून पाजला व तिला जबरदस्तीनं दवाखान्यात नेलं.

ती मलेरियातून बाहेर निघाली होती. तिला बरं वाटत होतं. तो तिच्या आता दररोजच घरी जायला लागला होता. कारण आता तिच्या घरी कोणी राहात नव्हतं. बापही कामाला जात होता. तिलाही एकटं वाटत होतं. त्यालाही एकाकी वाटत होतं. तो मन रमविण्यासाठी जात होता. तसेच तिला आधार देण्यासाठीही जात होता.

हळूहळू सरलाचं त्याचेवरचं प्रेम फुलत चाललं होतं. कधी ती प्रेमाच्या गोष्टी करायची त्याच्याशी. पण काही गोष्टी तिला बोलून दाखवता येत नव्हत्या. त्या ती एका कागदावर लिहित असे. जेव्हा तिला त्याची आठवण यायची. ती चिठ्ठी तो घरी निघाला की त्याच्या हातात देत असे. एकदा अशीच चिठ्ठी तिनं त्याच्या हाती दिली. त्या चिठ्ठीत लिहिलं होतं.

"प्रिय सख्या, जीवन म्हणजे खडतर वाटेवरचं चालणं. कधी विचार केला नव्हता की जीवन एवढं वाईट असतं. जेव्हापासून तुम्ही माझ्या जीवनात आले, मला जगावसं वाटतं. पण

हे प्रेम निष्पाप असूनही आपण एकमेकांच्या जवळ येवू शकत नाही. पण काही का असेना, या श्वासांना केवळ तुमचीच गरज आहे. मला नाही वाटत की मी तुमच्याशिवा जगू शकेल. मनाला आतुरता ती केवळ तुम्हाला बघण्याची, पाहण्याची. मन अगदी तुमच्याकडं खेचून नेतं मला. ज्या दिवशी तुम्ही माझ्या जीवनातून निघून जाल, तो दिवस माझा पृथ्वीवरील शेवटचा दिवस असेल. मी कुठेही असो, माझं हे प्रेम तुमच्यासाठी असेल. तुम्ही म्हटलं आहे की मी तुझ्या शेवटच्या श्वासापर्यंत तुझ्यासोबत असेल. तुझा साथ सोडणार नाही. अगदी मी परायी झाले तरीही.. .. .. .. .. "

मनाच्या शेकडो चिरकांड्या व्हाव्यात असं ते पत्र वाचतांना जयला गहिवरुन यायचं. त्यानं तिच्यावर कोणती जादू केली होती कुणास ठाऊक. पण ती तशा प्रकारची चिठ्ठी केवळ त्याला प्रेम पाशात पाडण्यासाठी लिहित होती. तेही ठाऊक नव्हते. पण जयवर तिचं मात्र निरतिशय प्रेम होतं हे त्या चिठ्ठीवरुन जाणवत होतं.

जयला आता बरं वाटत होतं की त्याच्यावर जीव लावून कोणीतरी प्रेम करते आहे. कोणी कोणी तर आपल्या मुलीकडून पत्नीकडून लैंगीकतेचे धंदे करवून घेतात आणि घर चालवितात. कोणी कोणी महिलाही. पण ही त्या दृष्टिकोणातील

नव्हती. कारण तिला लैंगीकतेचं असलेलं आकर्षण तिच्या स्वभावातून जाणवत नव्हतं. ते फक्त निखळ प्रेम करीत आहे राधेसारखी. असंच वाटत होतं.

कितीही तिच्या मनात प्रेम निर्माण झालं असलं तरी जयनं त्यात व्यवहारीकता आणली नव्हती. त्याला वाटत होतं की या प्रेमाचा आणि तिच्या मजबूरीचा फायदा घेतल्यास नियतीही आपल्याला माफ करणार नाही. तिचा भोळा स्वभाव जरी असला तरी तिला जर व्यवहारीकता माहित झाली. तर ती त्याला सोडून जाईल. मग काय आपल्याला पुन्हा दुःख शोसावं लागेल पुर्वीसारखं.

प्रेम हे प्रेम असतं. त्याला आपल्या जागी ठेवावे असं त्याला वाटत होतं. त्यानं जे संकट झेलले होते. त्यानं झेललेल्या संकटामुळं तो आपल्या पत्नीला सर्वस्व मानत होता. आपल्या पत्नीला आपण झेललेल्या संकटांचा सामना करावा लागू नये असं त्याला वाटत होतं.

चारगोष्टी जयनं अनुभवल्या होत्या. निर्णय, पैसा, प्रशंसा व आवड. ह्या चारही गोष्टी स्त्रीयांना आवडतात. या चारही गोष्टी माणसानं आपल्या स्त्रिच्या सुखासाठी केल्यास स्त्री टिकते. असं त्याला आधी वाटायचं. ह्या चारही गोष्टी त्यानं सविताच्या

मनामनानं केल्या होत्या. पण त्याचा उलट परिणाम पाहायला मिळाला होता.

काळ बदलला होता. त्यापैकी स्त्री ही जास्तच बदलली होती. त्यानुसार जयला वाटत असे की स्त्रियांना कधीही प्रत्येक बाबतीत निर्णय विचारु नये. कारण तो त्याला कोणतेही निर्णय घ्यायचे असल्यानं तो आपल्या सविताला विचारीत असे. पण याच त्याच्या सतत विचारण्यामुळं त्याच्यावर आई सोडायची वेळ आली होती. तो कधी कधी आपल्या पत्नीची प्रशंसा करीत असे. पण सर्वांना प्रशंसा पसंत नसते. कधी कधी काही स्त्रिया ह्या हुरळून जातात. याच कारणानं सविता जयच्या डोक्यावर बसली होती.

तो तिच्याजवळ पैसाही ठेवीत असे. पण तो पैसा त्याला घातक ठरला होता. ती आपल्याजवळील पैसा आपल्या वडीलांना देत होती. कधीतरी हाच जय तिच्या आवडीच्या वस्तू तिला न कळता घरी आणत असे. पण त्यातही तो अपयशी ठरला. कारण ती यामुळंच जास्त भाव खायला लागली.

"मी कोणाला घाबरत नाही. आईवडीलालाही नाही. " हे आजच्या फॅशनेबल मुलींचे बोलणे. आजच्या फॅशनेबल पणामुळं पती तर सोडा. मुली आपल्या मायबापालाही ओळखत नाहीत. अन् आपल्यावर जीवापाड प्रेम करण्याचं नाटक करणाऱ्या

त्या बायफ्रेंडच्या नाटकात अडकतात. तो त्यांना महत्वाचा वाटतो. बायफ्रेंडच्या नादात त्या आपला जीवही द्यायला तयार असतात. पण पतीसाठी त्या कोणतेही काम करीत नाहीत. एवढे दिवस लहानाचे मोठे करणारा बाप बायफ्रेंडमुळे आवडत नसून दोन दिवसांचा आलेला बायफ्रेंड त्यांना आवडतो. मग मायबापाला न सांगता फिरायला जाणं, त्यातच मदिरापान करणं याही गोष्टी त्यांना आवडत असतात.

कोणीही आपलं अतीत आपल्या पत्नीला सांगू नये. किंवा पत्नीने आपल्या पतीला सांगू नये. कारण त्यामुळं संसारात वितुष्ट निर्माण होतं. ते आपल्या भांडणाच्या वेळी ते आपलं अतीत काढत असतात. त्यातून आपलीच बदनामी होते. सविताला जयनं सांगीतलेलं अतीत त्याच्या बदनामीचं कारण ठरलं होतं. नव्हे तर त्याचाच फायदा तिनं घेतला होता. कधीही याच अतीतनं आपल्याला न्याय मिळवितांना आपल्याला न्यायालयात पराजयाचा सामना करावा लागतो. तसंच आजच्या फॅशनेबल काळात कोण कोणाचा केव्हा विश्वासघात करेल हे सांगता येत नाही.

प्रेमाच विश्वास, त्याग, बलिदान असल्यामुळे पतीचं जिथं सुख असेल त्या सुखासाठी पत्नीनं स्वतःच्या इच्छेचा त्याग

करुन आपलं सांसरीक जीवन पुढं चालवायला हवं. पतीनंही पत्नीसाठी तेच करायला हवं. तसंच एखाद्या संकटाच्या ठिकाणी पतीनं तिचं संरक्षणही करायला हवं. पण आजच्या परिवर्तनवादी काळात याला महत्व कोणी देत नाहीत. याचा परीणाम ते कुटूंब उध्वस्त होण्यात होते. शंका कुशंका निर्माण होतात. मग या संशयी वृत्तीमुळे ते प्रत्यक्षात कानानं ऐकलेलं सत्य वाटतं. पण हे खरं नसतं. डोळयानं त्र्यांशी टक्के व कानानं अकरा टक्के ज्ञान प्राप्त होतं. त्यामुळं कान हे धोका देवू शकत नाहीत. तरीही सर्वच गोष्टी ऐकायच्या नसतात. परिस्थीतीशी जुळवून घ्यायचं असतं. जेणेकरुन तराजूच्या दोन्ही बाजू समतल होतील. पण लक्षात कोण घेतो. यामध्ये फक्त कधीकधी पत्नी परीस्थितीशी जुळवून घेत असते, तर कधीकधी पतीच. त्यामुळे त्या पत्नीला वाटते की प्रत्येक वेळी का मीच परिस्थितीशी जुळवून घ्यायचं, त्यानं कधीच तसं मागं हटू नये काय? यातुनच वितुष्ट निर्माण होतं.

कुटूंबात स्त्रियांना मानाचं स्थान असतं. प्रत्येक स्त्रीला कुटूंबाचा आधारस्तंभ मानण्यात येतो. पुर्वीच्या काळी कुटूंबात मातृसत्ताक कुटुंबपद्धती अस्तित्वात होती. त्या ठिकाणी खरं तर टोळीतील सदस्यांचा विकास चांगल्या प्रकारे होत होता. आजही ज्या कुटूंबात स्त्री चांगली, त्या कुटूंबाला कोणत्याच

बाबीत भटकावे लागत नाही. खरं तर ती आपल्या कुटूंबाला घडवू शकते. वाटल्यास वाईट मार्गाला लागलेल्या व्यक्तीला वाईट मार्गापासून परावृत्त करु शकते. पण त्यासाठी तिच्या निस्सीम प्रेमाची गरज असते.

स्त्री कधीही दुर्बल नाही. मोठमोठ्या स्त्रियांनी राक्षसांचा वध केला. अशा आख्यायिका आहेत. तसेच माणसांचा जन्मही बाईच्याच गर्भातून होतो. हेही विसरता येत नाही. मग ज्या माणसाला ती जन्म देते. सबल बनविते. मग ती बाई दुर्बल कशी? ती स्वतः दुःखात जगून दुसऱ्यास सुख देते. असे असतांना सविता का बरं मला सोडून गेली असावी असं जयला वाटत होतं.

"किती महिने झाले लग्नाला. "

"तीन महिने. "

"तीन महिण्यात त्यानं कोणता त्रास दिला?"

"नाही, तो हुंडा मागतो दररोज तगादा लावतो. "

"हे बघा, काय झालं तुम्हाला नीट सांगता येत नाही. जिथे जीवनभर एकत्र राहणारी मंडळी एकमेकांना ओळखू शकत

नाही. तिथे तुम्हाला तीन महिण्यात काय समजलं. " महिला सेलची बाई विचारत होती. तिचं खरंही होतं. कारण अख्खा जन्म जातो. पण ऐनवेळी अकस्मात असा राग येतो माणसाला की रागाच्या भरात तो काय करीत आहे हे कुणालाच सांगता येत नाही. बाहेरील काही मंडळी त्यावर तोडगा काढण्यासाठी धजत नाहीत. तर तेही त्या माऊलीच्या दुःखात आगीत तेल टाकण्याचे काम करतात. त्यातच यातील पती पत्नी बाकीच्या लोकांच्या भडकविण्यातून भांडलेच तर जी भडकविणारी मंडळी असते. ती मजा पाहात असते. हेच सत्य आहे.

स्त्रीनं आजच्या काळात जगावं कसं? हेच समजत नाही. स्त्री अनेक काळाची माता जरी असली तरी ती एका क्षणाची पत्नीही असते. तिनं पुरुषासोबत राहावं म्हणून त्यांना नैसर्गिक लैंगीकतेची शक्ती दिली निसर्गानं. केवळ ही शक्ती मानवांनाच दिली नाही तर प्राणीमात्रांनाही दिली. त्या शक्तीवर लगाम कसता येत नाही. त्यानुसार प्रत्येक प्राणीमात्र, जीवजंतू एकत्र येतो. काही काळासाठी राहतोही. पण जेव्हा पती पत्नीच्या नात्यात क्षुल्लक कारणानं वितुष्ट निर्माण होतं आणि मायबाप जेव्हा आपल्या लेकीला माहेरी आणतात. जावयांना धडा शिकविण्यासाठी. तेव्हा ह्या नैसर्गिक शक्तीला नियंत्रीत करणं कठीण जातं. तिलाही आणि

त्यालाही. कारण मायबाप काही या प्रकारच्या नैसर्गिक शक्तीवर उपाय काढू शकत नाहीत. जिथे विवाहापुर्वी ह्या शक्तीला नियंत्रीत करण्यासाठी लोकं बायफ्रेंड पकडतात. तिथे विवाहानंतर असा प्रसंग आलाच तर मग त्या विभक्त झालेल्या जोजप्यांनी काय करायचं? महत्वाचं म्हणजे तेही आपल्या नैसर्गिक गोष्टीसाठी बायफ्रेंड गर्लफ्रेंड पकडणारच. जे पकडत नाहीत. ते मात्र वेडे पिसे झालेले आहेत. अशी भरपूर उदाहरणं जगात आहेत. पण समाज त्यांना दुषणे देत त्यांना बदनाम करतो. खरं तर यात चूक समाजाची असत. त्यांनी समजवायची गरज असते. पण समाज काही त्याना दिशा दाखवत नाही. पण त्या चुकीचे परीणाम त्या मुलामुलींना भोगावे लागतात.

संसार कुणाचाही असो असा बिघडायला नको. शंकाच असतात तर चौकशी करुन विवाह होणे गरजेचे असतांना गुडघ्याला बाशिंग बांधून उतावीळ पणाने आजचा समाज आपल्या मुलामुलींचे विवाह करतात. मग फसतात. कारण आजच्या धकाधकीच्या काळात चौकशी करायला कुणाजवळ वेळ नाही. एकमेकांचे मन जिंकून जरी ते विवाह करीत असले तरी धावपळीच्या या काळात लोक फक्त पैशावर प्रेम करतात. क्षणभराच्या सुखासाठी लाखो रुपये खर्च करण्याकडे लोकांचा

कल आहे. शिवाय स्थानिक नोकऱ्या नसल्यामुळे आपल्या पत्नीपासून कितीतरी दिवस दूर राहणारे पतीपत्नी आपल्या आपल्या बायफ्रेंडचा सहारा घेतात. प्रेमासाठी आज विश्वास, त्याग तर अजिबात राहिलाच नाही. यामुळे कधीकधी वाटते की पुर्वीचाच काळ चांगला होता. त्या काळात मुलगी मागतांना सर्व चौकशी करीत होते. एरवी दिली गाय तिची आशा काय म्हणत मायबाप तिच्यावर होणाऱ्या अत्याचाराकडे पाहात नव्हते. परंतू त्या अत्याचारात एक शिकवण असायची. संस्कार असायचा. कारण मुली अगदी लहान असत. बालवयातच लग्न होत असे. बापांनाही जास्त लेकरं असल्यानं बाप आपल्या मुलीकडं पाहात नव्हता. तिला स्वयंपाक येतो की नाही ही जबाबदारी मायबापाची नव्हती. ते सगळे बोध सासूसासरे शिकवायचे. प्रश्न हा आला की असे बालविवाह करतांना मुलगी अतिशय लहान असायची आणि मुलगा म्हातारा. त्यातच तो लवकर मरायचा आणि विधवेपणाला समोर जावं लागायचं. ती विधवा जर नाही झाली लवकर तर सतीपण. नाहीतर मग विधवेचं दु:ख. परीणामी ही प्रथा कालबाह्य ठरली. आज जोडीदार निवडीचं स्वातंत्र्य आलं.

काल डोक्यावरती पदर राहायचा. आज मात्र तो दिसत नाही. काल गावातील प्रत्येक माणसांचा मान स्त्रिया करीत.

तो आज दिसत नाही. आज म्हाताऱ्या माणसांचीही टिंगल टवाळकी केली जाते. तसंच जमान्याला लोकं दोष देतात. दोष जमान्याचा नाही तर दोष आपल्या मनाचा आहे. आपण आपले मन बदलविण्याची गरज आहे. चांगलं वाईट ओळखण्याची गरज आहे.

आज जे स्वातंत्र्य आलं. त्यानुसार दिवसागणिक पती बदलवले जातात. तसेच पुरुष पत्न्या बदलवतात. म्हणजेच पुर्वी सावकार, जमीनदार आपल्या बायका बदलवायचे. आज तर कोणीही बदलवतो. पण कायद्याच्या चौकटीत राहून नाही. आता कोण सासू, कोण मोठा, कोण गावातला, कोण जेष्ठ कोणत्याच बाबी पाळल्या जात नाहीत. प्रसंगी आजच्या काळात एकमेकांचा पानउतारा काढण्याची पद्धत आहे.

आमची पुर्वीची संस्कृती वडीलधाऱ्यांची इज्जत करणं शिकवीत असली तरी बदलत्या काळात कोणी कोणाची इज्जत करीत नाही. त्यामुळं कधीकधी वाटतं की आमची पुरातन संस्कृती चांगली होती. परंतू परीवर्तनाच्या या कक्षेत बदलत्या काळानुसार आम्ही बदलत आहोत. परंतू आम्ही हेही लक्षात घ्यायला हवे की आम्ही जरुर बदलावे. परंतू कमीतकमी आमच्या संस्कृतीची इज्जत करावी. वडीलधाऱ्यांचीही.

पुर्वी बाई चूल मुल सांभाळायचं कार्य करीत होती. ती अशिक्षीत असायची. पण घटस्फोटाचं प्रमाण फार कमी असायचं. ती अशिक्षीत जरी असली तरी आपल्या लेकरांना शिकवायची. घटस्फोटाच्या बाहेरचं शिक्षण द्यायची. मुलांना अशा परक्या प्रेमाचा मज्जाव असायचा. हो ठीक आहे की काळ बदलला. मुलांना आपला जोडीदार निवडीचं स्वातंत्र्य मिळालं. पण जो जोडीदार ती मुलं निवडतात. त्याचेवर माया लावतात. तो खरंच आजच्या काळात शेवटपर्यंत टिकतो काय? तो टिकत नाही. मग जोडीदार निवडून काय उपयोग? जो जोडीदार निवडला त्याचेसोबत शेवटपर्यंत जर राहता येत नसेल तर मायबापांनी निवडलेले जोडीदार कामाचे की स्वतः निवडलेले, याचा विचार करण्याची आज गरज निर्माण झालेली असून आज विवाह करतांना नेमके काय करावे हेही समजेनासे झालेले आहे.

'एक ना धड भाराभर चिंध्या' अशी समाजाची अवस्था झालेली असून नोकरी करणारी आधुनिक स्त्री कितीही स्वतःला समाजसुधारक मानत असली तरी ती समाजसुधारक होवू शकत नाही. कारण आजच्याच शिकलेल्या या समाजसुधारक स्त्रीयांच्याच पोटची मुलं आज मायबापाला पोसत नाहीत.

वृद्धाश्रमात टाकतात. आजची स्त्री आपल्या मुलांवर व्यवस्थीत संस्कार करु शकत नाही. कारण ती आपल्या पतीला समानतेच्या हक्कामुळं मानसन्मान देत नाही. मुलांसमोर हाय डॉग म्हणून पतीला जेव्हा आजची स्त्री आवाज देते, तेव्हा ह्याच पती पत्नीचे असे वागणे पाहून मुलंही हाय डॉगच म्हणतात. मग स्वतःचा बापाला डॉग म्हणता म्हणता म्हातारपणात त्याचा डॉगच होतो व त्या बाळाची पत्नी आल्यावर त्याच बापाची अवस्था घरी किंवा वृद्धाश्रमात डॉगसारखीच होते. याला जबाबदार कोण? तर त्याची आई. जर या डॉगपणाचा पतीनं विरोध केल्यास सुशिक्षीत पतीपत्नीत वितुष्ट येतं व त्याचीही परियंती घटस्फोटाच्या खटल्यात होते. म्हणून तो गप्प असतो. आता विवाह देखील करार पद्धतीनं व्हायला लागलीत.

जय आज पन्नास वर्षाचा झाला होता. तिही सत्तेचाळीस वर्षाची झाली होती. हवं ते तारुण्य उरलेलं नव्हतं. तो सुखी होता. समाधानीही होता. त्यानं सविताला म्हटलं होतं की आज तुला मजा वाटते मला सोडतांना. पण जेव्हा तू पन्नाशीच्या जवळपास जाशील, तेव्हा तुला कळेल की बायफ्रेंड आणि पती काय असतो. त्यावेळी तुला पश्चात्ताप वाटेल. मी जेव्हा तुला संपुर्ण

विसरेल. तेव्हा तू आठवण करशील माझी. मला तर माहित आहे की जी माझ्याजवळ टिकू शकली नाही. ती इतरांजवळ कशी टिकेल. लोकं तर आपलं कुंकू वाचविण्यासाठी आपलं सर्वस्व पणाला लावतात. पण तू तुझं मंगलसुत्रही गळयातून काढून ठेवलंय. ज्या मंगळसुत्राच्या लहानशा धाग्याला आज फार मोठी किंमत आहे.

मंगळसुत्र.. .. .. .. . लग्नानंतर याचा फार मोठा उपयोग असतो. परंपराच होती ती. ते नसले तर माणूस मृत्यू पावला असा अर्थ होतो. ते मंगळसुत्र तिनं काढून ठेवलं होतं. त्यामुळं परंपरेनुसार जयला ते तिनं काढून ठेवल्यानं फार वाईट वाटत होतं.

आपल्यातील श्रेष्ठत्व सांगताना जय तिला म्हणाला होता की माझ्यात काय कमी आहे. माझे वर्तमानपत्रात लेख छापून येतात. तरीही तुला माझ्यात कमीत्व वाटलंमाझी पुस्तकं निघाली आहे. पण एक सांगतो की जरी मी पसंत नसेल आणि तू दुसऱ्या कुणाशी विवाह केलाच. तर त्या व्यक्तीशी कृपया अशी वागशील नको.

मी एक कलावंतच नाही तर शिक्षकही आहे. पण तुझ्या मित्रमैत्रीणी म्हणतात की तो शिक्षक वाटत नाही. कसा वाटणार?कारण आज माझी तशीच अवस्था झालीय. तू केलीय. तू

तर माझा सन्मान करायला पाहिजे होता कारण मी श्रेष्ठ होतो तुझ्यावरुन. हा अहंकार नाही. तर तुला माहिती देत आहे. त्री ही खरंच महान असते. जर तिनं विचार केला तर ती पुरुषामधून शिवाजी महाराज घडवू शकते. डॉक्टर बाबासाहेब ही घडवू शकते. अन् जर तिनं विचार केला तर विना विवाहानं जन्मभर राहू शकते.

अतीव प्रेम करणारी मुलगी, आज बायफ्रेंड सोबत पळून गेल्यावर त्या बायफ्रेंडनं धोका दिल्यावर ती त्याच्या घरुन निघते. ती मायबापाच्या घरीही जावू शकत नाही. मग तिच्यासमोर पर्याय नसतो. शेवटी ती आपलं अस्तित्व समाप्त करते आत्महत्या करुन. हे सत्य आहे. अंतिम सत्य असल्यासारखं. यासाठीच तिनं सन्मानानं उभं राहावं म्हणून समाज पद्धती रुढ झाली. विवाह करतांना जातीची मुलं पाहणं न्याय समजलं गेलं.

पुर्वी मुलगी आणि मुलगा यांचं कुळ जुळतं का? गुण जुळतात का?गोत्र जुळतात का? नातं मिळतं का?ह्याचा विचार करुन विवाह होत असत. जेणेकरुन कोणी जर असा घटस्फोट घेतलाच तर त्यांचा गुन्हा असल्यास जबर शिक्षा म्हणून त्याला समाजातून निष्काशित करणे अर्थात वाळीत टाकणे. दुषणे देणे. ह्या गोष्टी व्हायच्या. म्हणून कोणी जास्तकरुन मुलींना सोडत नसत. सोडलं तर या समाजाच्या दुषणानं जगणं मुश्किल व्हायचं.

विवाह जरी जातीत होत असले तरी त्या विवाहात उत्पन्न होणारे विघ्न पाहून याचा विचार करुन समाजसुधारकांनी प्रेमाचा सिद्धांत मांडला. तसेच जोडीदार निवडीचं स्वातंत्र्य आणलं. पण याच स्वातंत्र्यानं पुढं जावून जुळत्या संसाराला तोडलं. कारण प्रेमाच्या विवाहाला मान्यता नसल्यानं नातेवाईकांनी समाज दुषणे देतो, वाळीत टाकतो म्हणून प्रेम करणाऱ्या आपल्या वंशजांना कान कापून सोडलं कारण त्यांना मुलं मुली राहायची. त्यांचा विवाह करणं असायचा. तो विवाह समाजात व्हावा. लोकांनी आपल्याला स्विरारावं. वाळीत टाकू नये हा त्यात हेतू होता.

प्रेमवीर प्रेम करुन पळून तर जायचे. विवाह करायचे, संसार थाटायचे. त्यांना मुलं व्हायची. पण या मुलांनाही समाजात मान उरायचा नाही. कसेबसे हे प्रेमवीर विवाह करायचे. पण जेव्हा त्यांच्या मुलांचा प्रश्न उपस्थीत व्हायचा, तेव्हा मात्र विचार यायचा. कारण त्या मुलांचं लग्न रीतिरिवाजानुसार करणं शक्य व्हायचं नाही. त्यामुळं पश्चाताप व्हायचा. त्यानंतर ते मार्गदर्शन करायचे की अ ाम्ही फसलोत, पण असा प्रेमविवाह करु नका.

परिवर्तनाची नांदी. मुलीही उच्चशिक्षीत झाल्या. पुरुषांबरोबर त्याही नोकरी करु लागल्या. मग जोडीदार निवडीचं

स्वातंत्र्य असल्यानं स्वतःच स्वतःचे जोडीदार निवडू लागल्यात. लग्नानंतरही प्रेम करु लागले. आपले बायफ्रेंड, गर्लफ्रेंड ठेवू लागलेत. आपल्या यशाचे श्रेय चक्क बायफ्रेंडला देवू लागलेत. काही काहींचं हे विवाहानंतरही प्रेम. यातच कर्तृत्वाचं श्रेय ज्यांना मिळायला पाहिजे होतं. तो पती कालबाह्य ठरला. ज्यांनी लहानाचं मोठं केलं. त्या मायबापांना श्रेय देण्याऐवजी बायफ्रेंडला देण्याने विघ्न उत्पन्न झालेत व घटस्फोटाची प्रक्रिया सुरू झाली. कारण घराबाहेर पडण्याचं स्वातंत्र्य मायबाप व पतीनं प्रदान केल्यानं त्या स्त्रियांना पुढचं यशाचं पाऊल उचलता आलं.

परिवर्तनाची कास. त्याच परिवर्तनाच्या नांदीनं जोडीदार निवडीचं स्वातंत्र्य. मग पळून जावून विवाह. मग शुल्लक कारणावरुन वाद. मायबापाची भांडणं होवू लागली होती. मग मुलातही फरक पडू लागला होता. आईवडील भांडतांना स्वतःला श्रेष्ठ समजत असल्यानं त्यांची मुलं कंटाळली. ती लहान मुलं आपल्याला आपले मायबाप नसते तर बरं झालं असतं असं मानायला लागली. ती मुलंही आपल्या आईवडीलांपासूनच शिकली. मायबाप जसे आपले बायफ्रेंड गर्लफ्रेंड ठेवीत होते. तिही मोठी झाल्यावर बायफ्रेंड गर्लफ्रेंड ठेवायला लागलीत.

स्त्री ही पुरुषांची अर्धांगीनीच असते. पण पतीसोबत राहतांना स्त्रिया त्या गोष्टी का विसरतात असा प्रश्न कधीकधी जयला निर्माण होत असे. कारण त्याची सविता हे सगळं विसरुन आपल्या मायबापाचं सतत गुणगान करीत असे. आपल्या पुर्ण गरजा आपले मायबाप आजही पूर्ण करतात असे ती म्हणत असे. त्यामुळं साहजिकच जयला राग येवू लागला. मग जयचं उत्तर ठरलेलं असायचं. जर तिचे मायबाप तिच्या गरजा पुर्ण करीत होते तर विवाह केला कशाला? तो तिला तसाच म्हणायचा. यातूनच प्रेमानं बोलता बोलता भांडणं होत. कधी कधी ती त्याचं अतीत काढत असे. तोही तिचं अतीत काढायचा. मग त्यावर काहीबाही बोलणं. त्याला वाटायचं जशी तिला सन्मानाची गरज आहे. तशी मलाही. मग तिनं माझे उकारे पाकारे का बरं काढावेत? कोणालाही या स्वातंत्र्याच्या काळात हिन लेखता येत नाही. मग तो पती किंवा ती पत्नी का असेना.. .. .. .. कधीकधी तिच सविता सन्मान करायची. तेव्हा जयच्या मनात तिच्या दुतर्फा वागण्यानं शंका निर्माण व्हायची.

स्त्रिया लग्न झाल्यानंतर शुल्लक कारणावरुन भांडत. मग माहेरी जात. त्यातच पुरुषांना ब्लॅकमेल करीत. बायफ्रेंडही ठेवत. बायफ्रेडच्या गाडीवर त्यांच्या खांद्यावर हात ठेवून फिरत.

हासत खिदळत. प्रसंगी त्यांना फार त्रास व्हायचा. याच त्रासाचा बदला घेण्यासाठी पुढील काळात असे पती स्त्रियांची हत्या करु लागले.

काही काही स्त्रियाही तशाच होत्या. आपल्या बायफ्रेंडसोबत राजरोषपणानं फिरकी घेता येत नाही म्हणून त्या पतीच्या हत्या करु लागल्या.

पतीला त्याची पत्नी कितीही प्रिय असली तरी तिनं नकार दिल्यामुळं त्याला नाईलाजानं घटस्फोट द्यावाच लागला. तसेच स्त्रिच्याही बाबतीत घडलं. तो निवडलेला पती तिला कितीही प्रिय असला तरी घटस्फोट.

जय नेहमी पाहायचा की कार्यालयात अधिकारी मंडळी, कर्मचारी महिलांच्या पतीला वारंवार येतांना पाहून रागवायचे. त्याला प्रश्न पडायचा की असं का होतंय. पण ते सत्य होतं. अधिकारी पुरुष या कर्मचारी महिलांना आपल्या प्रेमज्वाळात ओढायचे. मग त्यांचं वागणं, बोलणं तिच्या पतीला कळू नये म्हणून हा व्यवहार. त्याला वाटायचं की सविताही तिच्या हॉस्पिटलला येण्याला अशीच मनाई करायची. कदाचित.. .. .. . तिचे हास्पिटलमधील डॉक्टरांशी तर अनैतिक संबंध नसावेत. अशा प्रकारची शंका त्याच्या मनात उत्पन्न व्हायची. पण दुसरा विचार

हाही असायचा की तसं नसेल. कारण तिला प्रत्यक्ष त्यानं तशाप्रकारे पाहिलं नव्हतं.

त्याला शंका येणंही स्वाभाविक होतं. त्याचं कारणही तसंच होतं. एकदा एका कर्मचारी महिलेनं ड्यूटीवर जातो म्हणून ती घरुन गेली होती. तिच्या पतीला काहीतरी अकस्मात काम पडल्यानं तो तिच्या नोकरीच्या भागात गेला. तेव्हा आपलं काम आटोपून सायंकाळी जेव्हा तो घरी परतला. तेव्हा त्यानं तिला फोन लावून विचारलं की ती कुठे आहे. तिनं त्यावर ऑफिसला आहो असं सांगीतलं होतं. कदाचित त्याला वाटलं होतं की आपण आपल्या घरी परतत असतांना तिलाही सोबत घेऊन जावं.

तो तिच्या कार्यालयात गेला. चौकशी केली तर कळलं की ती कार्यालयातच आली नाही. अर्थात आज ड्यूटीवरच नव्हती. त्यानं परत तिला फोन लावला तर ती परत म्हणाली की मी आता ऑफिसमधून निघते. त्यावेळी तो स्वतः तिच्या ऑफिसमध्येच होता. शंका येणार नाही तर काय? तो तसा घरी आला. सत्य त्याला माहितच होतं. ते मनात दडवून त्यानं तिली घरी येवून भरपूर विचारण्याचा प्रयत्न केला. पण ती कार्यालयातच होतो हेच वदत होती. शेवटी रागात येवून त्यानं पत्नीला मारलं.

तिच्या अंगाची लाहीलाही झाली होती. तसं त्यानं सांगीतलं की मी आज तुझ्याच कार्यालयात होतो.

ती रडत होती. तरीही सत्य तिनं सांगीतलं नव्हतं. दुसऱ्या दिवशी ती आपल्या बायफ्रेंडला भेटली. त्यानं काय म्हटलं तर माहित नाही. पण ती काही दिवसानं त्याला सोडून गेली होती. कारण तिच्या पतीला सत्य माहित झाल्यानं आता राजरोषपणानं तिला बायफ्रेंडला भेटता येत नव्हतं. पुढं तिची ड्यूटी स्थानांतरीत झाली होती. त्यानंतर तिचं काय झालं ते काही समजू शकलं नाही.

जयला जेव्हा जेव्हा सविताची आठवण यायची. तेव्हा तेव्हा तो सरलाच्या घरी जात असे. कधी कधी तो तिच्या चिठ्ठ्याही वाचत असे. तिच्यावर आता त्याचं प्रेम निर्माण झालं होतं. तिही प्रेम करीत होती त्याचेवर. पण जयच्या बहिण भाटव्याचा त्याला विरोध होता. त्यांना वाटत होतं की सविता जातीची असूनही असा प्रसंग घडला. सरला तर दुसऱ्या जातीची. यात सविताची जरी चूक असली तरी ती चूक जयचीच वाटत होती. वाटत होतं त्यांना की जो जातीची पोरगी टिकवू शकत नाही. तो

काय दुसऱ्या जातीची मुलगी टिकविणार. म्हणून ते विरोध करीत होते.

सरला दुसऱ्या जातीची होती. उच्चशिक्षीतही होती. उच्च जातीची होती. पण परिस्थीतीनं मारलेली होती. त्यामुळं ती त्यांना आवडत नव्हती. समाजबंधनं परंपरा अजूनही सुरु असल्यानं जयनं जातीचीच मुलगी लग्न करतांना करावी असं त्यांना वाटत होतं.

सरला लग्न करायला तयार झाली होती. ती आता त्याला म्हणत असे की आपण विवाह करु. मी तुमच्याशिवाय जगू शकत नाही. आता मी कोणा इतरांशी विवाह करणार नाही. पण जयनं ते नाकारलं होतं. कारण त्याची अजून सोडचिठ्ठी झाली नव्हती. तो तिला विरोध करीत होता. अशातच तिनं त्याला एक चिठ्ठी लिहिली.

"क्षण होता आयुष्याचा. जेथे होती खुशीच खुशी. पण नशीबाला ते मान्य नव्हतं. जिच्या कुशीमध्ये झोपून जीवनाची एवढी वर्ष काढली. आनंदानं जगले. पण ती जाताच जीवन अगदी निरस होवून गेलं. काय वाटलं होतं त्या विधात्याला, काय त्याला माझी आईच हवी होती. आता प्रत्येक पावलावर आठवण येते तिची. वाटतं तिच्या कुशीमध्ये डोकं ठेवून एकदा विसावा घ्यावा.

तो मायेचा स्पर्श अनुभवावा. पण सारं काही व्यर्थ आहे. ती कुठून येणार माझ्यासाठी. परंतू एक वचन दिलं आहे. बाबांना सांभाळून घेईल. परंतू जीवन मात्र हताश असते. पण तशाही जीवनात तुम्ही आलात. आता मला जीवाला जीव देणारा, आपलं म्हणणारा कोणीतरी मिळाला आहे असा भास होतो. परिस्थिती अशी की मनाला थोडा धीर वाटतो. तुम्ही नाही म्हणता विवाह करायला. पण या चंचल मनाला कोण समजविणार. ते नकळतच प्रेमात पडलं आणि असं वाटायला लागलं की मी तुमच्याशिवाय आता जगू शकत नाही. आता या मनाला आवरही घालता येत नाही. तशातच आल्या ह्या समाजाच्या चालीरीती व बंधनंही. त्या तोडाव्यात की नाही?या बंधनामुळंच माझ्या मनाच्या वाट्याला आली खिन्नता. कधी वाटतं की सर्व सोडून निघून जावं. अन् दुसरा विचार येतो की जगच सोडून जावं. पण जेव्हा मी मागे वळून पाहते. तर माझा बाप दिसतो अन् तुम्ही दिसता मायेनं कुळवाळणारे. तेव्हा जगावंसं वाटतं एक निराळं आयुष्य. "

चिठ्ठी संपली होती. पण त्या चिठ्ठीतून तिच्या अतीव प्रेमाची जाणीव जयला झाली. पण तिचं नुकसान होवू नये आपल्या स्वार्थासाठी. म्हणून तो म्हणाला,

"तु आंतरजातीय विवाह करु नये. शिवाय माझ्याशी तर अजिबात विवाह करु नये. कारण माझी जिंदगी तारेवरची कसरत आहे. मी ना अल्याड आहे ना पल्याड आहे. माझ्या आयुष्यात केव्हा काय होईल ते सांगता येत नाही. अजून सोडचिठ्ठी झालेली नाही. ती येते की नाही तेही काही कळत नाही. नाही आली तर आपला विवाह शंभर टक्के यशस्वी होईल. पण ती आली तर तुझं आयुष्य नष्ट होईल. मी जरी तुझ्या बाजूनं असलो तरी. दुसरी गोष्ट अशी की माझ्या बहिणीही आपल्या विरोधातच असतील. हा त्रास आपल्याला सहन करावा लागेल. "

तिचं अंतकरण आता कितीही समजावलं तरी मानत नव्हतं. प्रेम आंधळं असतं ते बरोबर होतं. ती फारच प्रेमात पडली होती त्याच्या. तशी एक दिवस तिनं पुन्हा त्याला दुसऱ्या दिवशी एक चिठ्ठी दिली. त्यात लिहिलं होतं,

"फुलं उमलतात के केवळ भवऱ्यामुळं माझं आयुष्य बहरलं ते केवळ तुमच्यामुळं. तुम्ही मला काल खुप समजावलं. पण मला माफ करा. आता मी काही समजू शकत नाही आणि मला काहीही समजंवायचं नाही. मी प्रेम केलंय त्या देवतेवर. ज्या देवतेनं मला सहारा दिला. आज मी माझ्या बापासह या जगात नसते. पण हे शरीर ज्याच्यामुळं या जगात आहे. ते शरीर खरं तर त्याच्याच

चरणावर अर्पण करावे. एवढेच मला ठाऊक आहे. तुम्ही मला स्विकार करा अगर नका करु. पण हे शरीर तुमच्याचसाठी असेल. मी माझं मनही शेवटच्या क्षणापर्यंत तुम्हालाच अर्पण केलं आहे. हे तन, मन शेवटच्या श्वासापर्यंत तुमच्याचसाठी असेल. केवळ तुमच्याचसाठी.. .. .. .. केवळ अन् केवळ तुमच्याचसाठी. "

त्या चिठ्ठ्या वाचल्या की मनाला अतिशय वेदना व्हायच्या. असं वाटायचं की झुगारुन द्यावीत आता ती जातीची बंधनं. झुगारून द्यावं आता त्या सविताला. ती तर आपल्याला ठार करायला लागलीय. मग आता सविता सविता म्हणण्याऐवजी आपण सरलाशी विवाहबद्ध व्हावं. पण त्याला विचारही आला की जर का विवाह केला आणि तिला माहित झालं तर ती तर आपली नोकरीच खाणार. मग सरलाला कसं पोसायचं. आपला संसार कसा चालवायचा. जयच्या मनातील हा प्रश्न आता आकार घेत होता.

जयनं महिला सेल केलं. लोकांनाही तिला समजंवायला तिच्याकडं पाठवून पाहिलं. दोन दोन नोटीसही देवून पाहिले. पण काहीच तिच्यामध्ये तिच्या अतीव हट्टापायी कोणताच फरक पडला नव्हता. त्याला काही न्याय मिळाला नव्हता. वा त्यानं तिचं मन बदलवलं नव्हतं. तो अपयशी ठरला होता त्यात. त्याची सोडचिठ्ठी न झाल्यानं रितसर त्याला विवाह करता येत नव्हता. तसं

पाहता तिच्या मनात बदल्याची भावना निर्माण झाल्यानं ती त्याला केव्हा धडा शिकवेल हे काही सांगता येत नव्हतं. ती तशी त्याला अटक करण्याची वाटच पाहात होती.

तिला बायफ्रेंड असल्यानं तिचा पतीसोबत राहण्यासाठी जीव लागत नव्हता.

जयला माहित होतं की काही काही महिला विवाहबद्ध होतात. पण पुरुषाला पुरावे नसल्यानं सिद्ध करता येत नाही. तशातच आता लिव्ह इन रिलेशनशिपचा काळ आलाय. पण पतींना होणारा त्रास आजही त्याला सहन होत नव्हता.

आईची प्रकृती दिवसेंदिवस खालावत चालली होती. ती अशातच एकदा आजारी पडली. पलंगावरुन उठता येत नव्हतं. पण त्यावेळी तिची प्रकृती सुधारली होती. त्यामुळं आईजवळ कोणीतरी असावं असं सारखं त्याला वाटत होतं. पण त्याच्याजवळ उपाय नव्हता.

एखाद्यावेळी आईला पाणी प्यायची इच्छा झाल्यास व तहान लागल्यास आपण आईजवळ नसल्यानं तिला पाणीही पाजायला कोणी असणार नाही व ती पाण्याअभावी मरेल. असंही त्याला वाटत होतं.

काही दिवसानंतर त्यानं विचार केला, आपण विवाह करावा. आपल्यासाठी नाही तर आपल्या आईसाठी तरी. तसं त्यानं सविताला पत्र पाठवलं. पत्रात त्यानं लिहिलं की मला माहित आहे. तुझी तुझ्या बायफ्रेंडसोबत विवाह करण्याची व राहण्याची इच्छा आहे. जर त्याला सोडून पुन्हा माझ्या घरी यायची इच्छा असेल तर खुशाल पंधरा दिवसात ये. नाहीतर मी समजेल की तुझं त्याच्यासोबत लग्न झालेलं असून तू आता अजिबात येवू शकणार नाही. तेव्हा मी त्यानंतर विवाह करण्यास मोकळा असेल. "

पत्र तिला पोहोचलं. त्याचा पुरावाही त्याला आला. पण आज एक महिना होवूनही ती परत न आल्यानं त्यानं पुढे विवाह करण्याचा निर्णय घेतला. पण त्याला विवाह करण्यापुर्वीही वाटत होतं की ती येवून आपल्या सोबत सरलाचंही नुकसान करेल.

सरलाचं प्रेम त्याला आठवलं. प्रश्न तिच्या बापाचा होता. जय विचार करीत होता. सरलाशी आपण तर विवाह करु. पण बापाचं काय? सरला आपल्या घरी तर येणार. पण बापाचं काय? शेवटी त्यानं निर्णय घेतला की सरलाला तिच्या बापासकट स्विकारायचं. तसा निर्णय त्यानं सरलाला बोलूनही दाखवला. मात्र हा विवाह तिनं लपवून ठेवायचा. जेव्हापर्यंत सविताचं प्रकरण संपत नाही.

सरलानं तसं आश्वासन देताच तो आज सरलाशी विवाहबद्ध झाला. त्यानं जातीपातीची बंधनं झुगारली होती. बहिणभाटव्याचीही इच्छा मोडली होती. नव्हे तर सविताचीही धमकी तोडली होती.

सरलासोबत जयचा विवाह झाल्याचं माहित होताच सविता आश्चर्यात पडली. तिला धक्काही बसला. तिला वाटत होतं की जय काही दुसरा विवाह करु शकत नाही. तो घाबरट आहे. बावळटही आहे. तो कायद्याला घाबरतो. शिवाय तो गबाळेपणानं राहात असल्यानं त्याला कोणी मुलगी पसंत करीत नाही. तो एक ना एक दिवस माझ्या पायावर लोळण घेत येईल. पण जयनं विवाह केल्यानं आता तिचा तो भ्रम तुटला होता. आता आपण कधीच जयच्या घरी जावू शकणार नाही असं तिला वाटत होतं.

ती चक्कर मारत होती जयच्या घराकडे. ती सरला तिला त्याच्या घरी दिसत होती. तेव्हा भांडणंही होत असत. तो म्हणत असे की मी विवाह जरी केला असला तरी तुला पोसण्याचं सामर्थ्य ठेवतो. तू आताही येवू शकतेस. त्यावर ती म्हणायची की तुझ्यासारख्या छप्पन लग्न करणाऱ्या माणसाजवळ राहणाऱ्यापेक्षा वेगळं राहिलेलं बरं.

तिला आता बेचैन वाटत होतं. सुचत नव्हतं बायफ्रेंडसोबत राहावं की वेगळं राहावं. जयच्या घरी गेलेच तर जय बदला घेईल. जय जगू देणार नाही. त्यापेक्षा जयशी फारकत घेतलेली बरी. निदान पुढील काळात मला रितसर विवाह करता येईल. तसंच आंदणही परत मागता येईल. शेवटी मध्यस्थामार्फत तिनं निरोप पाठवला की तिला सोडचिठ्ठी हवीय.

जय फारच खुश झाला. कारण त्यानं विवाह केला होता. शेवटी तो वकीलाकडे गेला व तिच्याकडून लिहून घेतलं आणि तिला आंदण परत केलं. तिनं कोर्टात जाणं नाकारलं. त्याचबरोबर पंचासमक्ष सोडचिठ्ठी झाली.

जयची पंचासमक्ष सोडचिठ्ठी झाली होती. पण त्या सोडचिठ्ठीला कायद्यानुसार मान्यता नव्हती. जयनं सरलाशी विवाह केला होता. लपुनछपून. तिला आश्वासन दिलं होतं की सोडचिठ्ठी झाल्यावर तो सरलाशी विवाह करेल. पण आपण नोकरीवर. आपली तर कोर्टातून सोडचिठ्ठी झाली नाही. याच विचारात जय नेहमी राहात होता. कधीकाळी सरला याच विवाहाच्या कारणावरुन उलटली तर अशीही भीती त्याला वाटत होती.

जय सरलाशी विवाहबद्ध झाला असला तरी जात आडवी येत होती. ती उच्चजातीतील असूनही त्याचे बहिणभाटवे त्याचेशी भांडत होते. ते आईला भडकवीत होते.

आई अर्धांगवायूतून सुधारली असली तरी तिच्या मनातील चिडचिडपणा जात नव्हता. त्यातच आई सरलाला तानेही देत होती.

सरला आताही जयवर जीव लावत होती. तो तिला हवाहवासा वाटत होता. ती आईची सेवाही करीत होती. त्यामुळं सुरुवातीला आईही तिच्याशी चांगली वागायची. पण सरलाच्या बापाला आधार नसल्यानं व तो जयकडे राहात असल्यानं ते त्याचं राहाणं त्याच्या बहिणभाटव्याच्या मनात खुपलं. ते जयशी भांडायला लागले होते. ते नित्य आईला भडकवीत असायचे.

सरला आल्यावर आईला चांगले दिवस आले होते. त्या कच्च्या पोळया केव्हाच्याच हद्दपार झाल्या होत्या. पण प्रारब्ध इथेही जयला स्वस्थ बसू देईना.

एक दिवस त्याची बहिण त्याच्या घरी आली. तिनं पाहिलं की जय सासऱ्यालाही पोसतो. तेच खदखदलं तिच्या मनात. तिला आईचं सुख पाहावलं नाही. पुर्वी आई कशी होती याचं दुःख तिला जाणवलं नाही. फक्त जय सासऱ्याला का पोसतो

ह्याचंच वाईट वाटलं. त्यांना आपल्या भावाची जीवनी चांगली वाटली नाही. त्यानंतर त्यांनी आईला भडकविणं सुरु केलं होतं.

आता आई मुलीनं भडकविण्यातून सरलाला काही बाही बोलू लागली. त्यामुळं जयला वाटायचं की आपल्या आईनं सरलाला बोलू नये. कारण आपण परिस्थिती खुप कठीण काढली आहे. पण आई काही ऐकत नव्हती. तिही ते जुने दिवस विसरली होती. ज्या काळात पावसाळ्यात गावात ओल्या अंथरुणात दिवस काढावे लागत होते. गावात बाया कामाला येवू देत नव्हत्या. मालकही कामाचे पैसे बरोबर देत नव्हते. तसेच त्या काळात बहिणीनं तिला पोसलं नव्हतं.

जयला वाटत होतं की आईनं आपल्या जीवनात फार मोठं दुःख भोगलं. तिला सुख मिळावं. पुढील काळात आपल्याला मुलं होतील. मग आपला जीव मुलात गुरफटेल. आपलं आईकडं दुर्लक्ष होईल. म्हणून तसं दुर्लक्ष होवू नये. आईवर सतत प्रेम राहावं म्हणून जयनं एक एकर शेती आईच्या नावावर आता सरलासोबत विवाहबद्ध झाल्यावर केली होती. त्याला काय माहित होते की बहिणी डाव साधतील. पण बहिणींनी डाव साधला होता. तो डाव त्याला जीवघेणा ठरला होता.

आई दररोज सरलाला त्रास देत होती. ती सारखी बडबड करायची. तिच्या बापासमोर तिची अब्रू वेशीवर टांगायची. सरलाला काही समजायचं नाही. तिही काही बोलायची नाही. कारण ती मजबूर होती. तसंच तिचं जयवर प्रेम होतं. पण तिच्या मनात आईच्या अशा वागण्यानं प्रश्न निर्माण झाले होते. बहिणीच्या बहकाव्यातून आई असं वागायला लागली होती. शेवटी आईच्या नावावर एक एकर शेती होताच बहिणीनं तिला आपल्या घरी नेलं. तिच्या नावावरील शेती आपल्या नावे केली व तिला विकून टाकली.

शेती होती तेव्हापर्यंत बहिणी ठीक राहिल्या. पण शेती विकताच आईच्या गतीला पारावार उरला नाही. शेती गेली होती. काही उरलं नव्हतं शिवाय आईला बहिणीकडं स्वस्थ राहायला खायला मिळत नव्हतं. त्यातच शेतीची चिंता व अपराधीपणाची भावना आईला सतावत होती. शेती विकेपर्यंत मुली चांगल्या राहिल्या होत्या. पण शेती विकल्यानंतर.. .. .. . याच चिंतेनं आईला जेवन रुचकर लागायचं नाही. जेवन पोटभर व्हायचं नाही. मुलीचे मुलं तिला मारायला धावायचे. त्यातच एक दिवस आई गेली.

वर्षामागून वर्ष जात राहिली. काही दिवस जयनं आपली दुसरी पत्नी सरलाला मंगळसुत्रही घालू दिलं नाही. कारण

सोडचिठ्ठी झाली असली तरी त्या सोडचिठ्ठीला कायद्यानुसार मान्यता नसल्यानं जय सरलासोबत कोलेला विवाह जाहिर करु शकत नव्हता. पण सरलाही विवाहबद्ध झाली असली तरी तिनं त्याचं महत्व समजून घेतलं नव्हतं.

आज सरलाला विवाहाचं महत्व वाटत होतं. लोकं तिला काही अपशब्द म्हणत तेव्हा अंगाची लाहीलाही होत होती. आपल्याला जयनं निव्वळ आश्वासन दिलं, परंतू विवाह केला नाही याची खंत अजूनही तिच्या मनात होती. तर आपली सोडचिठ्ठी झाली नसल्यानं मजबूरीनं आपली इच्छा असूनही सरलाशी आपण विवाह करु शकत नाही. याची खंत जयच्या मनात होती.

जयची आई मरुन गेली होती. तो मोकळा झाला होता. त्याचबरोबर एक जबाबदारी त्यानं अंगावर घेतली होती. तिच्या बापाला पोसण्याची. कारण त्याला वाटत होतं की त्या सासऱ्यानं आपल्याला अतीव त्रास दिला की आपल्याला मरुन जावं वाटत होतं. पण ह्या सासऱ्यानं त्याला माहित असूनही आपल्या मुलीला माझ्याशी विवाह करण्याची संमती दिली. तो सासरा महान वाटत होता. त्यामुळं जय ती जबाबदारी पार पाडत होता.

त्यानं आपल्या सासऱ्याचीही म्हातारपणात बरीच सेवा केली. नंतर म्हातारपणानं ते मरण पावला. त्याचबरोबर सरलाही मोकळी झाली.

आता जय फार मोठा लेखक झाला होता. राज्यात त्याचं नाव वाढलं होतं. पण त्याचबरोबर घरी भांडणंही होत होती सरलासोबत. सरला त्याची खरडपट्टी काढत होती विवाहावरुन. ती त्याला आज विवाह जाहिर करण्यासाठी भांडणं करीत होती. तिचंही बरोबरच होतं. पण जय आजही तिच्याशी विवाह करु शकत नव्हता. कारण अजूनही पंचायतीमार्फत सोडचिठ्ठी झाली असली तरी कायद्यानुसार न्यायालयातून सोडचिठ्ठी न झाल्यानं जय आजही मजबूर होता.

जय मोठमोठे लेख वर्तमानपत्रात लिहित होता. लोकांच्या समस्या मांडत होता. लोकांना आपल्या समस्यातून न्याय मिळवून देत होता. असे कितीतरी प्रश्न त्यानं सोडविले होते. पण स्वतःच्या घरचा घटस्फोटाचा प्रश्न त्याचा जीव पदोपदी घेत होता. जीवंत असतांनाही तो त्या सरलासोबतच्या लग्नाच्या प्रस्तावाने तीळ तीळ मरत होता. त्याला पश्चाताप होत होता. सरलाला फसवण्याचा. त्यानं तिच्या भोळ्याभाबड्या स्वभावाचा फायदा घेत तिला कायद्यानुसार विवाह जाहिर न करता ठेवले होते.

तिला तो पत्नी जरी समजत असला तरी समाज आजही रखेल समजत होता. हे सगळं सवितामुळं घडलं होतं.

आजही त्याला सविताचा भयंकर राग येत होता. तर आपली पत्नी सरलासोबत विवाह न करण्याचा त्याला पश्चाताप येत होता. त्याचबरोबर कायद्याचाही त्याला राग येत होता. कारण कायद्याच्याच धाकामुळं तो आजही इच्छा असतांनाही सरलाशी विवाह करु शकत नव्हता. कदाचित तो कोर्टात जावून सोडचिठ्ठीही घेवू शकला असता. पण कोर्टात त्याला वेळ किती लागला असता हे सांगता येत नव्हते. कदाचित त्याच न्यायालयाच्या तारखेवर तारखा चालल्यानं तो म्हातारा होवून त्याचे दिवसं निघून गेले असते. तारुण्यही निघून गेलं असतं. सतत खावटीही पडली असल्यानं पैसाही गेला असता आणि त्रासही त्याला झाला असता. त्याला कोर्टातून लवकर न्याय प्राप्त न झाल्यानं तो सरलासोबत विवाहबद्ध होवू शकला नसता. कदाचित आज सरलाही केव्हाच दूर भूर उडून गेली असती पक्षासारखी.

आजही देशात कित्येक माणसं अशी होती की जी घटस्फोटाच्या प्रश्नानं व्यथीत होती. आजही घटस्फोटाचे न्यायालयात खटले चालत होते. आजही त्याच खटल्यामध्ये वाढ होत चालली होती. आजही पत्नीपिडीत मंडळींनी कित्येक अशा

सरलाशी विवाह केले होते. ज्या सरला त्यांच्या दृष्टीकोनातून पत्नी होत्या नव्हे तर कित्येक जयला साथ देत होत्या. नव्हे तर आयुष्यभर जयशी राहण्याचं वचन देत होत्या. आजही पंचायतीसमोर विवाहाच्या सोडचिठ्ठ्या होत होत्या. पण आजही अशा पंचामधील झालेल्या सोडचिठ्ठ्या कायद्याला मान्य नव्हत्या. त्या सरला पण लोकांच्या दृष्टीकोनातून आजही रखेलच होत्या. आजही ते कित्येक पती विवाह करुनही त्यास राजरोषपणे जाहिर करण्याची इच्छा असूनही जाहिर करु शकत नव्हते. अन् आजही अशा कित्येक सरला आपल्याच पतीशी भांडत होत्या विवाह जाहिर करण्यासाठी. ज्यात कित्येक पती हे कुणी लेखक होते. तर कुणी कलावंत होते. कुणी डॉक्टर, पोलिस तर कुणी न्यायाधीशही होते. कारण तसा विवाह जाहिर करणं म्हणजे त्यांचं अस्तित्व होतं. अशा सरला पुन्हा जातील का निघून आपल्या घरुन आणि पुन्हा आपल्याला सोडचिठ्ठीला सामोरे जावे लागेल का? असेही वाटत होते. तसंच आजही अशा सविता तारुण्यात बायफ्रेंडसोबत मजा करुन म्हातारपणात अशा जयच्याच घरी पुन्हा येण्याची आस करीत होत्या. नवीन सोडचिठ्ठीची प्रकरणे सुरु करण्यासाठी तसेच स्थिर झालेल्या कित्येक सरलांचे संसार तोडण्यासाठी.. .. .. . स्थिर झालेल्या कित्येक सरलांचे संसार तोडण्यासाठी.. .. .. ..

***अंकुश रा. शिंगाडे**



*जन्मतारीख: ०३/०३/१९७७

*शिक्षण: एम ए, डी एड

*प्रकाशित छापील साहित्य:

***कवितासंग्रह***

१)स्वातंत्र्याची गाणी २)आजादी के गीत(हिन्दी) ३)अश्रूंची गाणी ४)राजवाडा

***कादंबरी***

१)वेदना २)कंस ३)संघर्ष ४)चर्मयोगी

***कथासंग्रह***

१)मजेदार कथा २)चित्तथरारक ३)फोनच्या करामती ४)हरवलेलं बालपण ५)स्मशानाची राख ६)निकाल ७)अजून किती ८)निराशा

***लेखसंग्रह***

१)माझे शिकविण्याचे प्रयोग २)गतकाळातील शास्त्रज्ञ आणि शोध ३)अस्तित्व ४)अस्तित्वाची पाऊलवाट शोधतांना


***चारोळीसंग्रह***


१)आक्रमण


***प्रवासवर्णन***

१)प्रवास २)प्रवासातील गमतीजमती

*महाराष्ट्रात वेगवेगळ्या वृत्तपत्रातून साहित्य लेखन*












अंकुश शिंगाडे यांची ई साहित्यवर उपलब्ध ईपुस्तके

कव्हरवर एक क्लिक करताच पुस्तक उघडेल.









## ई साहित्य प्रतिष्ठानचे हे तेरावे वर्ष.

## श्री अंकुश शिंगाडे यांचे हे आठवे पुस्तक.

अंकुश शिंगाडे एक शिक्षक आहेत. शिक्षक ही त्यांची केवळ उपजीविका नाही तर जीविकाही आहे. समाजात सत्याचे आणि विज्ञानाचे ज्ञान पसरावे व समाज मनाने बळकट व्हावा, त्यातही मुलींनी शिकावे व त्यांच्या आत्मनिर्भरतेने समाजाला अधिक बळकटी यावी हे त्यांचे स्वप्न आहे. ते भरपूर लिहीतात ते समाजातील दबल्या गेलेल्या घटकांना आवाज देण्यासाठी. आपली पुस्तके समाजात जास्त वाचली जावीत असे त्यांना वाटते आणि ई साहित्य हे त्या दृष्टीने त्यांन योग्य वाटते. त्यांची आजवर २४ छापील पुस्तकेही विविध प्रकाशकांनी प्रकाशित केली आहेत व त्यांच्या पुस्तकांना मागणी आहे. पण तरीही ते आपली पुस्तके ई साहित्यच्या वाचकांना विनामूल्य देतात.

अंकुश शिंगाडे यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली सर्व पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर दिनानाथ मनोहर(२ पुस्तके), शंभू गणपुले (नऊ पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर (९ पुस्तके), डॉ. वसंत बागुल (१७ पुस्तके), शुभांगी पासेबंद (९ पुस्तके), अविनाश नगरकर

( चार पुस्तके), डॉ. स्मिता दामले (सात पुस्तके), डॉ. नितीन मोरे (२७ पुस्तके), अनील वाकणकर (९), अनंत पावसकर(४ पुस्तके), मधू शिरगांवकर (७), अशोक कोठारे (बारा हजार पानांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १६ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (८), डॉ. वृषाली जोशी(१६), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (८), अंकुश शिंगाडे(५), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(३) स्वाती पाचपांडे(२) असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये। विशेषीं लोकीं 'इ'यें।

दृष्टादृष्ट विजयें। होआवे जी।